सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २६ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २०८ | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




दक्षिणोत्तर भारताच्या लहान मोठ्या पेठाशी सचोटीने व्यापार करणारी व मराठवाड्याच्या प्रवेशद्वाराशी विनटलेली शेतकरी व व्यापारी यांची एकमेव विश्वासपात्र पेठ म्हणजेच कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे पंडीत जवाहरलाल नेहरु प्रिन्सिपल मार्केट यार्ड बार्शी

**बाजार समितीची वैशिष्टे :**

१) सर्व सोयीनीयुक्त प्रशस्त धान्य २) शेतमालाची उघड लिलाव पध्दतीने विक्री व त्वरीत चुकारा ३) ६० मे. टन क्षमतेचा भुईकाटा ४) जनावर बाजार ५) फळे भाजीपाला मार्केट ६) कडबा मार्केट ७) शॉपिंग सेंटर ८) कोल्ड स्टोअरेज ९) मालाचे योग्य वजन होण्यासाठी परवानाधारक तोलार १०) सुलभ शौचालय ११) जनावरासाठी निवारा शेड १२) ई-नाम योजना १३) शेतमाल तारण योजना १४) हमीभाव खरेदी केंद्र १५) गाडूळ खत प्रकल्प १६) धान्य चाळणी यंत्र व गोदाम १७) सौर ऊर्जा प्रकल्प १८) शेतकरी निवास १९) विविध औषधी वनस्पतीची लागवड व संवर्धन २०) संपूर्ण बाजार आवारामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे.

❁ शुभेच्छुक : कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी, ता. बार्शी., जि.सोलापूर फोन :- ०२१८४-२२२९७६

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सीरियात अमेरिकेचा हवाई हल्ला

## इसिसच्या अड्ड्यांवर ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा | कमांडरसह २२ सदस्यांचा खात्मा

**दमास्क, २५ जून**

अमेरिकेच्या वायुदलाने बुधवारी मध्यरात्रीनंतर सीरियाच्या वायव्य प्रातांत दहशतवादी इसिसच्या अड्ड्यांवर जोरदार हवाई हल्ले चढवले. यात इस्लामिक स्टेटचा वरिष्ठ कमांडक अली हुसेन अल-उलेवी यांच्यासह संघटनेचे २२ सदस्य ठार झाले, तर ५० पेक्षा अधिक जखमी आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने हल्लाची पुष्टी केली.

दहशतवादाविरोधात मोहीमेचा भाग म्हणून अमेरिकेच्या वायुदलाने सीरियांच्या वायव्य प्रांतात इसिसच्या प्रशिक्षण स्थळांना लक्ष्य करत ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा मारा केला. जवळपास एक तासापर्यंत राबवण्यात आलेल्या कारवाईत इसिस कमांडर अली हुसेन याच्यासह २२ सदस्यांचा खात्मा करण्यात यश आले, तर ५० हून अधिक जखमी झाले सीरियाच्या आरोग्य विभागाने निवेदनात म्हटले की, दहशतवादी नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी अमेरिकेने ही कारवाई केली. या हल्ल्यात अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या. ढिगाऱ्यातून २२ मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर जखमींना रुग्णालयात हलविले आहे. अमेरिकी नागरिक, लष्करी कर्मचारी आणि मित्र राष्ट्रांवर हल्ले करण्याची योजना आखणाऱ्या दहशतवाद्यांना संपवण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)



अमेरिकेने सीरियावर केलेल्या हवाई हल्ल्यात इसिसचे अड्डे नष्ट करण्यात आले


### प्रादेशिक सुरक्षेसाठी धोका

हा हल्ला तुर्कीच्या सीमेजवळील देर हसन गावाजवळ वायव्य सीरियामध्ये करण्यात आला. २०१९ मध्ये सीरियामध्ये इस्लामिक स्टेटचा पराभव होऊनही, त्याचे अनेक स्लीपर सेल अजूनही सक्रिय आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये असद कुटुंबाच्या पाच दशकांच्या राजवटीच्या पतनानंतर, इसिसशी संलग्न गटांनी देशाच्या नवीन सरकारवर झालेल्या अनेक हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. यावरून हे स्पष्ट होते की ही संघटना पूर्णपणे नष्ट झालेली नाही आणि प्रादेशिक सुरक्षेसाठी धोका बनून राहिली आहे. त्यामुळेच अमेरिकेने इसिसचा नायनाट करण्यासाठी हल्ल्याची योजना आखल्याचे सेंट्रल कमांडने म्हटले आहे. ■

### मित्र राष्ट्रांची सुरक्षा करण्यास कटिबद्ध

सेंटकॉमचे कमांडर अडमिरल ब्रॅड कूपर यांनी सांगितले की, अमेरिका आणि तिचे मित्र देश इस्लामिक स्टेट नेटवर्क पूर्णपणे नष्ट करण्यासाठी कटिबद्ध आहेत अमेरिका प्रादेशिक भागीदारांचे आणि मित्र राष्ट्रांचे संरक्षण करण्यासाठी यापुढे आपली मोहीम सुरु ठेवेल. इसिसला कमकुवत करणे हल्ल्याचा उद्देश आहे. अमेरिकन सैन्याने यापूर्वी फेब्रुवारीमध्ये सीरियातील इसिसच्या लक्ष्यांवर हल्ला केला होता. डिसेंबरमध्ये झालेल्या एका प्राणघातक हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली होती, ज्यात दोन अमेरिकन सैनिक आणि एक अमेरिकन नागरिक मारले गेले होते. त्या कारवाईत किमान ५० दहशतवादी मारले गेले. ■

# सीबीआयचे १६ राज्यांमधील ८० ठिकाणी छापे



**डिजिटल अरेस्ट घोटाळाप्रकरणी देशभरात धडक कारवाई**

**नवी दिल्ली, २५ जून**

**डिजिटल अरेस्ट घोटाळ्याप्रकरणी सीबीआयने गुरुवारी १६ राज्यांमधील ८० ठिकाणी छापे टाकले. ही कारवाई 'ऑपरेशन चक्र' अंतर्गत करण्यात आली. हे ऑपरेशन सायबर गुन्हेगारीच्या पायाभूत सुविधांवर केलेल्या समन्वित कारवाईचा एक भाग आहे. सीबीआयने यापूर्वीही डिजिटल अरेस्ट घोटाळ्याशी संबंधित प्रकरणांमध्ये अनेक कारवाया केल्या आहेत.**

सीबीआयने 'ऑपरेशन चक्र-६' दरम्यान ६० विशेष पथके तयार केली आहेत. या पथकांनी पंजाब, गुजरात, दिल्ली, महाराष्ट्र, हरियाणा, तामिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, आसाम, पश्चिम बंगाल, मणिपूर, कर्नाटक आणि ओडिशा या १६ राज्यांमधील ८० हून अधिक ठिकाणी छापे आणि शोधमोहीम राबवली. ही कारवाई डिजिटल अटक घोटाळ्याच्या तपासाचा एक भाग आहे, ज्याचा उद्देश देशभरातील २०० हून अधिक डिजिटल अटक घोटाळ्यांमध्ये गुंतलेले कार्यप्रणालीचे जाळे उद्ध्वस्त करणे आहे. या प्रकरणात शेल कंपन्यांची स्थापना आणि बेकायदेशीर बँक खाती उघडल्याप्रकरणी सीबीआयने दोन संशयितांना अटक केली आहे. डिजिटल अटकेच्या माध्यमातून केलेल्या फसवणुकीतून मिळालेला पैसा वैध करण्यासाठी या खात्यांचा वापर केला जात होता.

**अनेक गुन्हेगारी कागदपत्रे, डिजिटल उपकरणे जप्त**

प्रगत फॉरेन्सिक साधने आणि तांत्रिक ज्ञानाचा वापर करून सीबीआयने भारत आणि परदेशात कार्यरत असलेल्या गुन्हेगारी नेटवर्कचे प्रमुख घटक ओळखले आहेत. गुन्हेगारांनी त्यांच्या फसवणुकीच्या कृत्यांना विश्वासार्हता देण्यासाठी बनावट आणि खोटे दस्तऐवज अपलोड केले होते.ज्यात बनावट आदेश तयार करणे समाविष्ट होते, असेही तपासात समोर आले आहे. या वस्तूंची सखोल फॉरेन्सिक तपासणी आणि विश्लेषण केले जात आहे. (वृत्तसंस्था)

### भारतीयांसह परदेशी नागरिकांचीही फसवणूक

सीबीआयने अलीकडेच डिजिटल अटक घोटाळ्याशी संबंधित एका बनावट वेबसाइटचा भंडाफोड केला आहे. वेबसाइटचा युआरएल सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत वेबसाइटसारखा दिसत होता. त्याचा वापर पीडितांची फसवणूक करण्यासाठी केला जात होता. सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारने या वेबसाइटबद्दल तक्रार दाखल केली. त्यानंतर सीबीआयने एफआयआर नोंदवून तपास सुरू केला. सीबीआयच्या आतापर्यंतच्या तपासात असे पुरावे समोर आले आहेत की, या सायबर गुन्ह्यात केवळ भारतीय नागरिकच नव्हे, तर परदेशी नागरिकांचीही फसवणूक झाली आहे. ■

# २.३४ कोटींचे मादक द्रव्य जप्त

**श्रीभूमी, २५ जून**

'आसाम अगेन्स्ट ड्रग्स' मोहिमेदरम्यान श्रीभूमी पोलिसांनी सुमारे २.३४ कोटी रुपये किमतीच्या संशयित मादक द्रव्याच्या ११,६९५ बाटल्या जप्त केल्या. याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली.पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. सोशल मीडियावर माहिती देताना, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी पोलिसांच्या प्रयत्नांचे



कौतुक केले. ही जप्ती म्हणजे राज्यात कार्यरत असलेल्या अमली पदार्थांच्या तस्करीच्या नेटवर्कला बसलेला एक मोठा धक्का आहे, असे ते म्हणाले. सरमा यांनी राज्य सरकारच्या अमली पदार्थविरोधी मोहिमेप्रती असलेल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करत सांगितले की, आसाम पोलिस अमली पदार्थांची तस्करी आणि व्यसनाधीनतेविरोधात आपले प्रयत्न अधिक तीव्र करत राहील. जप्त केलेल्या प्रतिबंधित मालाचा स्त्रोत, त्याचे नियोजित ठिकाण आणि मोठ्या तस्करी नेटवर्कशी असलेले संभाव्य संबंधांचा तपास सुरू आहे.

(वृत्तसंस्था)

# भूकंपाने घेतला साडेपाच लाख लोकांचा बळी

## सात दशकांत भारतासह जगभरातील अनेक देशांनी अनुभवली नैसर्गिक आपत्ती, विध्वंसामुळे कोट्यवधी नागरिक बेघर

**वॉशिंग्टन, २५ जून**

व्हेनेझुएलामधील विनाशकारी भूकंपाने निसर्गापुढे मानव हतबल असल्याची प्रचीती आली. एका क्षणात, भूकंपाने इतका विनाश घडवला की संपूर्ण जग भयभीत झाले आहे. जगाने यापूर्वी अनेक वेळा असा विनाश पाहिला आहे. सात दशकांत भारतासह जगात अनेक ठिकाणी भूकंपाच्या तीव्र धक्क्याने विध्वंस झाला. यात ५,६४,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला, तर कोट्यवधी लोक बेघर झाल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालात नमूद करण्यात आले.



ऐतिहासिक नोंदीनुसार, जगातील सर्वात प्राणघातक भूकंप १५५६ मध्ये चीनच्या शांक्सी येथे झाला होता, ज्यात अंदाजे आठ लोकांचा मृत्यू झाला. तथापि, या भूकंपाची नेमकी तीव्रता नोंदवलेली नाही. १९३५ आणि १९९९ च्या भूकंपांमुळे तैवानमध्ये ५,६०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. याशिवाय विनाशकारी भूकंपांमध्ये तुर्की आणि सीरियामध्ये साठ हजारहून अधिक लोकांचा बळी गेला.

सुमारे २२ वर्षांपूर्वी झालेल्या २००४ च्या हिंद महासागरातील भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ९.१ होती आणि त्यामुळे आलेल्या त्सुनामीमध्ये सुमारे अडीच लाख लोकांचा मृत्यू झाला. या त्सुनामीचा सर्वाधिक फटका इंडोनेशिया, भारत, श्रीलंका आणि थायलंडला बसला. या भूकंपामुळे सुमात्राच्या किनाऱ्यापासून १५० मैल दूर समुद्राच्या तळाशी एक शक्तिशाली स्फोट झाला, ज्यातून बाहेर पडलेली ऊर्जा अंदाजे २३,००० हिरोशिमा बॉम्बच्या बरोबरीची होती. १२ जानेवारी, २०१० रोजी, हैतीची राजधानी पोर्ट-ओ-प्रिन्स येथे ७.० तीव्रतेचा भूकंप झाला, ज्यात १,६०,००० लोकांचा मृत्यू झाला.

**जम्मू-काश्मीरने अनुभवला प्रकोप**

८ ऑक्टोबर, २००५ रोजी, भारत आणि पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात ७.६ तीव्रतेचा भूकंप झाला, ज्याचा परिणाम पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतावर आणि जम्मू आणि काश्मीरच्या काही भागांवर झाला. याचा प्रभाव अफगाणिस्तान, ताजिकिस्तान आणि चीनच्या शिनजियांग प्रांतापर्यंत जाणवला. या भूकंपामुळे ८६,००० लोकांचा मृत्यू झाला, मोठ्या प्रमाणावर भूस्खलन झाले आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले, तसेच लाखो लोक बेघर झाले. जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात जीवहानी झाली होती.

६ फेब्रुवारी २०२३ रोजी, तुर्की आणि सीरियामध्ये ७.८ तीव्रतेचा भूकंप झाला, त्यानंतर रिश्टर स्केलवर ७.५ तीव्रतेचा दुसरा धक्का बसला. हा भूकंप इतका विनाशकारी होता की यात दोन्ही देशांमधील ५९,००० लोकांचा बळी गेला. ११ मार्च २०११ मध्ये जपानमधील एका शक्तिशाली भूकंपानंतर आलेल्या त्सुनामीने १८,००० लोकांचा मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

### भूकंपाच्या घटनांनी जग हादरले

- नेपाळमध्ये २५ एप्रिल २०१५ साली झालेल्या भूकंपात दहा हजार लोकांचा मृत्यू, तर २३,००० हून अधिक जखमी झाले, या विध्वंसाची भीती अजूनही नेपाळच्या लोकांमध्ये आहे
- २००५ मध्ये इंडोनेशियातील भूकंपही प्राणघातक मानला जातो. यात १,३०० लोकांचा मृत्यू झाला.
- २६ जानेवारी २००१ रोजी भारतातील कच्छ आणि भुज येथे झालेल्या भूकंपाने ३०,००० हून अधिक लोकांचा मृत्यू, तर दीड लाखांहून अधिक जखमी झाले, यात चार लाख घरे उद्ध्वस्त झाली
- २७ मार्च १९६४ रोजी अमेरिकेतील अलास्कामध्ये भूकंपाचे धक्के सुमारे साडेचार मिनिटे जाणवले होते, यात शेकडो नागरिकांनी जीव गमावला
- ४ नोव्हेंबर, १९५२ रोजी रशियातील कामचटका येथे ९.० तीव्रतेचा भूकंप झाला. यात जवळपास १०,००० लोकांचा मृत्यू झाला. त्यानंतर आलेल्या त्सुनामीमुळेही प्रचंड विध्वंस झाला.
- ३१ मे, १९३५ रोजी बलुचिस्तानमधील क्वेटा येथे भूकंपामुळे प्रचंड विध्वंस झाला, यात ६०,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि दोन लाखहून अधिक जखमी झाले. ■

## चित्रपट वार्ता

### विशाल भारद्वाज ऑस्कर पॅनेलमध्ये सामील

**मुंबई :** 'अकॅडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेस'ने यावर्षी आपल्या मतदान समितीमध्ये ५२९ नवीन सदस्यांना आमंत्रित केले आहे. या यादीत सहा भारतीय नावांचा समावेश आहे, ज्यात चित्रपट निर्माते आणि संगीतकार विशाल भारद्वाज हे विशेष उल्लेखनीय आहेत. दरवर्षीप्रमाणे, अकादमीने जगभरातील कलाकार, अभिनेते आणि चित्रपट निर्मात्यांची निवड केली आहे. या यादीत जेकब एलोर्डी, जेना ओर्टेगा, जोश ओ'कॉनर आणि सिमू लिऊ यांच्यासह हॉलिवूडमधील अनेक प्रमुख नावांचा समावेश आहे. दिग्दर्शक जॅक क्रेगर आणि सफडी बंधू यांचाही या यादीत समावेश आहे. जर सर्वांनी हे आमंत्रण स्वीकारले, तर अकादमीची एकूण सदस्यसंख्या ११ हजारापेक्षा जास्त होईल. यांपैकी १० हजारांहून अधिक जण मतदानात सहभागी होतील. विशेष म्हणजे, मागील १० वर्षांत ही संख्या जवळपास दुप्पट झाली आहे. ■




### सलमान खान साकारू शकतो कर्णाची भूमिका



**मुंबई :** सलमान खान एका मोठ्या बजेटच्या चित्रपटात दिसू शकतो. तो या चित्रपटात महाभारतातील प्रमुख पात्र कर्णाची भूमिका साकारण्याची शक्यता आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन राकेश ओमप्रकाश मेहरा करणार आहेत, तर फरहान अख्तरची एक्सेल एंटरटेनमेंट याची निर्मिती करेल. सलमानने चित्रपटाची स्क्रिप्ट ऐकली आणि लगेच यासाठी होकार दिला. चित्रपटाबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. सलमानचा पुढचा 'थिएटर रिलीज' चित्रपट 'मातृभूमीः मे वॉर रेस्ट इन पीस' असेल. अपूर्व लाखिया दिग्दर्शित या चित्रपटात त्याच्यासोबत चित्रांगदा सिंग दिसणार आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होऊ शकतो. ■

### 'मिर्झापूर - द मुव्ही'चा टीझर प्रदर्शित



**मुंबई :** 'मिर्झापूर - द मुव्ही'चा टीझर प्रदर्शित केला आहे. टीझरमध्ये पंकज त्रिपाठी, अली फजल आणि दिव्येंदू अत्यंत धोकादायक अवतारात दिसत आहेत. या तिघांमध्ये मिर्झापूरच्या सिंहासनासाठीचा संघर्ष सुरूच आहे. टीझरमध्ये अली फजल आणि दिव्येंदू नेत्रदीपक ॲक्शन सीक्वेन्स सादर करताना दिसत आहेत. हा चित्रपट मिर्झापूरमधील कालीन भैय्या, गुड्डू पंडित आणि बहुचर्चित मुन्ना भैया, दिव्येंदू यांच्यासह प्रतिष्ठित पात्रांना एकत्र आणणार आहे. या चित्रपटात जितेंद्र कुमार, रवी किशन, अभिषेक बॅनर्जी, रसिका दुग्गल, श्वेता त्रिपाठी, श्रिया पिळगावकर, हर्षिता गौर, सुशांत सिंग, मोहित मलिक, शीबा चड्ढा, राजेश तैलंग, कुलभूषण खरबंदा, सोनल चौहान, प्रमोदशांग आणि अनमोदशांग यांच्यासह मोठ्या स्टारकास्टचा समावेश आहे. 'मिर्झापूर द मूव्ही' ४ सप्टेंबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. ■

### आमता बॉम्बस्फोट प्रकरणी छापेमारी

**कोलकाता, २५ जून**

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) पश्चिम बंगालमधील आमता परिसरात शोधमोहीम राबवून दोन आरोपींना अटक केली आहे. २०२२ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाप्रकरणी ही अटक करण्यात आली आहे. या घटनेत बॉम्ब बनविणाऱ्या एकाचा मृत्यू झाला होता तर तीन जण जखमी झाले होते. हे दोन्ही आरोपी स्फोटके तयार करण्यामध्ये सामील होते.

तपास यंत्रणेनुसार, हावडा (ग्रामीण) येथील आमता भागातील रहिवासी असफर मीडिया आणि अंतजुल मीडिया यांना मंगळवारी रात्री अटक करण्यात आली. आरोपींच्या संशयित लपण्याच्या ठिकाणांवर तीन ठिकाणी शोधमोहीम राबविल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या दोन आरोपींची ओळख मुख्य आरोपी म्हणून पटली आहे. आरोपी असफर आणि अंतजुल हे बॉम्ब बनविण्यासाठी जबाबदार होते, असे तपासात आढळले. (वृत्तसंस्था)

# सेल्फीच्या नादात पाच जणांना जलसमाधी

**मंड्या, २५ जून**

सेल्फी काढत असताना अचानक पाय घसरल्यामुळे नदीपात्रात पडलेल्या पाच जणांचा बुडून मृत्यू झाला. मृतकांत एकाच कुटुंबातील चार महिलांसह त्यांच्या कारचालकाचा समावेश आहे. ही दुर्दैवी घटना कर्नाटकातील मंड्या येथे कावेरी नदीजवळील मुत्ताथी या पर्यटनस्थळी बुधवारी सायंकाळी घडली. सर्व मृत बंगळुरुचे रहिवासी होते.

जगदपुरा गावातील रहिवासी विजयम्मा, त्यांच्या मुली प्रियांका आणि श्वेता व नात चैत्रा (२०) बिगारा ऊटा (एक पारंपरिक मेजवानी)साठी कब्बालू मंदिरात आले होते. दर्शनानंतर त्यांनी तेथे प्रार्थना केली. त्यानंतर त्यांनी मालवल्ली तालुक्यातल्या मुत्ताथी या पर्यटन स्थळाला भेट दिली आणि देवतेचे दर्शन घेतले.

कावेरी नदीत सेल्फी काढत असताना अचानक चार महिलांचा पाय घसरून त्या नदीत पडल्या.त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात कारचालक महेश हा देखील बुडाला. बुधवारी रात्री सुमारे ७ वाजता जलतरणपटूंच्या मदतीने मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले आणि शवविच्छेदनासाठी रुग्णालयात नेले. (वृत्तसंस्था)

# आझम खान यांना झटका

**रामपूर, २५ जून**

एकेकाळी शिक्षण आणि सामाजिक विकासाचे एक आदर्श म्हणून ओळखला जाणारा जौहर ट्रस्ट आता कायदेशीर आणि प्रशासकीय आव्हानांमध्ये अडकला आहे. ट्रस्टद्वारे चालवल्या जाणाऱ्या मोहम्मद अली जौहर विद्यापीठ आणि रामपूर पब्लिक स्कूलशी संबंधित चौकशी आणि कारवाईमुळे अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. जोहर ट्रस्टची नोंदणी रद्द होणे हा आझम खान यांच्यासाठी झटका मानला जात आहे.



शिक्षण आणि सामाजिक उन्नतीला प्रोत्साहन देण्याच्या घोषित उद्देशाने जौहर ट्रस्टची स्थापना २००४ मध्ये झाली. २००६ मध्ये, ट्रस्टचे अध्यक्ष आझम खान यांनी मोहम्मद अली जौहर विद्यापीठाची पायाभरणी केली. सुमारे ३०० एकरवर विकसित झालेला विद्यापीठाचा परिसर कालांतराने चर्चेचा विषय बनला आहे. शिक्षण विभागाच्या मालकीची जमीन आणि इमारती वापरल्याचा आरोप ट्रस्टवर होता.

अनाथालयाची व्यवस्था हटवून शाळा स्थापन करण्याचे प्रकरणही चर्चेत आले होते. समाजवादी पक्षाच्या राजवटीत ट्रस्टचा झपाट्याने विस्तार झाला आणि त्याची मालमत्ता अब्जावधी रुपयांपर्यंत पोहोचली. (वृत्तसंस्था)

# ॲमेझॉन भारतात करणार ४८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

## क्लाऊड, आर्टिफिशियल इंटेलिजन्ससह रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित

**वॉशिंग्टन, २५ जून**

जगातील अग्रगण्य ई-कॉमर्स आणि आयटी कंपनी असलेल्या ॲमेझॉनने गुरुवारी २०२६ ते २०३० दरम्यान भारतात ४८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची योजना जाहीर केली. ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर ही घोषणा केली.

आम्ही २०१० पासून भारतात ४० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. मागील वर्षीच्या अखेरीस, आम्ही २०२६ ते २०३० दरम्यान भारतात ३५ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली होती आणि आता आम्ही ही रक्कम ४८ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवत आहोत, असे जस्सी म्हणाले. ॲमेझॉनची ही गुंतवणूक भारतातील डिजिटल अर्थव्यवस्थेतील वाढत्या मागणीची पूर्तता करेल. या घोषणेमुळे, २०१० ते २०३० या कालावधीत भारतातील ॲमेझॉनची एकूण आर्थिक गुंतवणूक ८८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होईल. ही गुंतवणूक ई-कॉमर्स नेटवर्क्स, वेगवान वाणिज्य कार्यप्रणाली आणि तंत्रज्ञान पायाभूत सुविधांमध्ये विभागली जाईल.



अमेझॉनच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने मागील १२ वर्षांतील पंतप्रधानांची दूरदृष्टी उल्लेखनीय असल्याचे म्हटले आहे. भारत जगाच्या जवळपास प्रत्येक क्षेत्रात एक महत्त्वाचा देश बनला आहे. देशाला प्रत्येक क्षेत्रात सुधारण्यासाठी पंतप्रधानांकडे अनेक कल्पना आहेत, असे ते म्हणाले. ही वाढीव आर्थिक गुंतवणूक प्रामुख्याने डिजिटल अर्थव्यवस्थेतील वाढत्या मागणीमुळे झाली आहे. कंपनीने आपल्या संसाधन वाटप योजनेत सुधारणा केली आहे. या भांडवलाचा एक विशिष्ट भाग प्रगत डिजिटल प्रणालींसाठी राखून ठेवण्यात आला आहे.

अतिरिक्त १३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक क्लाउड कंप्युटिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या विकासाला गती देईल. यामुळे क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरमधील एकूण नियोजित गुंतवणूक २१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे. या भांडवलामुळे मुंबई आणि हैदराबादमधील ॲमेझॉन वेब सर्व्हिसेसच्या डेटा सेंटर क्षमतांचा विस्तार होईल. (वृत्तसंस्था)

### रोजगार आणि निर्यातीवर होईल परिणाम

ही गुंतवणूक दीर्घकालीन रोजगार आणि आर्थिक मापदंडांना देखील संबोधित करते. २०२४ मध्ये समर्थित २८ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार २०३० पर्यंत अंदाजे ३८ लाखांपर्यंत वाढवावेत. तसेच, २०३० पर्यंत ८० अब्ज डॉलर्सची एकत्रित ई-कॉमर्स निर्यात सक्षम करण्याचेही उद्दिष्ट आहे. याव्यतिरिक्त, १५ दशलक्ष लहान व्यवसायांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा फायदा होईल. ४० लाख सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे शिक्षण दिले जाईल. ■



CMYK

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २६ जून २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



कार्यकर्ता हीच कार्याची चेतनाशक्ती आहे हे नीट समजले तर विचारान्ती हेही उमजेल की, स्नेहपूर्ण व्यवहार, सर्वांनाच आपले मानून काम करण्याचा गुण ही कार्यकर्त्यांतील स्वतःची अशी चेतनाशक्ती आहे.

**- स्व. डॉ. आबाजी थत्ते**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचारक प्रमुख

## विनम्र अभिवादन



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची आज (तिथीप्रमाणे) जयंती



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आज जयंती

# बिल्डरांच्या संगनमताने मुद्रांक शुल्क घोटाळा



**पावसाळी अधिवेशन**

- पाच वर्षांच्या सर्व प्रकरणांची 'एजी'मार्फत चौकशी
- विशेष टास्क फोर्स नेमणार
- दोषी अधिकाऱ्याचे निलंबन नव्हे, थेट बडतर्फी



**मुंबई, २५ जून**

बिल्डरांच्या संगनमताने 'एमआरटीपी कायदा १९६६' आणि 'मुद्रांक अधिनियम १९०८' मधील तरतुदींना डावलून नवी मुंबईतील एका मुद्रांक अधिकाऱ्याने दहा दिवसांच्या कार्यकाळात ८०० हून अधिक दस्तांची बेकायदा नोंदणी करून शासनाचे १३ कोटी ९९ लाख रुपयांचे नुकसान केल्याचे उघड झाले. या गंभीर प्रकरणाची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व मुद्रांक शुल्क प्रकरणांची व्यापक चौकशी करण्याची घोषणा केली. यासाठी विशेष 'टास्क फोर्स' नेमणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शरद पवार गटाचे आमदार आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. संबंधित अधिकाऱ्याने मुद्रांक अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर 'एमआरटीपी कायदा १९६६' आणि 'मुद्रांक अधिनियम १९०८' मधील तरतुदींना डावलून अनधिकृत इमारतींमधील दस्त नोंदवल्याचे तपासात समोर आले. हा प्रकार बिल्डरांच्या संगनमताने नियोजनबद्धपणे घडवलेला घोटाळा असल्याचे मंत्र्यांनी सभागृहात सांगितले. तुर्भे पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले असल्याचे यावेळी मंत्री म्हणाले. अशा अधिकाऱ्यांना सेवेत ठेवणे योग्य नाही. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून या अधिकाऱ्याला कायमचे बडतर्फ करण्यात येईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

अर्धन्यायिक अधिकाराच्या नावाखाली प्रथम जास्त मुद्रांक शुल्क लावून नंतर ते कमी करण्याचे गैरप्रकार राज्यभर घडत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मंत्र्यांनी १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीतील सर्व प्रकरणांची चौकशी महालेखापाल यांच्यामार्फत करण्याचे आदेश दिले. एजींवरील कामाचा ताण लक्षात घेऊन यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार असून त्यासाठीचा निधी व मनुष्यबळ राज्य सरकार पुरवणार आहे. या चौकशीतून दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. १० ते २० हजार कोटींचा घोटाळा उघड होण्याची शक्यता आहे, असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### नवी नियमावली जारी; उल्लंघन केल्यास फौजदारी कारवाई


अर्धन्यायिक अधिकार हे पूर्ण न्यायिक अधिकार नसल्याने अधिकाऱ्यांनी 'स्टॅम्प अक्ट'च्या चौकटीतच काम करणे बंधनकारक असल्याचे मंत्र्यांनी नमूद केले. भविष्यात गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य शासनाने नवी मार्गदर्शक तत्त्वे व शासन निर्णय जारी केला असून, यापुढे नियमबाह्य पद्धतीने 'अडज्युडीकेशन' करणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा महसूलमंत्र्यांनी दिला.

## खाजगी रुग्णालयांतील अव्वाच्या सव्वा दरांना चाप

**मुंबई, २५ जून**

खाजगी रुग्णालयांनी विविध आजारांच्या उपचारांसाठी आकारावयाच्या दरांबाबत राज्य शासनाने धोरण निश्चित करावे, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या आदेशाच्या अनुषंगाने राज्यातील खाजगी रुग्णालयांच्या दरांसंदर्भात धोरण ठरवण्यासाठी लवकरच मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल, अशी घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत केली.

आमदार बापूसाहेब पठारे यांनी विधानसभेत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री आबिटकर यांनी ही माहिती दिली. खाजगी रुग्णालयांना त्यांच्या इमारतीबाहेर उपचारांचे दरपत्रक लावणे बंधनकारक करण्यात आले असून, याच्या अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी राज्यभर तपासणी मोहीम राबवली जाणार आहे, असेही त्यांनी सभागृहात सांगितले. आबिटकर यांनी पुणे जिल्ह्यातील रुग्णालयांत सुविधा वाढवण्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्याचे आश्वासन दिले. (तभा वृत्तसेवा)



व्हेनेझुएलामध्ये झालेल्या भूकंपानंतर अनेक इमारती कोसळल्या, बचावपथकाने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली आहे

# व्हेनेझुएलात भूकंपाने विध्वंस

**रिश्टल स्केलवर ७.५ तीव्रता**

**१७० नागरिकांचा मृत्यू**

**हजारो जखमी**

**काराकास, २५ जून**

व्हेनेझुएलाची राजधानी काराकस आणि ला ग्वायरा राज्यात बुधवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास (भारतीय वेळेनुसार गुरुवारी रात्री ३.३० वाजता) आलेल्या शक्तिशाली भूकंपाने मोठा विध्वंस झाला. ३९ सेकंदाच्या अंतराने दोन भूकंपाचे धक्के जाणवले. अमेरिकन भूकंपशास्त्र विभागानुसार रिश्टल स्केलवर त्याची तीव्रता ७.२ आणि ७.५ इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचे केंद्र काराकासपासून सुमारे १६८ किलोमीटर अंतरावर कॅरिबियन किनाऱ्यावरील मोरोन शहराच्या पश्चिमेला जमिनीखाली १३ किमीवर होते.

भूकंपाची तीव्रता इतकी अधिक होती की, शेकडो इमारती उद्ध्वस्त झाल्या, तर ढिगाऱ्याखालून १७० पेक्षा अधिक नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. व्हेनेझुएलाच्या हंगामी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांनी देशात आणीबाणी जाहीर केली. इमारतीच्या ढिगाऱ्यात हजारो नागरिक अजूनही अडकले आहेत. अनेक महामार्गावर तडे गेले असून संपूर्ण वाहतूक यंत्रणा विस्कळीत झाली आहे. ७.२ आणि ७.५ तीव्रतेच्या भूकंपाने बाधित झालेल्या भागांमध्ये बचाव पथके इमारतींच्या ढिगाऱ्यांमधून लोकांचा शोध घेत असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो.

**अनेक देशाकडून मदतीचा ओघ**

युरोपियन देश आणि अमेरिका आणि दक्षिण अमेरिकन देशांनी व्हेनेझुएलाला सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. ब्राझील, अर्जेंटिना, पेरू, मेक्सिको, कोलंबिया, बोलिव्हिया यांच्यासह अनेक देशांनी औषधी, खाद्यान्न, आदी साहित्य व्हेनेझुएलाकडे रवाना केल्या. (वृत्तसंस्था)

व्हेनेझुएलामध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्तीबद्दल मी शोक व्यक्त करतो. ज्या कुटुंबांनी विनाशकारी भूकंपात आपले प्रियजन गमावले त्यांच्याबद्दल माझ्याकडून संवेदना, कठीण काळात भारत सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. व्हेनेझुएलाला आवश्यक जीवनावश्यक मदत लवकरच पाठवली जाईल.

**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### जपानमध्ये ६.९ तीव्रतेचा भूकंप

जपानमध्येही गुरुवारी भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ६.९ इतकी नोंदवण्यात आली. राजधानी टोकियोमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले, यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आतापर्यंत कोणतीही जीवितहानी अथवा मालमत्तेच्या नुकसानीची माहिती समोर आलेली नाही.

## महत्त्वाचे



### भारताने बांगलादेशला ५ गडी राखून हरवले

**मँचेस्टर, दि. २५ जून-**

महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताने बांगलादेशला ५ गडी राखून हरवित उपांत्य फेरी गाठण्याच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या.

मँचेस्टर येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात १९ चेंडू शिल्लक असताना भारताने हा सामना जिंकला. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने २० षटकांत ८ गडी गमावून १३६ धावा केल्या. प्रत्युत्तरात, शेफाली वर्माच्या ५३ आणि यास्तिका भाटियाच्या २३ धावांच्या जोरावर भारताने १६.५ षटकांत ५ गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले. भारताच्या शेफालीने (३४ चेंडूंमध्ये ५३) शानदार अर्धशतक झळकाविले. जेमिमा रॉड्रिग्जने (२६) आणि यास्तिकाने साथ दिली. भारताच्या विकेट्स नियमित अंतराने पडल्या असल्या तरी, कर्णधार हरमनप्रीत कौर १३ धावांवर नाबाद राहिली. बांगलादेशच्या रितू मोनीने दोन, तर मरुफा अख्तर, रबिया खान आणि नाहिदा अख्तर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

(सविस्तर वृत्त पान ६वर...)

# सिया गोयलच 'मास्टरमाईंड'

## हत्येच्या आदल्या दिवशी कोंढव्यातील कॅफेत आखला कट?



**पुणे, २५ जून**

बांधकाम व्यावसायिक केतन अग्रवाल हत्या प्रकरणात त्याची होणारी पत्नी सिया गोयल हीच या कटाची प्रमुख सूत्रधार असल्याचे तपासात समोर आले आहे. सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांनी केतनला संपविण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे. तसेच हत्येच्या आदल्या दिवशी, १७ जून रोजी, दोघेही कोंढव्यातील लुल्लानगर परिसरातील थर्ड वेव्ह कॅफेमध्ये भेटल्याचे निष्पन्न झाले असून, याच बैठकीत हत्येचा कट रचल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

१८ जून रोजी लोहगड किल्ल्यावरून ढकलून केतन अग्रवालची हत्या करण्यात आली. या प्रकरणी सिया गोयल आणि चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली असून, सध्या दोघेही पोलिस कोठडीत आहेत. सियाला केतनसोबत विवाह करायचा नव्हता. त्यामुळे त्याला कायमचे आपल्या मार्गातून दूर करण्यासाठी तिने प्रियकर चेतन चौधरीची मदत घेतली.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये सिया गोयल आणि चेतन चौधरी दुपारी सुमारे ४.३५ वाजता कॅफेमध्ये प्रवेश करताना दिसतात. त्यानंतर सुमारे एक तास ते तेथे थांबले आणि सायंकाळी साडेपाचच्या सुमारास बाहेर पडल्याचे दिसले.

पोलिसांच्या माहितीनुसार, सियाने युट्युबवर लोहगड किल्ल्याशी संबंधित अनेक व्हिडीओ शोधले होते. या माध्यमातून तिने परिसराची माहिती मिळवून ती चेतन चौधरीला दिल्याचा संशय आहे. कॅफेमधील बैठकीत दोघांनी केतनच्या खुनाबाबत सविस्तर चर्चा केल्याचा संशय पोलिसांना आहे. या प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज, मोबाईलमधील डिजिटल पुरावे, इंटरनेट सर्च हिस्ट्री आणि दोघांमधील कथित संवादांची पडताळणी सुरू आहे.

हा खून अत्यंत शांतपणे आणि पूर्वनियोजित पद्धतीने करण्यात आल्याचे दिसून येते. १७ जून रोजी कॅफेमध्ये झालेल्या बैठकीनंतर दुसऱ्याच दिवशी सिया केतनला लोहगडावर घेऊन गेल्याचे उघड झाले. (तभा वृत्तसेवा)


**हत्येचा घटनाक्रम**

किल्ला फिरून झाल्यानंतर सिया आणि केतन हत्ती तलावाजवळील एका कड्याच्या परिसरात थांबले. हे ठिकाण आधीच निवडण्यात आले होते. केतन बेसावध असताना सियाने थकवा आल्याचे सांगून खाली बसण्याचा बहाणा केला. त्याच वेळी चेतनला ठरलेला संकेत मिळाला आणि त्याने पाऊलवाट ओलांडण्याच्या बहाण्याने केतनला धक्का दिला. त्यानंतर तो दरीत कोसळला. यानंतर सियाने अपघात झाल्याचा बनाव केल्याचा पोलिसांचा दावा आहे. तपास पुढे सुरू असून, आणखी काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आणिबाणीत लोकशाही निर्घृणपणे चिरडली

### पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर घणाघात

### काळा अध्याय देश विसरणार नाही




**नवी दिल्ली, २५ जून**

आणिबाणी हा संविधानावरील थेट हल्ला होता. या काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली गेली, राजकीय नेते, पत्रकार आणि समाजसेवकांना अटक करण्यात आली. लोकशाहीचा पाया असलेल्या संस्थांवर हल्ले झाले. आणिबाणीत लोकशाहीला निर्घृणपणे चिरडले गेले, देशाच्या इतिहासातील हा काळा अध्याय देश कदापि विसरणार नाही अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधान हत्या दिनी काँग्रेसवर टीका केली.

आणिबाणीच्या ५१ व्या वर्षपूर्तीनिमित्त पंतप्रधान मोदी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, आपल्या सर्वांसाठी संविधान १.४ अब्ज भारतीयांच्या आकांक्षा, हक्क आणि कर्तव्यांचे प्रतीक आहे. सरकार न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व आणि घटनात्मक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे. आजचा संविधान हत्या दिन आपल्याला त्या अंधकारमय काळाची आठवण करून देतो, जेव्हा भारतीय लोकशाही निर्घृणपणे चिरडली गेली. तो आपल्याला लोकशाही, संविधान आणि नागरी हक्कांचे रक्षण करण्यासाठी वचनबद्ध राहण्याची प्रेरणा देतो. आणिबाणी हा संविधानावर झालेला थेट हल्ला होता; कारण या काळात नागरी स्वातंत्र्यावर बाधा आली होती. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालण्यात आली आणि भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या संस्थांवर प्रहार करण्यात आला.

दरम्यान, २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या काळात, संविधानाच्या कलम ३५२ अन्वये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणिबाणी लादली होती. केंद्र सरकारने हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# विघ्नवार्तांचे विकृत वारे

विधिमंडळाच्या अधिवेशन काळातील काही कामकाजातून समाजाला सुखावणारे संकेत मिळू लागल्याने समाधानाचे सुस्कारे टाकून काहीतरी चांगले घडत असल्याचा आनंद व्यक्त करण्याची मानसिक तयारी करावी, तोवर एखादी धक्कादायक बातमी कानावर आदळून सारा हिरमोड व्हावा व सामाजिक भविष्याच्या चिंतेने मन कातर व्हावे, असे जे काही अलिकडच्या काळात घडू लागले आहे, ते पाहता अभिमानाने महाराष्ट्राच्या प्रगतीचे गोडवे गावेत की आसपास घडणाऱ्या घटनांमुळे लाजेने मान खाली घालावी, असा प्रश्न पडू लागला आहे. यंदाच्या महाराष्ट्र दिनाचा सोहळा राज्यात सर्वत्र साजरा होत असताना, अशा चिंतेच्या आणि लाजिरवाण्या घटनांच्या मालिकेचा प्रारंभ झाला, ही बाब अधिक दुर्दैवी म्हणावी लागेल. पुणे जिल्ह्यात नसरापूर येथे विकृत पिसाटाने एका अजाण बालिकेला गोठ्यातील वासरू दाखविण्याचे आमिष दाखवून निर्जन जागी बलात्कार केला आणि तिचा खून करून मृतदेह शेणाच्या खाईत लपविला. या घटनेचे वृत्त राज्यात पसरताच जो संतापाचा उद्रेक झाला, त्यामध्ये महाराष्ट्र दिनी गायिली जाणारी राज्यगीते आणि राज्यावर स्तुतिसुमने उधळणारे पोवाडेदेखील खजिल होऊन फिके पडले. त्या नराधमाच्या गुन्ह्याची सजा त्याला विनाविलंब मिळते आहे याचा आनंद मानावा की असे गुन्हे करण्यासाठी धजावणाऱ्या कोणासही कायद्याचा आणि शिक्षेचा धाक राहिला नाही या जाणिवेने खंत करावी, हेच समजेनासे झाले आहे. गुरुवारी या प्रकरणातील नराधम आरोपीच्या गुन्ह्यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. राज्यातील या घटनेतील आरोपीला लवकरात लवकर शिक्षा व्हावी यासाठी त्याच्या विरोधातील खटला सर्वाधिक वेगाने चालविण्याचा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला होता. त्याप्रमाणे या खटल्याचे कामकाज वेगवान झाले. गुरुवारी या विकृताविरोधातील गुन्ह्याचे माप त्याच्या पदरात पडले आणि असा विकृत गुन्हेगार जगण्याच्या लायकीचा नाही, ही समाजाची भावना न्यायासनासमोर अधोरेखित झाली.

जगण्याची लायकी नसल्याचा शिक्का बसू शकेल असे अनेक गुन्हेगार आसपास वावरत असून त्यापैकी काही जण पांढरपेशा समाजाचा चेहरा घेऊनच वावरत असावेत, असे प्रसंग समाजास हादरे देऊ लागले आहेत. मुंबईच्या उपनगरी रेल्वेगाडीतील प्रवास हा प्रत्येक प्रवाशासाठी युद्धाचा प्रसंगच असतो. जगण्याच्या स्पर्धेत धावताना जीव मुठीत घेऊन क्षणोक्षणी संकटाचा सामना करण्याची कसोटी ज्या प्रवासात पार पाडावी लागते. अशाच एका प्रवाशात क्षुल्लक कारणावरून दोघा प्रवाशांमध्ये शाब्दिक वादावादी होते. एक जण संतापाच्या भरात दुसऱ्या प्रवाशाचे जगातील अस्तित्वच पुसून टाकतो हा प्रकार अंगावर शहारे आणणारा आहेच; पण माणसांच्या मनातील विकृतीची बांडगुळे किती फोफावत चालली आहेत, या चिंतेस अधोरेखित करणाराही आहे. पुण्याजवळच्या लोहगडावर पर्यटनास गेलेल्या एका तरुणीने आपल्या नियोजित पतीला धक्का मारून दरीत ढकलून त्याचा जीव घेतल्याच्या बातमीने पुन्हा एकदा महाराष्ट्र हादरला. समाधानाच्या वार्तांची वाट पाहणाऱ्या समाजमनावर अशा विघ्नवार्तांचा मारा सुरू झालेला असताना, प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर सुखावणाऱ्या पर्जन्यसरींचा आनंद उपभोगण्याची किंवा कर्जमुक्तीच्या सोहळ्यास मुहूर्त मिळाल्याच्या वार्तेने समाधानाचे सुस्कारे सोडण्याची संधी हिरावून घेतली आहे, असा याचा अर्थ नव्हे काय?

महाराष्ट्रात पतीच्या नियोजित खुनाची घटना घडते, मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये भरदिवसा हत्या होते, राजधानी दिल्लीत एका निष्पाप बालिकेवर बलात्कार होतो आणि संपूर्ण देश हादरून जातो. रस्त्यावर फुगे विकून कुटुंबाच्या चरितार्थाला हातभार लावणारी ११ वर्षांची कोवळी मुलगी फूटपाथवर झोपेत असताना एका विकृत टॅक्सीचालकाने तिला उचलून नेऊन पाशवी बलात्कार केला आणि तिची निर्घृण हत्या करून मृतदेह जंगलात फेकून दिला. नसरापूरच्या नराधमास शिक्षा सुनावली जात असताना, अशाच विकृतीचा आणखी एक धक्का समाजमन अस्वस्थ करून गेला आहे. अशा घटना घडल्या की काही काळ संताप व्यक्त होतो, निषेधाचे सूर उमटतात, कठोर शिक्षेची मागणी होते आणि समाज पुन्हा आपल्या दैनंदिन व्यवहारात गुंतून जातो. अशा प्रत्येक घटनेनंतर, समाज नेमका कोठे चालला आहे, हा एक प्रश्न मात्र अधिक तीव्रतेने समोर येतो. या घटनांमध्ये केवळ हिंसा नाही तर थंड डोक्याने केलेले नियोजन, दुसऱ्याच्या जीवनाबद्दलची पूर्ण बेफिकिरी आणि पश्चात्तापाचा अभाव दिसून येतो. पूर्वी कुटुंब, समाज, मित्रपरिवार किंवा धार्मिक, सांस्कृतिक मूल्यांच्या प्रभावामुळे या भावनांवर नियंत्रण ठेवले जात असे. आज समाज आणि व्यक्ती यातील अंतर वाढत चालले आहे. संवाद कमी झाला आहे. अभिव्यक्तीचे माध्यम असलेल्या सोशल मीडिया नावाच्या आभासी जगात हजारो मित्र असले, तरी मन मोकळे करण्यासाठी आधाराचा खांदा देणारी माणसे कमी होत आहेत. वृत्तवाहिन्या, सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून दररोज समोर येणारी असंख्य हिंसक दृश्ये, हत्या, अपघात किंवा अत्याचाराच्या बातम्या जलदगतीने लोकांपर्यंत पोहोचतात. एका बातमीने धक्का बसावा तोवर त्याहूनही धक्कादायक वाटणारी दुसरी बातमी आदळत असल्याने संवेदनशीलतादेखील बोथट होऊ लागल्या आहेत. आर्थिक समस्या, बेरोजगारी, व्यसनाधीनता, मानसिक आरोग्याच्या समस्या, कुटुंबव्यवस्थेतील बदल आणि डिजिटल युगातील वेगवान जीवनशैली असे अनेक घटक बदलत्या मानसिकतेची ही विकृत पाळेमुळे पोसत असतात आणि अशा समस्या व्यक्तीच्या वर्तनावर परिणाम करतात, असे मानसशास्त्राचे विश्लेषक सांगतात.

महाराष्ट्रात गुन्ह्यांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. राज्याच्या गृहमंत्री पदाचा कार्यभार सांभाळणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात दिलेल्या माहितीमुळे ही चिंता अधिक गडद झाली आहे. सरकारी उपाययोजना आणि कठोर कायदे कागदावरच आहेत की काय, असे वाटण्याजोगी ही आकडेवारी असल्याने त्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. गुन्हेगारांवरील दोषसिद्धीचे प्रमाण वाढले, शिक्षा देण्याचा वेग वाढला असे सांगून आपली पाठ थोपटून घेण्याचीही आता लाज वाटावी असे चित्र या आकडेवारीत दिसते. महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण तर महाराष्ट्रात कमालीचे वाढले असून संपूर्ण देशाच्या तुलनेत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे, ही मुख्यमंत्र्यांनी दिलेली माहिती चिंता वाढविणारी आहे. महिलांवरील अत्याचार, बलात्कार, बालकांवरील अत्याचार, विनयभंग, मानसिक छळणूक आदी गुन्ह्यांमध्ये समाज भरडून निघत असेल, तर हे सुरक्षित जगण्याच्या हक्कावरील अतिक्रमण ठरते. त्यामुळेच कठोर कायद्यांची नव्हे, तर मजबूत सामाजिक प्रतिबंधक यंत्रणेची आज खरी गरज आहे. सतर्क आणि संवेदनशील सरकारी यंत्रणा, भावनिक शिक्षण आणि संस्कार, कौटुंबिक संवाद, मानसिक आरोग्याबाबत खुलेपणा, स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार आणि डिजिटल माध्यमांचा जबाबदार वापर यावर अधिक भर द्यावा लागेल. कारण कोणत्याही राज्याची आणि तेथील समाजाची ओळख त्याच्या विकास दराने किंवा उंच इमारतींनी ठरत नाही. समाजातील सर्वांत दुर्बल, असुरक्षित आणि निराधार व्यक्ती किती सुरक्षित आहे, यावर त्या राज्याच्या संस्कृतीची आणि सामाजिकतेची ओळख आधारलेली असते. राज्यात घडणाऱ्या क्रूर घटना ही केवळ गुन्हेगारीची आकडेवारी नसून समाजाच्या सामूहिक मनःस्थितीचे ते संकेत आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक प्रगतीच्या शर्यतीत आपण मानवी संवेदनांचा पाया दुर्बल होऊ देत आहोत का, याचा विचार करण्याचे संकेत या घटनांतून दिले जात आहेत. ■

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# अचूक आयकर विवरणपत्राचा मजबूत पाया

काही वर्षांपूर्वीपर्यंत आयकर विवरणपत्र दाखल करताना करदाते प्रामुख्याने फॉर्म १६, बँकेचे व्याज प्रमाणपत्र किंवा आपल्या लेखापालाने तयार केलेल्या उत्पन्नाच्या तपशिलावर अवलंबून असत. करदात्याने दिलेल्या माहितीवरच कर विभागाची पडताळणी होत असे आणि त्यामुळे अनेक व्यवहार नोंदवले गेले नाहीत तरी ते लगेच लक्षात येत नसत. मात्र, गेल्या काही वर्षांत भारतातील करप्रशासनामध्ये मोठा बदल झाला आहे. आयकर विभागाने डिजिटल तंत्रज्ञान, डेटा ॲनालिटिक्स आणि माहितीची स्वयंचलित देवाणघेवाण यांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू केला आहे. आज बँका, पोस्ट ऑफिस, सहकारी संस्था, म्युच्युअल फंड कंपन्या, स्टॉक एक्स्चेंज, शेअर ब्रोकर्स, विमा कंपन्या, नोंदणी कार्यालये, मालमत्ता निबंधक, नियोक्ते आणि विविध सरकारी संस्था करदात्यांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती नियमितपणे आयकर विभागाला सादर करतात. यामुळे आयकर विभागाला तुमच्या आर्थिक व्यवहारांची माहिती तुम्ही आयटीआर दाखल करण्यापूर्वीच उपलब्ध असते. त्यामुळे आयटीआर दाखल करणे म्हणजे केवळ उत्पन्नाची माहिती देण्याची प्रक्रिया राहिलेली नसून, आयकर विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीची पडताळणी करून ती योग्य पद्धतीने जुळविण्याची प्रक्रिया झाली आहे. याच पृष्ठभूमीवर एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस या तिन्ही दस्तऐवजांचे महत्त्व प्रचंड वाढले आहे.

एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएसकडे दुर्लक्ष करणे किती धोकादायक ठरू शकते? अनेक करदाते अजूनही असा समज करून आयटीआर दाखल करतात की, माझ्याकडे जेवढी माहिती आहे तेवढेच उत्पन्न दाखवायचे. परंतु आज ही पद्धत धोकादायक ठरू शकते. जर करदात्याने एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस तपासले नाही, तर त्याचे अनेक गंभीर परिणाम होऊ शकतात.

**१. उत्पन्नाचा एखादा स्रोत नकळत राहू शकतो :** आजच्या काळात एका व्यक्तीकडे अनेक प्रकारचे उत्पन्न असू शकते. उदाहरणार्थ - बचत खात्यावरील व्याज, मुदत ठेववरील व्याज, सहकारी बँकेतील ठेव, पोस्ट ऑफिस ठेव, लाभांश, म्युच्युअल फंडाचे वितरण, शेअर्स विक्रीवरील भांडवली नफा, बाँड्सवरील व्याज, व्यावसायिक मानधन, ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरील उत्पन्न, भाडे उत्पन्न. अनेक वेळा करदाता केवळ मुख्य उत्पन्न लक्षात ठेवतो आणि इतर लहान-मोठे उत्पन्न विसरतो. मात्र ही सर्व माहिती एआयएसमध्ये उपलब्ध असू शकते. आयटीआरमध्ये ही माहिती न दाखविल्यास आयकर विभागाच्या प्रणालीला ती विसंगती सहज लक्षात येते.

**२. टीडीएस जमा : गमावण्याची शक्यता :** अनेक संस्था तुमच्या उत्पन्नावर टीडीएस कपात करतात. पण जर ती माहिती फॉर्म २६एएस मध्ये योग्य प्रकारे तपासली नाही, तर तुम्हाला मिळणाऱ्या कर श्रेयाचा लाभ कमी होऊ शकतो. यामुळे दोन प्रकारचे नुकसान होऊ शकते. पहिले म्हणजे, प्रत्यक्षात भरलेल्या करापेक्षा अधिक कर भरावा लागू शकतो. दुसरे म्हणजे, तुम्हाला मिळणारा आयकर परतावा कमी मिळू शकतो किंवा उशिरा मिळू शकतो.

**३ चुकीच्या माहितीमुळे अनावश्यक कर भरण्याची वेळ येऊ शकते :** अनेक वेळा बँका किंवा इतर संस्थांकडून चुकीची माहिती आयकर विभागाकडे अपलोड होते. उदाहरणार्थ - एखादा व्यवहार दोनदा रिपोर्ट होणे, चुकीच्या पॅनवर व्यवहार दाखविला जाणे, व्यवहाराची रक्कम चुकीची नोंदविणे, संबंधित नसलेले उत्पन्न दिसणे. जर एआयएस तपासले नाही आणि त्यावर अभिप्राय दिला नाही, तर पुढे त्याच चुकीच्या माहितीच्या आधारे कर आकारणी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

**४. उच्च मूल्याच्या व्यवहारांवर आयकर विभागाचे लक्ष जाऊ शकते :** आयकर विभागाला वित्तीय व्यवहारांचे विवरण (एसएफटी) अंतर्गत अनेक प्रकारच्या व्यवहारांची माहिती नियमितपणे मिळते.

**उदाहरणार्थ** - मोठ्या रकमेची बँकेत रोकड जमा, मुदत ठेवी, उच्च मूल्याचे क्रेडिट कार्ड व्यवहार, शेअर्स किंवा म्युच्युअल फंडातील मोठी गुंतवणूक, मालमत्ता खरेदी किंवा विक्री, परदेशी प्रवासावरील खर्च, रोख स्वरूपातील मोठे व्यवहार. जर अशा व्यवहारांची माहिती एआयएसमध्ये उपलब्ध असूनही त्यास अनुरूप उत्पन्न किंवा निधीचा स्रोत आयटीआरमध्ये स्पष्ट केला गेला नाही, तर आयकर विभाग त्या व्यवहारांबाबत स्पष्टीकरण मागू शकतो.

**५. संगणकीय पडताळणी अधिक प्रभावी झाली आहे :** पूर्वी कर विवरणपत्रांची तपासणी प्रामुख्याने मानवी अधिकाऱ्यांकडून केली जात असे. आज मात्र आयकर विभाग अत्याधुनिक डेटा ॲनालिटिक्स प्रणालीचा वापर करतो. ही प्रणाली खालील बाबींची तुलना करते - आयटीआरमधील माहिती, एआयएसमधील माहिती, टीआयएसमधील सारांश, फॉर्म २६एएसमधील कर जमा, एसएफटी व्यवहार, टीडीएस/टीसीएस माहिती, विविध संस्थांनी सादर केलेली माहिती. यामध्ये अगदी किरकोळ विसंगतीदेखील प्रणालीच्या निदर्शनास येऊ शकते.

**६. नोटीस, चौकशी किंवा स्पष्टीकरणाची शक्यता वाढते :** जर आयटीआरमध्ये दाखविलेले उत्पन्न आणि आयकर विभागाकडे उपलब्ध माहितीमध्ये फरक आढळला, तर करदात्याला पुढीलपैकी कोणत्याही प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते - ई-मेलद्वारे सूचना, स्पष्टीकरण मागविणे, सुधारित विवरणपत्र दाखल करण्याची गरज, अतिरिक्त कर व व्याज भरण्याची वेळ, काही प्रकरणांमध्ये दंडात्मक कार्यवाही.

**सल्ला :** आजच्या डेटा-आधारित करप्रणालीमध्ये "जे व्यवहार आयकर विभागाला माहीत आहेत, तेच व्यवहार तुमच्या आयटीआरमध्येही अचूकपणे प्रतिबिंबित झाले पाहिजेत." हा कर अनुपालनाचा मूलभूत सिद्धांत झाला आहे. म्हणूनच आयटीआर दाखल करण्यापूर्वी एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस यांची काळजीपूर्वक पडताळणी करणे ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून, योग्य कर अनुपालन, जलद परतावा, अनावश्यक नोटिसांपासून बचाव आणि आर्थिक पारदर्शकतेची खात्री करण्यासाठी अत्यावश्यक पाऊल आहे. लक्षात ठेवा - आयटीआर दाखल करण्यासाठी काही मिनिटे लागतात; पण एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस तपासण्यासाठी खर्च केलेली काही अतिरिक्त मिनिटे भविष्यातील अनेक महिने चालणारा कर-विवाद टाळू शकतात. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# नागरिकांनो, उजव्या बाजूने चालणे शिका

रस्त्यावर फूटपाथ नसेल तर पादचाऱ्यांनी उजव्या बाजूने चालावे. जेणेकरून समोरून येणारी वाहने स्पष्ट दिसतील. पण आजही आपण डाव्या बाजूने चालतो अन् स्वतःवर मोठे संकट ओढवून घेतो. म्हणूनच काळानुरूप बदल करून नागरिकांनो, उजव्या बाजूने चालणे शिका ही बाब समजून घेणे गरजेचे झाले आहे. भारतात वाहनांद्वारे रस्त्यावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांना चिरडण्याचे प्रमाण वाढत आहे. हा प्रकार देशासाठी भूषणावह नाही. मग आपण नेमके केव्हा सुधारणा करणार आहोत, यावर मंथन करायला हवे. खापरखेड्यात एक महिला डाव्या बाजूने रस्त्यावरून पायी जात होती. अन् त्याचवेळी दुचाकीसुद्धा तिच्या मार्गाने समोर जात होती. त्या दुचाकीचालकाने तिला मागून धडक दिली अन् ती महिला हकनाक मृत्युमुखी पडली. समजा ती महिला उजव्या बाजूने जात असती तर कदाचित तिचा अपघात टळला असता. कारण जेव्हा पादचारी उजव्या बाजूने चालतो तेव्हा त्याला समोरून येणारी वाहने स्पष्टपणे दिसतात. तो स्वतःला सावरू शकतो. डाव्या बाजूने चालताना त्याला वाहने दिसत नाहीत. यामुळे आता स्वतःला सुरक्षित ठेवायचे असेल तर प्रत्येकाला उजव्या बाजूने चालणे शिकावेच लागेल. मात्र वाहनांनी डाव्या बाजूनेच समोर जावे.

दरम्यान, रस्त्यावरून चालताना मित्रांसोबत किंवा कुटुंबासोबत पसरून न चालता एका मागे एक असे रांगेत चालावे. पादचाऱ्यांनी ट्रॅफिक सिग्नल बंद झाल्यावरच रस्ता ओलांडायला हवा. रस्ता ओलांडण्यापूर्वी आधी उजवीकडे, मग डावीकडे आणि पुन्हा उजवीकडे पाहून वाहन येत नसल्याची खात्री करून पुढे जावे. रस्ता ओलांडताना कधीही अचानक धावू नका. शांतपणे आणि सावधगिरीने रस्ता पार करा. रस्त्यावरून चालताना मोबाईलचा वापर करू नका. वाहनांच्या मागे उभे राहू नका. थांबलेल्या वाहनाच्या अगदी मागच्या बाजूने कधीही रस्ता ओलांडू नका. ट्रॅफिक सिग्नलचे नियम पाळा, जीवनातील संभाव्य धोका टाळा...! ही साधी बाब सुशिक्षित म्हणवून घेणारे पाळत नाहीत. परिणामी अपघात घडतात आणि शेकडो लोक जायबंदी होऊन आयुष्यभर रडत बसतात. तसे पाहता यमाचा फारच विचित्र खेळ आहे. तो वेगाने वाहन चालविणाऱ्या आणि चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणाऱ्यांवर नेहमीच प्रसन्न राहतो. एवढेच नव्हे तर मद्य प्राशन करून, वेगाने वाहन चालविण्यासाठी आणि सिग्नल तोडण्यासाठी तो चालकांना सतत उद्युक्त करीत असतो. त्याची ती चाल कुणालाही समजत नाही. याकरिता अपघात हा अत्यंत सोपा मार्ग त्याला मिळाला आहे. कारण लोक आता व्यायाम, दर्जेदार औषधोपचार, चांगली दिनचर्या ठेवत स्वतःचे आयुर्मान वाढवीत आहेत. पण अपघात घडू नये याकरिता आजही १०० पैकी ९९ लोक कृती सोडा विचारही करीत नाहीत. यामुळे मानवी चुकांमुळे रस्ते अपघात वेगाने वाढत आहेत. अपघात झाल्यावर दोन दिवस शोक केला जातो. त्यानंतर पुन्हा शोक व्यक्त करणारेच मानवी चुका करायला सज्ज राहतात. वाहतूक पोलिसांची यंत्रणा अपघात रोखण्यासाठी नव्हे तर हेल्मेट, सीटबेल्टवर लक्ष ठेवत महसूल गोळा करण्यावर भर देतात. हेल्मेट आणि सीटबेल्ट न घातल्यास त्याच माणसाचा जीव जाईल. इतरांशी काहीच देणे घेणे नसते. यामुळे त्या माणसाची काळजी करण्यापेक्षा वाहनचालकांनी हळुवारपणे गाडी चालवावी यावर पोलिसांनी भर द्यायला हवा. समजा कुणी वेगाने आणि सिग्नल तोडून जात असेल तर त्याच्यावर दहा पट दंड आकारून कारागृहात पाठविण्याची तरतूद करायला हवी. समजा पोलिसांना जमत नसल्यास काही महिन्यांसाठी हे कार्य प्रायोगिक तत्त्वावर भारतीय सैन्याला दिले जावे. नागपूर जिल्ह्यातील कामठीच्या सैन्य छावणी भागातून कुठल्याही वाहनचालकाने ताशी ३० किलोमीटरपेक्षा वेगाने वाहन चालवून दाखवावे अन् १ लाख रुपये बक्षीस मिळवावे. कारण तिथे समजा एखाद्याने वेगाने वाहन चालविले तर लष्करी जवान त्याचे जे हाल करतात त्याच स्वरूपातील शिक्षा चूक करणाऱ्या चालकांना करायला हवी. समजा हा प्रयोग सुरू झाला तर भारत देश अपघातमुक्त होईल. कारण सैन्यातील जवान नियम पाळण्यात अग्रेसर असतात. त्यांच्या हाती वाहतूक व्यवस्था दिल्यास नक्कीच देशात चमत्कार घडेल. शेवटी आज ना उद्या अपघात रोखण्यासाठी आपल्याला सैन्याची मदत घ्यावीच लागणार आहे. मग ती मदत आजच का नाही, याचाही विचार प्रशासनाने करायला हवा. ■

९८८१७१७८५९

## प्रासंगिक

**गजेंद्र सिंह शेखावत**

# स्वातंत्र्याचे स्मरण का महत्त्वाचे आहे?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकदा म्हटले होते : ''संविधान हा केवळ वकिलांचा दस्तावेज नाही; ते जीवनवाहक आहे आणि त्याचा आत्मा, सदैव त्या युगाचा आत्मा असतो.'' संविधान म्हणजे फक्त देशाच्या कारभाराचे नियमन करणारी कायदेशीर चौकट नसून, नागरिक आणि संस्था, अधिकार आणि जबाबदाऱ्या, स्वातंत्र्य आणि उत्तरदायित्व यांच्यातील एक जिवंत बांधिलकी आहे. संविधानातील लोकशाही मूल्यांचे मर्म आपल्या सांस्कृतिक परंपरांमध्ये खोलवर रुजलेले आहे. शतकानुशतके आपल्या समाजाने विचारमंथन, सामूहिक चर्चा-विमर्श आणि सार्वजनिक सहभाग यांच्या संस्था जोपासल्या. मात्र, हेही लक्षात घ्यायला हवे की भारताला लोकशाही वारशाने मिळाली नाही. आपण ती जोपासली. संविधानाची उद्देशिका ही आपली संवैधानिक दिशादर्शक आहे. त्याचवेळी, इतिहास आपल्याला आठवण करून देतो की लोकशाहीला कधीही गृहीत धरू नये.

१९७५-७७ ची आणिबाणी ही स्वतंत्र भारतासमोरच्या सर्वांत महत्त्वाच्या कसोट्यांपैकी एक आहे. संवैधानिक चौकटीचे सुरक्षाकवच दुर्बळ केले जाते, सार्वजनिक स्वातंत्र्याचा संकोच केला जातो तेव्हा लोकशाही संस्थांवर कसा ताण येऊ शकतो हे, या आणिबाणी काळाने दाखवून दिले. त्या कालखंडाचा परिणाम राजकीय क्षेत्राच्या पलीकडेही जाणवला. त्याने देशभरातील नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याला स्पर्श केला. त्या काळातील अनुभव नागरिकांना कायम स्मरण करून देतात, की घटनात्मक अधिकार हे सुरक्षाकवच आहे, जे नागरिकांची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य आणि दैनंदिन आयुष्याला थेट आकार देतात. हे अधिकार काढून घेतले जातात तेव्हा केवळ संस्थांचेच नुकसान होत नाही, तर सामान्य माणसे, कुटुंबे आणि समुदाय यांचे स्वातंत्र्य आणि आकांक्षा यावरही अत्यंत खोलवर परिणाम होतो. एक मात्र खरे की, आणिबाणी काळाचा सर्वांत मोठा धडा असा की, संकटकाळात लोकशाहीवादी जनतेने दिलेला लढा अतिशय चिवट होता.

देशातल्या जनतेने त्या काळात, संवैधानिक मार्गांवर अद्वितीय निष्ठा दाखवली. हीच भारतीय लोकशाहीची एक मोठी शक्ती आहे. या प्रसंगाचे औचित्य साधून, तयार करण्यात आलेले एक विशेष प्रदर्शन, या स्मृतिसोहळ्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. या प्रदर्शनात भारताच्या लोकशाहीने पाहिलेल्या सर्वांत आव्हानात्मक काळाचे दर्शन घडते. आणिबाणीच्या काळातील लेख, साहित्य, दस्तावेज, प्रतिकाराच्या कथा, त्यातील संवैधानिक टप्पे आणि लोकांचे अनुभव या सगळ्याचे चित्रण यात बघता येईल. या कार्यक्रमाचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे पद्मभूषण ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक राम बहादूर राय यांचे विशेष स्मृती व्याख्यान. लोकशाहीमधील सजगता आणि लोकशाही मूल्यांचे पुनरुज्जीवन, ही व्यापक संकल्पना, या व्याख्यानात, तत्कालीन काळाच्या संदर्भातून समजावून सांगितली गेली आहे. स्वातंत्र्यानंतर जवळपास आठ दशकांनी देखील, लोकशाहीचे नवनवे अर्थ विकसित होत आहेत. आर्थिक समावेशन, तळागाळातील सहभाग आणि नागरिक-केंद्री शासन यांना चालना देणाऱ्या उपक्रमांनी लोकशाही संस्थांची व्याप्ती विस्तारली आहे. त्याचवेळी, नागरिकत्वाची जबाबदारी आणखी महत्त्वाची बनली आहे.

या समारोप समारंभाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, लोकशाही ही एक जिवंत आणि विकसित होत जाणारी राष्ट्रीय प्रक्रिया आहे, अनुभव आहे ही व्यापक सार्वजनिक समज. डिजिटल डिस्ट्रिक्ट रिपॉझिटरी म्हणजेच, डिजिटल जिल्हा भंडारवरील प्रदर्शन- हा २०२१ साली 'आझादी का अमृत महोत्सव'च्या सोहळ्यांतर्गत सुरू करण्यात आलेला अग्रगण्य उपक्रम. सांस्कृतिक मंत्रालयाने स्वातंत्र्यलढ्यातील अशा अनाम वीरांच्या कथांवर आधारित दहा लघुपटही तयार केले आहेत. डीडीआरच्या संकेतस्थळावर अशा १९,५०० पेक्षा अधिक प्रेरक कथा उपलब्ध आहेत.

डीडीआरच्या या उपक्रमात मदत करणाऱ्या संस्था आणि विभागांपैकी, सांस्कृतिक मंत्रालयाअंतर्गत असलेली एक स्वायत्त संस्था म्हणजे सांस्कृतिक संसाधने आणि प्रशिक्षण केंद्र यांनी स्वातंत्र्यलढ्याच्या अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या अनेक कथांचे दस्तावेजीकरण आणि क्युरेशन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. धैर्य, त्याग आणि सेवेचे जिवंत मूर्तिमंत स्वरूप म्हणून आपल्यासमोर उभे असलेले दोन हयात स्वातंत्र्यसैनिक या कामात मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यासाठी आपल्याला लाभले आहेत. महाराष्ट्राचे शेषराव लक्ष्मणराव खोत, जे विद्यार्थी असताना हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभागी झाले होते आणि आंध्र प्रदेशचे एडुला सूर्यनारायण रेड्डी, जे लहानपणीच स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते आणि वयाच्या अकराव्या वर्षी त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यांची उपस्थिती आपल्याला आठवण करून देते की, स्वातंत्र्य हा दूरचा इतिहास नसून आपल्यासाठी एक जिवंत स्मृती आहे.

वारसा आणि सांस्कृतिक सातत्य

या सगळ्या उपक्रमांना पूरक आहे, ती वारसा या उपक्रमाची अकरावी आवृत्ती. पिढ्यानपिढ्यांचा संवाद, विविधता आणि सामाजिक सोहार्द फुलवणाऱ्या सांस्कृतिक परंपरा, कलात्मक अभिव्यक्ती आणि सामायिक वारसा यांचा गौरव या उपक्रमातून करण्यात आला आहे. स्वातंत्र्यसैनिक, सांस्कृतिक ज्ञान असलेल्या कमलादेवी चट्टोपाध्याय यांच्या स्मृतींचा गौरव यात करण्यात आला आहे. या अत्यंत उमद्या सादरीकरणांचा आधार, अनेक पिढ्या, प्रदेश आणि विचारधारा यांच्यातील शतकानुशतकांच्या संवादातून विकसित झालेल्या संगीत परंपरा हा आहे. ''एनाजोरी : लोकनाद-जनजातीय समरसता का स्वर-संगम'' हा कार्यक्रम, आसाम आणि एकूणच ईशान्य भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरांचा सन्मान करणारा आहे. त्याशिवाय महत्त्वाची ठरते ती सीसीआरटीमधील विद्वानांची विशेष विषयाधारित प्रस्तुती, ''मौनातून आवाजाकडे, तमातून प्रकाशाकडे.'' भारतीय शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून, भीती आणि दडपशाहीपासून धैर्य, नवनिर्मिती आणि लोकशाही पुनरुज्जीवनापर्यंतचा प्रवास या कार्यक्रमातून उलगडला आहे.

या स्मृतिसोहळ्याशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे महर्षी दयानंद सरस्वती कला गुरुकुल आणि कलाग्राम याची पायाभरणी. भारताच्या कलात्मक वारशाचा अभ्यास करण्यासाठी या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यामागे प्राचीन गुरुकुल पद्धतीची प्रेरणा आहे. संविधान हत्या दिनाच्या स्मृती समारोप कार्यक्रमाशी संबंधित हे सर्व उपक्रम, एक समान संदेश देतात. तो असा की, लोकशाही ही एक जिवंत परंपरा आहे. ती सार्वजनिक सहभागाने टिकून राहते आणि वेळ आल्यावर, सजग, जागरूक नागरिक तिचे संरक्षण करतात. आज जेव्हा आपण २०४७ मधील स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे दमदार वाटचाल करत आहोत, अशा वेळी हाच स्फूर्तिभाव नव्या निर्धाराने पुढे घेऊन जाऊया! ■

(लेखक केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री आहेत.)

### प्लॅस्टिकच्या नोटा कधी येणार?

भारतातील रिझर्व्ह बँक कागदी नोटांऐवजी प्लॅस्टिकच्या नोटा आणण्याचा विचार करत आहे. भारतात या आधी २०१२ मध्ये तत्कालीन मनमोहन सिंग सरकारने काही निवडक शहरांत दहा रुपयांच्या प्लॅस्टिक नोटांचा प्रायोगिक वापर केला होता. लागणाऱ्या प्रचंड खर्चाचा विचार करता हा प्रकल्प थांबविण्यात आला. सध्या कागदी नोटा छापायला येणारा प्रचंड खर्च आणि त्यांच्या खराब होण्याचे प्रमाण बघता रिझर्व्ह बँक पुन्हा प्लॅस्टिक नोटांबाबत प्रक्रिया सुरू करण्याचा गांभीर्याने विचार करत आहे. सुरुवातीला दहा आणि वीस रुपयांच्या नोटांसाठी हा प्रकल्प असण्याची शक्यता आहे. जगभरातील जवळपास साठ देश प्लॅस्टिक नोटांचा वापर करत आहेत. या नोटा पॉलिप्रोपिलीनपासून बनवल्या जातात. प्लॅस्टिकच्या नोटा कागदी नोटांच्या तुलनेत तीन ते पाचपट जास्त काळ टिकतात. या नोटा फाटत नाहीत आणि पाण्यात भिजल्या तरी खराब होत नाहीत. त्यांच्यावर डाग पडण्याची शक्यता कमी असते. त्यांच्यात अत्याधुनिक रक्षाप्रणाली असल्याने बनावट प्लॅस्टिकच्या नोटा तयार करणे फार कठीण आहे. या नोटांवर धूळ साचत नाही आणि स्वच्छ करणे सोपे आहे. धार्मिक कार्याच्या शेवटी गुरुजींना दक्षिणा देताना पाण्यात भिजवून द्यावी लागते. सध्या कागदी नोटा असल्याने त्या न भिजवता फक्त नाणी भिजवून दक्षिणा दिली जाते. प्लॅस्टिकच्या नोटा आल्यानंतर त्या समस्येतूनही यजमानांची सुटका होणार आहे. केंद्र सरकार रिझर्व्ह बँकेच्या सहकार्याने कागदी चलन टप्प्याटप्प्याने बंद करून प्लॅस्टिक नोटा आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**डॉ. मदन काकडे**/नागपूर

■■■

### मराठी शाळेतील गळती रोखण्याची गरज

राज्यात मराठी माध्यमात पहिलीत प्रवेश घेतलेल्या दहा मुलांपैकी अवघी सहा मुले बारावीपर्यंत शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहतात. चार मुले मध्येच शिक्षण सोडतात. देशाच्या नीती आयोगाच्या अहवालातील ही आकडेवारी शिक्षण व्यवस्थेची धोरणे कशी अपयशी ठरलेली आहेत यावर थेट

## वाचक पत्रे



बोट ठेवते. ही केवळ ड्रॉपआऊट मुलांची संख्या नाही. तर मुलांच्या शिक्षणाच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली आहे, त्याची नोंद आहे. शिक्षणाचा अधिकार देऊन इथल्या व्यवस्थेने वंचित समूहातील मुलांना नाकारून केलेल्या विश्वासघाताचीही कबुली दिली आहे. खर्चात सातत्याने केली जाणारी कपात, ग्रामीण भारतातील शाळांची झालेली दयनीय अवस्था, शिक्षकांची कमतरता, विविध घटकांचा अवाजवी हस्तक्षेप, अशैक्षणिक तत्त्वांनी बिघडलेले शैक्षणिक वातावरण, देशभर ठिकठिकाणी शाळा बंद केल्याने घरापासून दूर गेलेले शिक्षण, महागडे होत गेलेले पुढील शिक्षण या सगळ्यांनी लाखो मुलांना शिक्षणातून शाळेबाहेर ढकलले आहे. नवनवीन योजना जाहीर करताना शाळेत आलेली मुले टिकतील, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल यासाठी आवश्यक असलेली मूलभूत व्यवस्था उभारण्याची इच्छाशक्ती इथल्या व्यवस्थेच्या मनात दिसत नाही. पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सक्तीच्या मोफत शिक्षणाची कमी शिक्षण कायदा देतो. या कायद्यात बदल करून ही बाब पहिली ते बारावीपर्यंत करायची आहे. सरकारने देशाच्या भावी पिढ्या घडवणाऱ्या शिक्षणाकडे यापुढील काळात अधिक गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

■■■

### फेक नॅरेटिव्ह, एक गंभीर समस्या

आजच्या डिजिटल युगात 'फेक नॅरेटिव्ह' म्हणजे खोट्या, दिशाभूल करणाऱ्या किंवा अर्धसत्य माहितीचा वापर करून लोकांच्या मनात, समाजात विशिष्ट विचार किंवा भीती निर्माण करण्याचे तंत्रज्ञान असून वर्तमानात हे गंभीर आव्हान ठरले आहे. खोटे मजकूर, खोटे व्हिडिओ, सोशल मीडियामार्फत काही क्षणात लाखो लोकांपर्यंत पोहोचतात, ज्यामुळे लोकांचे सामूहिक वर्तन, मानसिक स्वास्थ्य बदलू शकते. आध्यात्मिक आणि तात्त्विक दृष्टिकोनातून समर्थ रामदास स्वामींनी दासबोधामध्ये विविध भ्रमांचा उल्लेख केला आहे. अहंकार, अज्ञान आणि मी-पणा यातून अनेक गैरसमज किंवा भ्रम निर्माण होतात, ज्यामुळे मनुष्य सत्यापासून दूर जातो. तेव्हा या गंभीर समस्येकडे लोकांनी सद्सदविवेकबुद्धी जागृत ठेवून किंवा त्याचा वापर करून अशा माहिती किंवा बातमीची सत्यता तपासणीची, पडताळणीची सवय लावून घेतली पाहिजे व अधिकृत स्रोतांवर, वृत्त वाहिन्या, सरकारी वेबसाईट किंवा विश्वासार्ह माध्यमांवरच्या माहितीचा व बातम्यांना ग्राह्य धरले पाहिजे आणि या समस्येविरुद्ध लढण्यासाठी समाजात 'गंभीर विचार' आणि जागरूकता निर्माण करणे ही खरी काळाची गरज आहे. ■

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### अभ्यासाबरोबरच खेळात प्रगती करा : सत्येन जाधव



**सोलापूर, दि. २५ जून-** संगमेश्वर कॉलेज व रात्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व जिमखाना विभागाच्या वतीने २३ जून आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन साजरा करण्यात आला. यावेळी निवृत्त तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव यांनी ऑलिंपिकचा संपूर्ण इतिहास व सध्याची भारताची ऑलिंपिकमधील कामगिरी याबद्दल माहिती दिली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी शालेय व महाविद्यालयीन जीवनापासूनच अभ्यासासोबत खेळामध्ये ही प्रगती केली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीनिवास गोठे होते. प्राचार्य डॉ. गोठे यांनी सर्वांनी दररोज व्यायाम करावे जेणेकरूण आपले शरीर हे नेहमी निरोगी व तंदुरुस्त राहील. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरण वांगी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. संतोष खेंडे आणि आभार प्रा.विक्रांत विभुते यांनी मांडले. श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्र. प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.




### ऑलिपिकपटू बंडा पाटील यांचा खाशाबा जाधव पुरस्काराने गौरव

**कोल्हापूर, दि. २५ जून-** ऑलिम्पिक दिनानिमित्त ध्रुवतारा फाऊंडेशनकडून दिला जाणारा मानाचा चौथा खाशाबा जाधव पुरस्काराने ऑलिम्पिकपटू बंडा पाटील यांचा गौरव करण्यात करण्यात आला. देशाचे भूषण खाशाबा जाधव यांना पदमविभूषण तर मला शिवछत्रपती पुरस्कार मिळाला पाहिजे अशी अपेक्षा बंडा पाटील यांनी व्यक्त केले. कोल्हापूरातील ऐतिहासिक जिल्हा परिषद संचालित मेन राजाराम हायस्कूल सभागृहात क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांच्या हस्ते बंडा पाटील यांना शाल. श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख हजार रूपयांने सन्मान करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक मनिष झंवर, रोहित मुसळे, क्रीडा अधिकारी अरूण पाटील, प्राचार्य गजानन खाडे, लेखक संजय दुधाणे , वस्ताद बाबा महाडिक, शहाजी सूर्यवंशी आदी मान्यवर उपसथित होते. राष्ट्रीय खो-खो खेळाडू सानिका चाफे, अमृता पाटील, श्रावणी पाटील, कुस्तीगीर पृथ्वीराज मोहिते, क्रीडा प्रशिक्षक भीमा भांदिगरे यांचाही या विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुषमा पाटील यांनी केले. आरोग्यसेवक राजेंद्र मकोटे यांनी आभार मानले.

### सोलापूर जिल्हा स्क्वॅश स्पर्धा आज

**सोलापूर, दि. २५ जून -** ११, १३, १५, १७ आणि १९ वर्षांखालील मुले व मुली, महिला आणि पुरुष गटाची जिल्हा निवड चाचणी स्पर्धा शुक्रवार, २६ जून रोजी सकाळी १० वाजता पार्क स्टेडियम येथील स्क्वॅश कोर्टवर होईल. इच्छुक खेळाडूंनी सोबत वयाचा पुरावा आणि आवश्यक क्रीडा साहित्यासह उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी श्रीधर गायकवाड (७३८५८७३४६०), गंगाराम घोडके (९४२३७१७२७७) किंवा संतोष पाटील (९१५६२३०००९) यांच्याशी संपर्क साधावा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**झेरॉक्स मशीन भाड्याने घेणे**

वरिष्ठ मंडळ परिचालन व्यवस्थापक, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत. निविदा क्रमांक OPTG-T-STR-X अंतर्गत सोलापूर येथील कंट्रोल ऑफिस, सोलापूर स्टेशनवरील उप-स्टेशन व्यवस्थापक यांचे कार्यालय आणि वाडी स्टेशनवरील उप-स्टेशन व्यवस्थापक यांचे कार्यालय येथे 24 X 7 सेवेसाठी कंत्राटदाराच्या स्तरावर कागद आणि संपूर्ण देखभालीसह (comprehensive maintenance) झेरॉक्स मशिन्स (Digital Photocopier) भाड्याने घ्यायच्या आहेत. हे कंत्राट 2 वर्षांच्या कालावधीसाठी असेल. या कामाचा अंदाजित खर्च रु. 3457280.00 असून बयाणा रक्कम रु. 69200.00 आहे. हे काम पूर्ण करण्याचा कालावधी 24 महिने असून देखभाल कालावधी छळश्र आहे. www.ireps.gov.in या वेबसाईटवर टेंडर अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ 13/07/2026 रोजी दुपारी 14.30 वाजेपर्यंत आहे, तर टेंडर उघडण्याची तारीख आणि वेळ 13/07/2026 रोजी दुपारी 15.00 वाजता आहे. निविदाधारकांनी कोणत्याही बदल किंवा शुद्धीपत्रकासाठी (असल्यास) टेंडर बंद होण्याच्या तारखेपर्यंत वेळोवेळी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**वरिष्ठ मंडळ परिचालन व्यवस्थापक, मध्य रेल्वे, सोलापूर**
ANJ-23
**सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करू नका.**

# मानस गायकवाड व सान्वी गोरे यांना विजेतेपद

### *विविध वयोगटात आयुष, नियान, पृथा व ईशा अव्वल

### आय.एम.एस. चषक जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून -** 'आय. एम. एस. चषक' १७ वर्षाखालील गटाच्या जिल्हास्तरीय खुली व मुलींच्या निवड बुद्धिबळ स्पर्धेत अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस गायकवाड याने उत्कृष्ट खेळाच्या जोरावर सहा पैकी सहा गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले तर आदिराज म्हेत्रेने आकर्षक खेळत साडेपाच गुणांसह दुसरे स्थान प्राप्त केले.

तसेच मुलींच्या गटात चुरशीने झालेल्या स्पर्धेत बार्शीची राष्ट्रीय खेळाडू सान्वी गोरे व अनन्या उलभगत यांचे प्रत्येकी पाच पैकी साडेचार गुण मिळिवले. परंतु टायब्रेकरमध्ये सरस बुचोल्स गुणांसह सान्वीने जेतेपद तर अनन्याने द्वितीय क्रमांक पटकाविला. चौघांचीही निवड मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे. तसेच आयुष जानगवळी, नियान कांदिकटला, पृथा ठोंबरे व ईशा पटवर्धन यांनीदेखील आकर्षक खेळ करत अनुक्रमे १२ व ८ वर्षांखालील गटात अव्वल स्थान मिळिवले. सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने चॅम्प चेस स्कूल व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने इंडियन मॉडेल स्कूल येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मॉडेल पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका आदिती कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली व आय.एम. एस. स्कूलचे समन्वयक सचिन ढवण, राष्ट्रीय पंच संतोष पाटील, स्पर्धेचे प्रमुख पंच उदय वगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक चषक व पदके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहाय्यक पंच म्हणून प्रज्वल कोरे, पद्मजा घोडके आदींनी काम पाहिले. मिथिलेश होर्टीकरला उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

विजेत्या खेळाडूंचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, इंडियन मॉडेल्स स्कूलचे संस्थापक सचिव अमोल जोशी, श्री. साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, आंतरराष्ट्रीय पंच व मार्गदर्शक सुमुख गायकवाड व अतुल कुलकर्णी आदींनी अभिनंदन केले.

**अंतिम निकाल (अनुक्रमे क्रमांक, गुण व बोकोल्स गुणांसह):**

**खुला गट:** मानस गायकवाड-६,आदिराज म्हेत्रे-५.५,नागेश राजमाने- ५(२०),प्रतीक वल्लाकट्टी-५(१८), देवदत्त पटवर्धन-४.५.

**१७ वर्षे मुली:** सानवी गोरे-४.५(१४.५), अनन्या उलभगत-४.५(१२.५),श्रावणी देवनपल्ली-४(१४.५),तेजल चीलगुंडे-४(१२),प्रतीक्षा चाबुकस्वार-३

**१२ वर्षे मुले:** आयुष जानगवळी-५,मयूर स्वामी-४.५,श्रेयस कुदळे-४(२५),श्रेयश इंगळे-४(२२.५),आदित्य जानगवळी-४(२०.५). **मुली:** पृथा ठोंबरे-४(१२.५),सानवी होर्टीकर-३,स्वराली बिराजदार-२(१४.५),अनुष्का शिंदे-२(१३.५),ओजस्वी बोराळे-२(१२)

**८ वर्षे मुले:** नियान कंदीकटला-४(२२.५), आरुष माने-४(१८),आयुष बदवने-३(२०.५),कृष्णराज पटाले-३(१९),अद्विक ठोंबरे-३(१६.५). **मुली:** ईशा पटवर्धन-३,अधिरा रोकडे-२(११),त्रिशा पाडुळे-२(१०),हिंदवी मोरे-१.

## चंदू पवार व सातोसकर संघांचे शानदार विजय

### लिटिल चॅम्प १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा : आर्यन जाधव, अब्दुल्ला शेख सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून -** लिटिल चॅम्प बारा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत सकाळच्या सत्रात झालेल्या पहिल्या सामन्यात चंदू पवार संघाने वासू मुदियार संघावर ४ गडी राखून मात केली. दुपारच्या सत्रात झालेल्या दुसऱ्या सामन्यात सातोसकर संघाने चंदू खाडिलकर संघावर ३४ धावांनी शानदार विजय मिळवला.

जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत नाणेफेक जिंकून चंदू पवार संघाने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना वासू मुदियार संघाचा डाव २४.१ षटकांत अवघ्या ७२ धावांवर आटोपला. त्यांच्या अरविंद तेगेलीने १८ आणि नील कोंडाने १० धावा केल्या. चंदू पवार संघाकडून आर्यन जाधवने ३ बळी घेतले, तर शिवम आणि अवनीक लिंगशेट्टी यांनी प्रत्येकी २ बळी, आणि निहाल सका व फराहन यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना चंदू पवार संघाने १४ षटकांत ६ बाद ७६ धावा करत विजय मिळवला. चिराग चव्हाणने २३ आणि सुरजने २० धावांचे योगदान दिले.


आर्यन जाधव


अब्दुल्ला शेख

वासू मुदियार संघाकडून विराज होसमानी, अथर्व पाटील, सुजल भांडेकर, मानस जयस्वाल आणि शिवराज चट्टे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. उत्कृष्ट गोलंदाजीसाठी आर्यन जाधवला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या सामन्यात प्रदीप कुलकर्णी व अशोक डोंबावळे यांनी पंच म्हणून तर प्रथमेश देगावकर यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

दुपारच्या सत्रात सातोस्कर संघाने अब्दुल्लाह शेखच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर चंदू खाडिलकर संघाचा ३४ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना सातोस्कर संघाने २७.४ षटकांत १७० धावा उभारल्या होत्या.

१७१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना चंदू खाडिलकर संघाचा डाव २७.१ षटकांत १३६ धावांवर संपुष्टात आला. सातोस्करच्या अब्दुल्लाह शेखने फलंदाजीत १४ धावा (२६ चेंडू, २ चौकार) केल्या आणि नंतर गोलंदाजीत ३.१ षटकांत अवघ्या ११ धावा देत ३ म हत्त्वपूर्ण बळी घेतले. या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी अब्दुल्लाह सामनावीरचा मानकरी ठरला.

## सोलापूरच्या संजय शिंदे व प्रीती शिवगुंडे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून -** गुरुवर्य गजानन पाटील क्रीडा प्रतिष्ठान'च्या वतीने माजी राष्ट्रीय खेळाडू व रग्बी खेळात अनेक राष्ट्रीय खेळाडू घडवलेल्या येथील संजय शिंदे आणि पोलीस शिपाई व राष्ट्रीय खेळाडू प्रिती शिवगुंडे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित झालेले मार्गदर्शक तथा माजी क्रीडा अधिकारी गुरुवर्य गजानन मारुती पाटील यांच्या ६४व्या जयंतीनिमित्त पुणे येथील पत्रकार भवन सभागृहात गुणवंत खेळाडू, क्रीडा प्रशिक्षक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. आंतरराष्ट्रीय खेळाडू, कुस्तीतील अर्जुन पुरस्कार विजेते पैलवान काका पवार व आचार्य चाणक्य शिक्षाविद पुरस्काराने सन्मानित डॉ. विश्वंभर जाधव यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी माजी रणजी कर्णधार श्रीकांत जाधव, निवृत्त उपसंचालक



जनक टेकाळे, डीवायएसपी संपत भोसले, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ. गौरी पाटील, राष्ट्रीय खेळाडू ऋचा जाधव-पाटील दत्ता झोडगे, अजिंक्य जाधव, मधुकर पाटील, रिद्धी पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात साची पांडे हिच्या स्वागत गीताने झाली. डॉ. गौरी पाटील यांनी प्रास्ताविक केले. दत्ता झोडगे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋचा जाधव-पाटील यांनी केले.

**जाहीर प्रसिध्दीकरण** — सिव्हील एम.ए.नं. १४/२०२६

### अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात

**सुरेश रेवणसिध्द पाटील** - **अर्जदार**
रा. बासलेगांव, ता. अक्कलकोट
विरुध्द
**कोणी नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं./२०२६ हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे मयत भाऊ जगन्नाथ रेवणसिध्द पाटील हे दिनांक : २३/१०/२०२३ रोजी अविवाहीत मयत झाले आहेत. मयत जगन्नाथ रेवणसिध्द पाटील यांचे नावे बासलेगांव, ता. अक्कलकोट येथे गट नंबर ४५ क्षेत्र ० हे. ८१ आर. ही मिळकत असून मयत जगन्नाथ रेवणसिध्द पाटील यांचे पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरण कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत जगन्नाथ रेवणसिध्द पाटील यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक : २९/०७/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्याच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. आज रोजी मे कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे व माझ्या सहीने हे जाहीर प्रसिध्दीकरण केले ता. २४/०६/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**

## जाहीर सुचना

आम्ही किमया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या "शहर सोलापूर हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील जुना सर्वे नंबर १२५/१/अ/उपभूखंड क्र १/ब यांसी नविन सर्वे नंबर १२५/१/अ/२" येथील या प्रकल्पाला दिनांक ०३.०१.२०२५रोजी पत्र क्रमांक EC24C3801MH5908424N अन्वये पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यतापत्राची प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या (www.ecmpcb.in) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**मे. किमया कन्स्ट्रक्शन प्रा. लि.**

## जाहीर सुचना

आम्ही अलाक्रिटी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या "शहर सोलापूर हद्दीतील मौजे मजरेवाडी येथील जुना सर्वे नंबर 300/4 यांसी नविन सर्वे नंबर 114/4/ प्लॉट नं 1" येथील या प्रकल्पाला दिनांक १२.११.२०२४ रोजी पत्र क्रमांक EC24B038MH110605 अन्वये पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यतापत्राची प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या (www.ecmpcb.in) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**मे. अलाक्रिटी कन्स्ट्रक्शन प्रा. लि.**

**जाहीर प्रसिध्दीकरण** — पुढील नेमली ता. ०४/०८/२०२६ — दिवाणी कि.अ. नं. २५/२०२६ नि.५

### बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

१) **सुचिता पांडुरंग चौधरी,**
वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. सम्राटनगर, सावरगांव पुनर्वसन कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव
ह.रा. पिंपळवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर

२) **प्रणव पांडुरंग चौधरी,**
वय १९, धंदा - शिक्षण, रा. सदर

३) **प्रांजल पांडुरंग चौधरी,**
वय १७, धंदा - शिक्षण, रा. सदर
अज्ञान अ.पा.क. अर्जदार नं. १ आई

४) **गोपिका दत्तु चौधरी,**
वय ८५, धंदा - काही नाही
रा. पिंपळवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर

— **अर्जदार**

विरुध्द
**कोणीही नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती म्हणजेच अर्जदार नं. २, ३ चे वडिल म्हणजेच अर्जदार नं. ४ चा मुलगा पांडुरंग दत्तु चौधरी हा होता. सदर पांडुरंग दत्तु चौधरी हे दि. २०/१२/२०२५ रोजी मौजे पिंपळवाडी ता. बार्शी जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. ते मृत्यूसमयी कळंब जि. धाराशिव राज्य परिवहन महामंडळाचे आगारात सेवेत होते. ते सेवेत असताना मयत झालेने अर्जदार नं. १ ने अनुकंपा अंतर्गत सेवेत सामावून घेणेची विनंती केली असता तेथील अधिकारी यांनी हेअरशिप / वारस प्रमाणपत्राची मागणी केली. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. तसेच अर्जदार नं. २ ते ४ यांनाही त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची गरज आहे असे कथन करुन अर्जदारानी ते मयत पांडुरंग दत्तु चौधरी यांचे वारस असलेबाबत वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनांविषयी कोणाचे काही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क-अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमलेली तारीखेस या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. दि. २५/०६/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर, बार्शी**

### मूळ रजि. वाटपपत्र दस्त, हरवले बाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डी. सोलापूर सब डी व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल. हद्दीतील प्लॉट याचा गट नं. ११२८ यापैकी प्लॉट नं. ०८ याचे क्षेत्र १४८.६९ चौमी. यापैकी पश्चिम बाजूचा प्लॉट याचे क्षेत्र १०२.२३ चौमी. येणे प्रमाणे चतुःसीमापूर्वक खुला प्लॉट तदंगभूत वस्तू हक्कासह,

सदरची मिळकत हि श्रीमती अनिसा इमाम मुलाणी यांच्या स्वसंपादित खरेदी मालकीचा असून त्याना रजि. वाटपपत्राने आलेली जागा आहे. त्याचा रजि. वाटपपत्र दस्त क्र. ४८५०२/२०१९/बरस, दि. ३०/१०/२०१९ आहे. त्या प्लॉट च्या हक्कपत्रकी त्यांचे नावाची नोंद आहे. ती मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. परंतु मिळकतीच्या मूळ रजि. वाटपपत्र दस्त क्र. ४८५०२/२०१९/बरस, दि. ३०/१०/२०१९ हा त्यांचा मुलगा मुजीब इमाम मुलाणी याच्या कडून मंगळवार पेठ परिसर बार्शी येथे दि. १५/०५/२०२६ रोजी सकाळी ०९.३० वा. सुमारास गहाळ झाला आहे, त्याबाबत त्यांनी बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे दि. २४/०६/२०२६ रोजी तक्रार दिली असून त्याचा गहाळ रजि. नं. ०३७०/२०२६ असा पडला आहे.

परंतु मूळ रजि. वाटपपत्र दस्त क्र. ४८५०२/२०१९/बरस, दि. ३०/१०/२०१९ हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावरती संपर्क साधून परत द्यावी, अथवा आमचे अशील याच्या दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉट बाबत हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसांचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरुन सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आलेस आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता हि जाहिर नोटीस दिली. दि. २५/०६/२०२६

**इब्राहीम खुद्बुद्दिन शेख**
**रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिल)**

**सही/-**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर**
**ऑफिस पत्ता :- ३९४५/१. भवानी पेठ, सोलापूर रोड बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

## करमाळा नगरपरिषद

जनसेवा हिच ईश सेवा

**करमाळा, जि. सोलापूर ४१३००३ दूरध्वनी क्रमांक (०२१८२) २२०३१५**
**E-Mail : comckarmala@gmail.com**

**जावक क्रमांक : मिळकत विभाग ९४९/२०२६** — **दिनांक २५/०६/२०२६**

**जाहिर फेर लिलाव प्रसिद्धीकरण**

याव्दारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर लिलाव वार- शुक्रवार, दि.०३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच्या मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे बोली बयाणा रक्कम भरून लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमेशिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरणेची मुदत दि. ०२/०७/२०२६ रोजी दुपारी ५.०० वा. पर्यंत राहील लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा ना मंजूर करणेचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | शॉपींग सेंटरचे नाव | गाळा नं. | अनामत रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपींग सेंटर | ५०, ५१, ५२, ५८, २ | ३५,०००/- ७५,०००/- | ५०००/- |
| २) | न.प. दवाखाना शॉपींग सेंटर | ३, ४, १३, १४, १५, १६, १७ | १०,०००/- | २०००/- |
| ३) | कै. दे.ना.म. जगताप शॉपींग सेंटर | ४७, ५, १८ | ५०,०००/- ८१,०००/- १,२१,०००/- | ५०००/- |
| ४) | जुनी न.पा. इमारतमधील खोली | १० | ४५,०००/- | ५०००/- |

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यांमध्ये अनियमितता झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्ज खाती एनपीए (थकबाकी खाते) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित जारी नोटीसीनुसार दिली आहे आणि सदर रकमेवर त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार पुढील व्याज देखील लागू होईल व ते आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 63516323 | मालमत्तेवर कर्ज | १. गोरख निवृत्ती माने<br>२. स्वप्नील गोरखनाथ माने | 06-May-2026 | INR 4,23,802.71/- |

**मालमत्तेचा पत्ताः** विभाग सोलापूर, उपविभाग उत्तर सोलापूर येथील, ग्रामपंचायत मुळेगाव लमाण तांडा यांच्या हद्दीतील, प्लॉट नंबर २६ असलेला, एकूण क्षेत्रफळ १५०० चौरस फूट, कांची कामाक्षी नगर, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३००२ येथील मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि तुकडा, ज्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व : प्लॉट नं. १९ पश्चिम : रस्ता उत्तर : प्लॉट नं. २५, दक्षिण : प्लॉट नं. २७

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

दिनांक : 26/06/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**



# सह-यजमान मेक्सिको बाद फेरीत

### चावेझ, क्विनोनेस, फिडाल्गो विजयाचे शिल्पकार

**मेक्सिको, २५ जून**

फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या इतिहासात मेक्सिकोने पहिल्यांदाच गटातील तिन्ही सामने जिंकले. मेक्सिकोने झेक प्रजासत्ताकचा ३-० असा पराभव केला. माटेओ चावेझ, ज्युलियन क्विनोनेस आणि अल्वारो फिडाल्गोने गोल केले.

उत्तरार्धाच्या प्रारंभीला अवघ्या सहा मिनिटांच्या अंतरात मातेओ चावेझ आणि ज्युलियन क्विनोनेसने गोल केले आणि मेक्सिकोने विश्वचषकाच्या गट साखळी फेरीतील तिन्ही सामने जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली.

यापूर्वी गट साखळी फेरीतील त्यांची सर्वोत्तम कामगिरी १९८६ आणि २००२ मध्ये दोन विजय आणि एका बरोबरीची होती.

४१ वर्षीय ओचोआ हा विश्वचषकात खेळणारा मेक्सिकोचा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला. 0आपल्या पहिल्याच विश्वचषकात खेळणाऱ्या २२ वर्षीय चावेझने ५५ व्या मिनिटाला पहिला गोल केला, तर क्विनोनेसने ६१ व्या मिनिटाला स्पर्धेतील आपला दुसरा गोल नोंदविला. त्यानंतर, उत्तरार्धाच्या 'स्टॉपेज टाइम'मध्ये अल्वारो फिडाल्गोने आणखी एक गोल केला.

(वृत्तसंस्था)



**झेक प्रजासत्ताकविरुद्धच्या विश्वचषक सामन्यादरम्यान आपल्या संघासाठी दुसरा गोल करताना मेक्सिकोचा ज्युलियन क्विनोनेस (डावीकडून दुसरा)**

## स्वित्झर्लंडचा कॅनडावर विजय

**व्हँकुव्हर, २५ जून**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत बी गटाच्या साखळी सामन्यात स्वित्झर्लंडने कॅनडाचा २-१ असा पराभव केला आणि बाद फेरीत प्रवेश केला. या पराभवानंतरही सह-यजमान कॅनडा आणि मेक्सिकोने बाद फेरीत स्थान निश्चित केले आहे.

रुबेन वर्गास आणि जोहान मंझांबीने स्वित्झर्लंडसाठी गोल केले. कॅनडाचा एकमेव गोल प्रॉमिस डेव्हिडने केला. स्वित्झर्लंडने विजय मिळवून अव्वल स्थान पटकावल्याने कॅनडाने अंतिम ३२ संघांसाठीचा घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा गमावला.

उष्ण वातावरणात झालेल्या पहिल्या कडव्या लढतीनंतर, दुसरा थरारक पूर्वार्ध पार पडला. अखेरीस, कॅनडाचा बदली खेळाडू प्रॉमिस डेव्हिडने अनपेक्षितपणे केलेल्या हस्तक्षेपानंतरही, स्वित्झर्लंडने गट 'बी' जिंकला आणि त्यासोबतच बाद फेरीच्या पहिल्या आठवड्यासाठी व्हँकुव्हरला आपले घरचे मैदान बनवण्याचा हक्क मिळविला.

(वृत्तसंस्था)



**कॅनडाविरुद्धच्या २-१ अशा विजयात स्वित्झर्लंडसाठी दुसरा गोल केल्याचा आनंद साजरा करताना जोहान मंझांबी**

## आजचे सामने

**नॉर्वे विरुद्ध फ्रान्स**
**वेळ :** शुक्रवारी रात्री १२:३० वाजतापासून
**स्थळ :** जिलेट स्टेडियम, बॉस्टन

000

**सेनेगल विरुद्ध इराक**
**वेळ :** शुक्रवारी रात्री १२:३० वाजतापासून
**स्थळ :** बीएमओ फील्ड, टोरंटो

000

**केप वर्दे विरुद्ध सौदी अरेबिया**
**वेळ :** शनिवारी पहाटे ५:३० वाजतापासून
**स्थळ :** एनआरजी स्टेडियम, ह्युस्टन

000

**उरुग्वे विरुद्ध स्पेन**
**वेळ :** शनिवारी पहाटे ५:३० वाजतापासून
**स्थळ :** एस्तादियो अॅक्रॉन, ग्वाडलहारा

000

**न्यूझीलंड विरुद्ध बेल्जियम**
**वेळ :** शनिवारी सकाळी ८:३० वाजतापासून
**स्थळ :** बीसी प्लेस, व्हँकुव्हर

000

**इजिप्त विरुद्ध इराण**
**वेळ :** शनिवारी सकाळी ८:३० वाजतापासून
**स्थळ :** लुमेन फील्ड, सिएटल

## १९८३ च्या विश्वचषक विजयाचे स्मरण

**नवी दिल्ली, २५ जून**

२५ जून १९८३ रोजी भारताने इतिहास घडवला; लॉर्ड्सवर झालेल्या एका रोमांचक अंतिम सामन्यात बलाढ्य वेस्ट इंडीजचा पराभव करून भारताने पहिल्यांदाच एकदिवसीय विश्वचषक जिंकला. भारताच्या सर्वात महान क्रीडा विजयांपैकी एका विजयाचा ४३ वा वर्धापनदिन आहे. 'असा विजय ज्याने अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली. १९८३ मध्ये याच दिवशी कपिल देव आणि त्यांच्या संघाने लॉर्ड्सवर वेस्ट इंडीजविरुद्ध १८३ धावांचे यशस्वी रक्षण करत भारतासाठी पहिले विश्वचषक विजेतेपद पटकावले,' असे बीसीसीआयने 'एक्स'वर म्हटले आहे. भारतीय क्रिकेट संघाने सर्व शक्यता आणि अपेक्षांना छेद देत २५ जून १९८३ रोजी इतिहास रचला.

(वृत्तसंस्था)

# दक्षिण आफ्रिका पहिल्यांदाच बाद फेरीत

### दक्षिण कोरियाविरुद्ध थापेलो मासेकोचा निर्णायक गोल

**मॉन्टेरी, २५ जून**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत थापेलो मासेकोने नोंदविलेल्या महत्त्वपूर्ण एकमेव गोलच्या बळावर दक्षिण आफ्रिकाने दक्षिण कोरियावर १-० ने विजय नोंदवून 'गट अ' मध्ये दुसरे स्थान पटकावले आणि अंतिम २३ च्या फेरीत धडक मारली. दक्षिण आफ्रिकेने पहिल्यांदाच विश्वचषकाच्या बाद फेरीत स्थान मिळवून इतिहास रचला.

मध्यंतरानंतर मैदानात उतरल्यावर ह्युंग-मिन सोनला पुन्हा एकदा संघर्ष करावा लागला; दक्षिण कोरिया अजूनही तिसऱ्या क्रमांकाचा संघ म्हणून पात्र ठरू शकते. थापेलो मासेकोने ६३ व्या मिनिटाला निर्णायक गोल केला. या विजयामुळे दक्षिण आफ्रिकेचा २९ जून रोजी कॅनडाविरुद्ध होणाऱ्या 'अंतिम-३२' फेरीतील सामन्याचा मार्ग मोकळा झाला. सलामीच्या सामन्यात मेक्सिकोविरुद्ध नऊ खेळाडूंसह खेळताना झालेल्या दारुण पराभवानंतर, प्रशिक्षक ह्युगो ब्रूस यांच्या मार्गदर्शनाखाली संघाची ही उल्लेखनीय कामगिरी सुरूच राहिली आहे.ह्युंग-मिन सोनसाठी ही स्पर्धा कठीण ठरत आहे; दक्षिण कोरियाचे प्रशिक्षक म्युंग-बो होंग यांनी त्याला विश्वचषकातील सलग १३ सामन्यांनंतर पहिल्यांदाच राखीव खेळाडूंच्या बाकावर बसवले. झेक प्रजासत्ताकविरुद्धच्या विजयानंतर संघाला आपली लय कायम राखता आली नाही आणि आता 'सर्वोत्तम तिसऱ्या क्रमांकाचे संघ' म्हणून पात्र ठरता येईल का, या चिंतेत त्यांना निकालाची वाट पाहावी लागणार आहे.

(वृत्तसंस्था)



**मॉन्टेरी येथे दक्षिण कोरियाविरुद्ध आपल्या संघासाठी पहिला गोल केल्यानंतर आनंद साजरा करताना दक्षिण आफ्रिकेचा थापेलो मासेको (१२) व संघातील खेळाडू**

# मोरोक्कोचा हैतीवर ४-२ ने रोमहर्षक विजय

**अटलांटा, २५ जून**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत सी गटातील अन्य एका सामन्यात कडव्या संघर्षानंतर मोरोक्कोने हैती संघावर ४-२ अशा गोलफरकाने रोमहर्षक विजय नोंदविला. या विजयाबरोबरच मोरोक्कोने ब्राझीलसह प्रत्येकी ७ गुण घेत बाद फेरीत स्थान मिळविले.

या सामन्यात बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या सुफियान रहीमी आणि गेसिम यासीनने मोरोक्कोला हैतीविरुद्ध ४-२ असा विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. या विजयामुळे विश्वचषकात आपला पहिला गुण मिळवण्याचे हैतीचे स्वप्न भंगले.

चार वर्षांपूर्वी कतारमध्ये विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत धडक मारणारा पहिला आफ्रिकन संघ ठरलेल्या मोरोक्कोला, ५२ वर्षांनंतर फुटबॉलच्या या सर्वात मोठ्या मंचावर खेळणाऱ्या हैतीविरुद्ध दोनदा पिछाडीवरून मुसंडी मारावी लागली.

७८ व्या मिनिटाला रहीमीने मारलेला चेंडू दिशा बदलून गोलमध्ये गेल्याने मोरोक्को ३-२ ने आघाडीवर आला आणि ८९ व्या मिनिटाला यासीनने गोल करत हैतीच्या विजयाच्या आशा पूर्णपणे संपवल्या. मोरोक्कोसाठी सुफियान रहीमी व जसीम यासिन यांच्यासह अश्रफ हकिमी, इस्माईल सायबारीने गोल केले, तर हैतीसाठी विल्सन इसिडोरने गोल केला.

'गट सी'मध्ये ब्राझीलपाठोपाठ दुसऱ्या स्थानावर राहत मोरोक्कोने 'अंतिम ३२' मध्ये प्रवेश केला. गटातील दुसऱ्या सामन्यात पाच वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या ब्राझीलने स्कॉटलंडचा ३-० असा पराभव केला.

'आफ्रिका कप ऑफ नेशन्स'चे विद्यमान विजेते असलेल्या मोरोक्कोची यावर्षीही स्पर्धेत आगेकूच करण्याची महत्त्वाकांक्षा आहे. मात्र, फिफा क्रमवारीत मोरोक्कोपेक्षा ७४ स्थाने मागे असलेल्या हैतीने त्यांना चांगलीच झुंज दिली.

(वृत्तसंस्था)



**अटलांटा येथे विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या 'गट सी' मधील हैतीविरुद्धच्या सामन्यादरम्यान गोल करताना मोरोक्कोचा अश्रफ हकिमी**

# ब्राझील गटात अव्वल

### स्कॉटलंडवर विजय

**मियामी, २५ जून**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत विनीसियस ज्युनियरचे दोन गोल आणि मॅथियस कुन्हाने नोंदविलेल्या एका गोलच्या बळावर पाच वेळा विश्वविजेतेपद पटकावणाऱ्या ब्राझीलने स्कॉटलंडचा ३-० असा पराभव केला आणि 'गट सी' मधील विजेता म्हणून बाद फेरीत प्रवेश केला. याच गटातून ब्राझील व मोरोक्कोने अंतिम ३२ मध्ये स्थान मिळविले.

ब्राझीलच्या तिन्ही गट-सामन्यांमध्ये गोल करणाऱ्या विनीसियसने सातव्या मिनिटाला आणि मध्यंतरापूर्वी पुन्हा एकदा गोल केला. यासह त्याने नॉर्वेचा एर्लिंग हॅलंड आणि फ्रान्सचा किलियन एमबाप्पे यांच्याशी बरोबरी साधत चार गोल पूर्ण केले; तो आता अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी याच्यापेक्षा केवळ एका गोलने मागे आहे. ब्राझीलने सलग १५ व्या विश्वचषकात बाद फेरीत धडक मारली. मोरोक्को संघ गटात दुसऱ्या स्थानावर राहून पुढच्या फेरीत पोहोचला; त्यांनी पिछाडीवरून मुसंडी मारत हैतीचा ४-२ असा पराभव केला. पायाच्या दुखापतीमुळे ब्राझीलच्या पहिल्या दोन सामन्यांना मुकलेल्या नेमारने ७६ व्या मिनिटाला बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरत पदार्पण केले. हार्ड रॉक स्टेडियमवर उपस्थित असलेल्या ब्राझीलच्या बहुसंख्य चाहत्यांनी उत्तरार्धातील खेळाच्या मध्यातच नेमारचे नाव घेण्यास सुरुवात केली; जेव्हा तो बेंचवरून उठून मैदानाबाहेर वॉर्म-अप स्प्रिंट्स करू लागला आणि त्यानंतर जेव्हा तो धावत मैदानात आला, तेव्हा चाहत्यांनी प्रचंड जल्लोष केला. १३० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ७९ गोल करीत नेमार ब्राझीलसाठी सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला आहे. ३४ वर्षीय आक्रमक खेळाडू असलेल्या नेमारने यापूर्वी ब्राझीलकडून तीन विश्वचषक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून त्यात आठ गोल केले आहेत. स्कॉटलंड १९९८ नंतर पहिल्यांदाच विश्वचषक खेळत असून या स्पर्धेतील एक लक्षवेधी संघ ठरला आहे. 'टार्टन आर्मी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्यांच्या निष्ठावान चाहत्यांनी आपल्या संघाच्या सामन्यांपूर्वी बोस्टन आणि मियामी भागात उत्सवाचे वातावरण निर्माण केले होते.स्कॉटलंडला आतापर्यंतच्या नऊ प्रयत्नांमध्ये एकदाही गट फेरीच्या पुढे मजल मारता आलेली नाही.

(वृत्तसंस्था)



**विनीसियस ज्युनियरचे दोन गोल; मॅथियस कुन्हाचा एक गोल**

# श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात नव्या पर्वाची सुरुवात

**बेल्टफास्ट, २५ जून**

शुक्रवारी बेलफास्ट येथील 'सिव्हिल सर्व्हिस क्रिकेट मैदाना'वर (स्टॉर्मोंट) भारत आणि आयर्लंडदरम्यान दोन सामन्यांच्या टी-२० मालिकेला प्रारंभ होणार आहे. पहिल्या सामन्यात श्रेयस अय्यर भारतीय संघाचे नेतृत्व करणार असून, यासह भारताच्या टी-२० क्रिकेटमधील एका नव्या पर्वाची सुरुवात होत आहे.

टी-२० विश्वचषकाचे विद्यमान विजेते म्हणून भारतीय संघ या मालिकेत उतरत असला आणि विजयासाठी प्रबळ दावेदार मानला जात असला, तरी सामन्यापूर्वीची सर्वाधिक चर्चा ही किशोरवयीन फलंदाज वैभव सूर्यवंशी याच्याभोवती केंद्रित झाली आहे, कारण तो आता आपल्या ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय पदार्पणाच्या उंबरठ्यावर आहे.

राजस्थान रॉयल्सकडून खेळताना आयपीएल २०२६ च्या हंगामातील दमदार कामगिरी आणि 'भारत अ' संघासाठी सामना जिंकून देणारी खेळी यांमुळे, १७ वर्षीय वैभव भारतीय क्रिकेटमधील एक अत्यंत आश्वासक खेळाडू म्हणून वेगाने उदयास आला आहे. मात्र, त्याच्या समावेशामुळे संघ व्यवस्थापनासमोर निवडीचा पेच निर्माण झाला आहे. बिहारचा हा १५ वर्षीय डावखुरा फलंदाज भारताचा सर्वात तरुण आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू होण्याची शक्यता आहे; तो सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडू शकतो, तेंडुलकरने वयाच्या १६ वर्षे २०५ दिवस असताना भारतासाठी पदार्पण केले होते. सध्या, भारताचे प्रमुख तीन फलंदाज संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि ईशान किशन हे आहेत. त्यांची एकूण आणि अलीकडील टी-२० कामगिरी दुर्लक्षित करण्यासारखी नाही. मार्चमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या आयसीसी टी-२० विश्वचषक अंतिम सामन्यातील विजयात सॅमसन, अभिषेक आणि किशनने अर्धशतके झळकावली होती; ही भारताची या सर्वात छोट्या फॉरमॅटमधील शेवटची मालिका होती.

(वृत्तसंस्था)



**बेलफास्टमध्ये सराव करताना भारतीय टी-२० संघातील खेळाडू**

**भारत वि. आयर्लंड पहिला टी-२० सामना**
**वेळ :** सायंकाळी ६.०० वाजतापासून
**स्थळ :** 'सिव्हिल सर्व्हिस क्रिकेट मैदान, बेलफास्ट
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्स टेन१ वर

# साई सुदर्शनचे शतक

**'भारत अ' ४ बाद ३३३**

**गाल, २५ जून**

येथे सुरू असलेल्या पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्यात बी. साई सुदर्शनची १३२ धावांची खेळी आणि ध्रुव जुरेल व शेख रशीद यांच्यादरम्यान शतकी अभेद्य भागीदारीच्या जोरावर 'भारत अ' संघाने पहिल्या दिवशी ४ बाद ३३३ धावांची मजल मारत सामन्यावर वर्चस्व निर्माण केले.

प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर 'भारत अ' संघाने उत्तम सुरुवात केली. सलामीला ८२ धावांची भागीदारी झाल्यानंतर आयुष पांडे २५ धावांवर बाद झाला. २३ व्या षटकात डावखुरा फिरकीपटू दिलुम सुदिरा याने त्याला बाद केले.

देवदत्त पडिक्कल (७ चेंडूत १२ धावा) आणि ऋतुराज गायकवाड (२२ धावांवर एलबीडब्ल्यू) बाद झाल्यामुळे 'भारत अ'ची स्थिती बिनबाद ८२ वरून ३ बाद १८१ अशी झाली होती. मात्र, साई सुदर्शनने डाव सावरला आणि १९ चौकारांच्या मदतीने शतक पूर्ण केले. त्याने १७५ चेंडूत १३२ धावांची खेळी केली, जी भारताच्या डावाचा मुख्य आधार ठरली.

'श्रीलंका अ' संघाच्या गोलंदाजांमध्ये सुदिरा सर्वात यशस्वी ठरला; त्याने दोन बळी घेतले, तर वेगवान गोलंदाज रविंदू फर्नांडो आणि ऑफ-स्पिनर चमिका गुणसेकराने प्रत्येकी एक बळी मिळवला. २१७ धावांवर ४ गडी बाद झाल्यावर साई सुदर्शन बाद झाल्यामुळे 'श्रीलंका अ'ला सामन्यात परतण्याची संधी मिळाली होती, परंतु 'भारत अ'च्या मधल्या फळीतील फलंदाजांनी ती संधी हिरावून घेतली. कर्णधार जुरेल आणि रशीदने पाचव्या गड्यासाठी ११६ धावांची अभेद्य भागीदारी करत संघाला आणखी धक्के बसण्यापासून वाचवले. दिवसाचा खेळ संपला तेव्हा जुरेल १३८ चेंडूत ६८ धावांवर (अबादित) खेळत होता, तर रशीदने ९२ चेंडूत ५३ धावा केल्या होत्या.

(वृत्तसंस्था)




# बांगलादेशचे भारतासमोर १३७ धावांचे लक्ष्य

**मॅन्चेस्टर, २५ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशने भारतीय महिला संघासमोर विजयासाठी १३७ धावांचे लक्ष्य ठेवले.

कर्णधार निगर सुल्तानाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यांची सुरुवात निगाशाजनक झाली. रेणुका सिंगने सलामीवीर दिलारा अख्तरला (४) लवकरच तंबूत परत पाठविले. मात्र त्यानंतर जुवैरिया फिरदौस (३३), शोभना मोस्तारी (२२) व निगर सुल्तानाने (३२) छोट्या-छोट्या भागीदारी करत बांगलादेशचा डाव सावरला. सुल्ताना बाद झाली, तोपर्यंत बांगलादेशने १६.१ षटकांत ४ बाद १०६ धावांचा टप्पा गाठला होता. पुढे शर्मिन अख्तर (१०, रिटायर्ड हर्ट), शोर्ना अख्तर (१३), रितू मोनीने (८) बांगलादेशला २० षटकांत ८ बाद १३६ धावा रचून दिल्या.

भारताकडून राधा यादव सर्वात यशस्वी गोलंदाज ठरली, तिने २८ धावांत ३ बळी, श्री चरणीने २१ धावांत २ बळी, तर रेणुका सिंग व नंदिनी शर्माने प्रत्येकी एक बळी टिपले. बांगलादेशला आणखी कमी धावसंख्येवर रोखता आले असते, परंतु भारतीय क्षेत्ररक्षकांचे पहिल्या पाच षटकांत चार झेल सुटले, नंतरच्या टप्प्यावर क्षेत्ररक्षणात चुका झाल्या आणि नंदिनीने काही वेळा 'डेंजर एरिया'वरून (खेळपट्टीच्या मध्यभागावरून) धाव घेतली, परंतु बांगलादेशला मिळालेल्या या संधींचा पुरेपूर फायदा उठवता आला नाही.

(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**
**स्कॉलंड वि. श्रीलंका**
**वेळ :** रात्री ११.०० वाजतापासून
**स्थळ :** मॅन्चेस्टर
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्टसवर

जुवैरिया फिरदौस



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### अखिल ब्राह्मण संस्थेमार्फत मुकबधीर विद्यार्थ्यांना मदत

**जेऊर दि. २५ जून-**

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक शाखा करमाळा यांच्या वतीने श्री देवीचामाळ येथील मुकबधीर शाळेस आर्थिक सहकार्य करण्यात आले. विद्यार्थ्यांना डायनिंग टेबलसाठी ६ हजार ७०० रुपयांचा धनादेश मुख्याध्यापक दत्तात्रय काळे यांच्याकडे सुपूर्द केला. करमाळा तालुकाध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते हा धनादेश प्रदान केला. मदतीमुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. संस्थेचे तालुका कार्याध्यक्ष रविंद्र विद्वत, उपाध्यक्ष राजेंद्र सुर्यपुजारी, कार्यवाह निलेश गंधे, अखिल भारतीय डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष दिनेश मडके, सचिव नरेंद्रसिंह ठाकूर, मुख्याध्यापक दत्तात्रय काळे, अधिक्षक मल्लीनाथ पटणे, गणेश सातपुते, दामोदर परबत, ज्ञानेश्वर खंदाडे आदी उपस्थित होते.मुख्याध्यापक काळे यांनी संस्थेच्या या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालकांनीही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

### सुर्डी डीसीसी बँक दरोडा; दोघांना जामीन

**बार्शी दि. २५ जून**

बार्शी तालुक्यातील सुर्डी येथे जिल्हा बँक शाखेवर सशस्त्र दरोडा टाकल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने दोन आरोपींना जामीन मंजूर केला आहे. दि. ७ मार्च २०२५ रोजी ३ दरोडेखोरांनी १ बंदूक आणि २ कोयत्याने दहशत माजवत, मॅनेजरला कोयत्याने मारहाण करुन दरोडा टाकला होता. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस स्टेशनमध्ये तिघांवर गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी अर्ध्या तासात आरोपींना हत्यार, वाहन आणि रक्कमेसह जेरबंद केले होते. एकाला अल्पवयीन असल्याने जामिनावर सोडून इतर दोघांचा जामीन बार्शी सत्र न्यायालयात फेटाळला होता. त्यानंतर आरोपींनी ॲड. योगीराज पुरवंत यांच्यामार्फत उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. अर्जावर युक्तिवाद करताना फिर्यादीत आरोपींनी हातमोजे घातल्याचे नमूद नाही. कोयत्यावर आरोपींच्या बोटाचे ठसेही सापडले नाहीत. जप्ती पंचनाम्याची वेळ आणि आरोपींना न्यायालयात हजर केल्याची वेळ एकच असल्याने आरोपी एकाच वेळी दोन ठिकाणी असणे शक्य नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा खोटा आहे,आदी मुद्दे मांडले. त्यानंतर खंडपीठाने आरोपींना ५० हजार रुपयांच्या जामीनावर मुक्ततेचे आदेश दिले. आरोपींतर्फे ॲड. योगिराज पुरवंत, ॲड. शंकर ननवरे, ॲड. सचिन किरतकुडवे यांनी काम पाहिले.

### शाळेत घुसून मुख्याध्यापिकेकडे पैशाची मागणी; पाच जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २५ जून-**

शाळेमधील कक्षात घुसून, ॲडमिशनचे जमा झालेले पैसे मागून महिला मुख्याध्यापिकेशी गैरवर्तन व अरेरावी केल्याची घटना सरस्वती बालक मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका कक्षात १६ जून रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली. दरम्यान याप्रकरणी ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिद्राम तट्टे, मोहन मादगुडी, नरसिंह आदप्पा सरला आणि इतर दोन अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत निशा इरप्पा केचंगुडी (रा. दत्त नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी या १६ जून रोजी सकाळी शाळेत असताना वरील आरोपी अचानक मुख्याध्यापिकांच्या कक्षात शिरले. त्यांनी शाळेतील ॲडमिशनचे पैसे मागितले. मुख्याध्यापिकेने पैसे देण्यास नकार दिला असता, आरोपींनी त्यांना घेरले आणि अरेरावी करत ''तुला बघून घेतो, तुझ्यासारखे १० मुख्याध्यापक येथे आणून बसवतो, आत्ताच्या आत्ता पैसे द्या नाहीतर उचलबांगडी होईल,'' अशी धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक राजगुरू करत आहेत.




### कडबा कापताना मशीनमध्ये तरुणाचा हात कापला

**सोलापूर, दि. २५ जून-**

कडबा कट करीत असताना मशीनमध्ये तरुणाचा हात जाऊन तुटल्याची घटना बार्शी तालुक्यातील पांढरी गावात घडली. धनाजी शिवाजी काळे (वय-३५, रा.पांढरी) असे त्या तरुणाचे नाव असून तो २१ जून रोजी दुपारी राहत्या घरी कडबा मशीनमध्ये कडबा कट करीत होता. त्यावेळी अचानक त्याचा हात मशीन मध्ये जाऊन तुटला. यात जखम झाल्याने त्याला उपचारकरिता येथील शासकीय रुग्णालयात शेजारी कल्याण घावरे याने दाखल केले.

## निधन वृत्त...

### चंद्रभागाबाई जवळकर



**सोलापूर, दि. २५ जून -**

चंद्रभागाबाई हणमंतराव जवळकर यांचे वार्धक्याने निधन झाले. मृत्युसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. सोलापुरातील रेडीमेड कापड व्यावसायिक तथा कारखानदार दशरथ जवळकर यांच्या त्या मातोश्री होत. किसान संकुल येथील राहत्या घरातून शुक्रवारी दि. २६ जून रोजी सकाळी अकरा वाजता अंत्ययात्रा निघून शांती चौक येथील भावसार समाज स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.

### सुमन जाधव



**टेंभुर्णी , दि २६ जून -**

टेंभुर्णी येथील सुमन शिवाजी जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या अनिल जाधव यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# आषाढी वारीसाठी ग्रामपंचायतींना साडेचार कोटींचा निधी

## पालखी मार्गावरील ९१ ग्रामपंचायतींना लाभ; वारकरी सुविधांच्या विविध कामांना सर्वसाधारण सभेत मंजुरी

**सीईओ जैन यांच्या तत्परतेमुळे सर्व कामांना गती**

**अध्यक्ष वैद्य, उपाध्यक्ष पवार यांनी पालकमंत्र्यांचे मानले आभार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ जून**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेत पालखी मार्गावरील ग्रामपंचायतींसाठीच्या अनुदानात एक कोटी रुपयांची वाढ करण्यास मंजुरी दिली. परिणामी ग्रामपंचायतींना मिळणारा निधी साडेतीन कोटींवरून साडेचार कोटी रुपयांवर पोहोचला आहे.



पंढरपूर येथील विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य होते. उपाध्यक्ष इंद्रजित पवार, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, गटनेत्या रश्मी बागल, मुख्यकार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रशासकीय अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्यकार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव, यांच्यासह स्थायी समितीचे सदस्य व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सभेत आषाढी वारीसाठी करण्यात येणाऱ्या विविध विकासकामे व सुविधांबाबतच्या प्रस्तावांना एकमताने मंजुरी देण्यात आली. पालखी मार्गावरील सांगोला, माढा, बार्शी, मंगळवेढा, उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुक्यांतील ग्रामपंचायतींना वाढीव निधी देण्याची मागणी सदस्यांनी केली होती. त्यास प्रतिसाद देत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी ग्रामपंचायतींच्या अनुदानात एक कोटी रुपयांची वाढ केल्याची माहिती दिली.

यापूर्वी ८१ ग्रामपंचायतींना ३ कोटी ५० लाख रुपयांचे अनुदान दिले जात होते. आता आणखी १० ग्रामपंचायतींचा पालखी मार्गातील गावांमध्ये समावेश केल्याने ९१ ग्रामपंचायतींना या निधीचा लाभ मिळणार आहे. वारी काळात स्वागत कमानी, फूट मसाजर यंत्रणा, मुख्यमंत्री वारकरी निवारा केंद्र (जर्मन हँगर), शौचालये, स्नानगृहे, पालखी तळांना जोडणारे रस्ते, पिण्याच्या पाण्याचे टँकर, औषध खरेदी, मोबाईल चार्जिंग स्टेशन तसेच स्वच्छता व्यवस्थेसाठीच्या कामांना मंजुरी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ग्रामविकास विभागामार्फत उपलब्ध करून दिलेल्या निधीबद्दल अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार तसेच सदस्यांनी आभार व्यक्त केले. दरम्यान, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टँकरसंदर्भातील निविदा प्रक्रिया सर्वप्रथम पूर्ण केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर व त्यांच्या पथकाचे विशेष अभिनंदन केले.

सभेत विधान परिषद सदस्य म्हणून निवडीबद्दल आमदार राजेंद्र राऊत यांचा अभिनंदनाचा ठरावही एकमताने मंजूर करण्यात आला. आषाढी वारीसाठी तीन जिल्ह्यांमध्ये केलेल्या नियोजनाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन व प्रशासनाच्या कार्याचेही सदस्यांनी कौतुक केले.

# दूध-गुटखा माफिया, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर मोक्का लावा

**आमदार अभिजीत पाटील यांची विधानसभेत मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ जून -**

बनावट दूध, अवैध गुटखा विक्री आणि या संपूर्ण रॅकेटला संरक्षण देणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या साखळीवर वरवरची कारवाई न करता, मूळ सूत्रधारांवर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली आहे. अन्न व औषध प्रशासनविभागाच्या ढिसाळ कार्यपद्धतीवर आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर थेट बोट ठेवत त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.



भोसे येथील बनावट दूध कारखान्याचा गंभीर मुद्दा सभागृहात मांडताना आमदार पाटील यांनी सांगितले की, या छाप्यात तब्बल दीड कोटी लिटर बनावट दूध तयार होईल इतके मेलामाईनसारखे अत्यंत घातक रसायन जप्त केले होते. या प्रकरणात दोषींवर मोक्का लावण्याचे आश्वासन शासनाने सभागृहात दिले होते, मात्र आजपर्यंत कारवाई झालेली नाही. जनतेच्या आणि निष्पाप लहान मुलांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या माफियांना नक्की कोणाचे राजकीय संरक्षण आहे, असा सवाल त्यांनी केला.

बावीस गाव परिसरात अवैध गुटखा पकडण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांच्या वाहनाला धडक देऊन जीवाला धोका निर्माण केला होता, मात्र प्रशासनाने मुख्य गुटखा व्यापाऱ्याला सोडून केवळ वाहनचालकावर गुन्हा दाखल केला. अशा गुटखा व्यवसायाला पाठीशी घालणाऱ्या मोठ्या अधिकाऱ्यांवर गुन्हेगारांवर दाखल कधी होणार, असा प्रश्न विचारला.

प्रशासनातील आर्थिक भ्रष्टाचाराचा पुरावा देताना आमदार पाटील यांनी सांगितले की, ( एमएच-१३ सीके-२१११) या वाहनातून तब्बल ३ कोटी ४२ लाख रुपयांची अवाढव्य रक्कम जप्त केली होती. यामध्ये प्रशांत कुचेकर, आशू गुप्ता आणि अशोक इलके या अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असतानाही त्यांच्यावर केवळ शिस्तभंगाची किंवा विभागीय चौकशीची किरकोळ कारवाई केली. एवढी मोठी रक्कम सापडूनही कठोर कारवाई होत नसेल, तर भ्रष्टाचार विरोधी सरकारची भूमिका नेमकी काय आहे, अशी शंका व्यक्त केली. सभागृहात वारंवार नावे, पुरावे आणि गाड्यांच्या नंबरसह सर्व माहिती देऊनही कारवाई लांबणीवर पडत असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

# दत्तकला स्कूलमध्ये 'ओळख ज्ञानेश्वरीची' आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन




**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि. २५ जून-**

आधुनिक शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्याधिष्ठित व आध्यात्मिक शिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. त्याउद्देशाने स्वामी चिंचोलीच्या दत्तकला इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'ओळख ज्ञानेश्वरीची' या विशेष आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन डीकेआयएस विभागाच्या मुख्याध्यापिका सिंधू यादव तसेच सीबीएसई विभागाच्या मुख्याध्यापिका वृशाली बागुल यांनी केले. कार्यक्रमासाठी आळंदी येथील ह.भ.प. डॉ. सुभाष महाराज गेठे, प्रकाश महाराज काळे अध्यक्ष ज्ञानेश्वर चरित्र समिती आळंदी, महाराज तसेच ह.भ.प. प्रल्हाद महाराज बोईर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याचबरोबर माजी शिक्षणाधिकारी कृष्णकांत चौधरी, निवृत्ती महाराज गलांडे,शीतल इनामदार, उद्योजक पुणे व श्रीराम जयंती चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष श्रीराम मंदिर स्वामी चिंचोली हे देखील विद्यार्थ्यांना संबोधित केले. विद्यार्थ्यांना संत ज्ञानेश्वरांचे जीवनकार्य, ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान, भारतीय संस्कृतीतील अध्यात्माचे महत्त्व आदीविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही प्रश्न विचारून ज्ञानेश्वरीविषयीची जिज्ञासा व्यक्त केली. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, संस्थेच्या सचिव माया झोळ, संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक पृथ्वीराज झोळ तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना संत साहित्याची ओळख होऊन त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## गिरझणी शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज, प्रतापसिंह मोहिते-पाटील यांची जयंती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. २५-**

माळशिरस तालुक्यातील गिरझणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रतापसिंह मोहिते-पाटील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्रामस्थांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते डॉ.धवलसिंह मोहिते- पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतापसिंह मोहिते-पाटील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करुन करण्यात आले. याप्रसंगी ग्रामस्थांकडून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश साठे यांच्याहस्ते डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करुन खाऊ वाटप केले.

डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना एका वर्षात जवळपास ११०० शाळांना मंजुरी दिल्याचे सांगितले. कार्यक्रमासाठी हरिदास माने, भोजराज माने, काकासो माने, महादेव साठे, रमेश साठे, संजय माने, सागर देशमुख, दिपक पिंजारे, शंकर चव्हाण, विजय माने,रवी माने,सुनील माने, शिवाजी माने, बाळासो सोनवले, नेताजी काळकुटे,रामदास माने, गजानन माने,सचिन माने,शामराव पालकर, ज्योतीराम माने,शंकर वाघ,लक्ष्मण कुंभार,ग्रामसेवक नवले भाऊसाहेब,सरपंच गंगुबाई साठे,जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक,अंगणवाडी सेविका व मदतनीस,ग्रामपंचायत कर्मचारी, संजय लोहकरे व कृष्णा लावंड आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक प्रकाश कांबळे यांनी केले.

# स्वेरीमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ जून -**

राष्ट्रीय सेवा योजना, उन्नत भारत अभियान व स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता.पंढरपूर) मधील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या क्रीडांगणावर स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदविका), स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी (पदवी), स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी (पदविका) व स्वेरी लॉ कॉलेजमध्ये जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.

योग व मार्शल आर्टचे प्रशिक्षक राजेंद्र अनवते यांनी मार्गदर्शन केले. शरीराबरोबरच मन निरोगी राहण्यासाठी योग सातत्याने करणे आवश्यक आहे. योगामुळे आपले मन स्थिर व बुद्धी चंचल राहते. कार्यात उत्साह वाढतो, असे मत व्यक्त केले. निवृत्त शास्त्रज्ञ डॉ.मिलिंद जोशी यांनी योग साधना आपल्या मनात उतरवली पाहिजे, असे सांगितले. स्वेरीचे सचिव डॉ.सुरज रोंगे यांनी नकारात्मक विचारांवर मात करण्यासाठी योग सारखे उत्साहवर्धक उपक्रम सातत्याने राबवावेत. यामुळे मन स्थिर राहते आणि प्रगती झपाट्याने होते, असे सांगितले.

यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून वृक्षासन, ताडासन, त्रिकोणासन, वज्रासन, भुजंगासन आदी आसने करवून घेतली गेली. विद्यार्थिनी अमृता सरगुले हिने प्रात्यक्षिके करून दाखवली. स्वेरीचे संस्थापक व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, विद्यालंकार इन्स्टिट्यूट, वडाळा, मुंबईच्या प्राचार्या डॉ. संगीता जोशी, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस.व्ही. मांडवे, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल चौंडे, उन्नत भारत अभियानचे प्रमुख प्रा. प्रशांत भागानगरे, सर्व समन्वयक, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. नीता तळवलकर यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले.

**दर महिन्यात २१ तारखेला व रोज अर्धा तास योग साधना**

डॉ. बी. पी. रोंगे यांच्या सूचनेनुसार जुलै २०२४ पासून प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेला स्वेरी योगा डे साजरा केला जातो. दैनंदिन वेळापत्रकात सकाळी १०:०० ते १०:३० या वेळेत स्वेरीतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांकडून योगा केला जातो.

# खर्डीतील आंदोलकांच्या सर्व मागण्या मान्य; शेतकऱ्यांचे आंदोलन मागे

**सिताराम कारखान्याच्या प्रदुषणाविरोधात चार दिवसांपासून तरुणांचे होते ठिय्या आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ जून -**

तालुक्यातील खर्डी येथील खाजगी सिताराम साखर कारखान्याच्या गेट समोरील तरुण शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन अखेर गुरुवारी चौथ्या दिवशी मागे घेण्यात आले. कारखान्याच्या सर्वेसर्वा राजलक्ष्मी गायकवाड यांनी सर्व मागण्या मान्य केल्याचे लेखी पत्र दिल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले.



आंदोलकांना पत्र देताना राजलक्ष्मी गायकवाड, शेजारी उमेश परिचारक, निरीक्षक टी वाय मुजावर आदी. (छाया:-कटाक्ष फोटो.)

सोमवारपासून विविध मागण्यांसंदर्भात सुरू असणारे हे आंदोलन राज्यभर चर्चेला आले होते. कारखान्यातून होणारे हवा, पाणी, भूमी प्रदूषण अशा अनेक समस्यांच्या तक्रारीबाबत तरुण शेतकऱ्यांनी गेट समोर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. आज गुरुवार सायंकाळी पाच वाजता राजलक्ष्मी गायकवाड यांनी गजानन घाडगे, अनिल अगावणे, राजू पुंडेकर, आप्पासाहेब घाडगे, विष्णू सुळे, काशिलिंग खताळ यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर सर्व मागण्या मान्य केल्याचे लेखी पत्र दिले. यावेळी युटोपियन शुगरचे मालक उमेश परिचारक, तालुका पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांच्यासह तपकिरी शेटफळ, खर्डी भागातील अनेक शेतकरी , ग्रामस्थ उपस्थित होते.

कारखान्याच्या हंगाम काळात तसेच इतरही वेळेस सांडपाणी, बग्यास व दुर्गंधी या समस्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिक त्रस्त होतात. लवकरच यावर तोडगा काढणार असल्याचे कारखाना विभागाकडून सांगण्यात आले. यावेळी तहसीलदार सचिन लंगोटे व सर्व प्रशासन अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# औषध खरेदीचा प्रश्न ऐरणीवर

## १० कोटींच्या औषध खरेदीस पुन्हा मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

आषाढी वारी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असताना जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या औषध खरेदी प्रक्रियेतील विलंबाचा मुद्दा विशेष सभेत चर्चेचा केंद्रबिंदू ठरला. वारीसाठी आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्याच्या दृष्टीने सुमारे १० कोटी रुपयांच्या औषध खरेदी प्रस्तावाला सभागृहाने मंजुरी दिली; मात्र निविदा प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने सदस्यांनी प्रशासनाला जाब विचारला.

पंढरपूर येथे आयोजित विशेष सभेत आषाढी वारीच्या अनुषंगाने विविध विभागांच्या निविदा मंजुरीसाठी प्रस्ताव मांडण्यात आले. बहुतेक विभागांच्या निविदांना सभागृहाची मंजुरी मिळाली. मात्र आरोग्य विभागाचा औषध खरेदीचा विषय पुन्हा चर्चेत आला. जिल्हा आरोग्याधिकारी डॉ.सतीश कोपूरवाड यांनी सोलापूर, सातारा आणि पुणे जिल्ह्यांतील वारी व्यवस्थेसाठी औषध खरेदीची माहिती दिली.



यावेळी सदस्य व्यंकट भालके यांनी इतक्या मोठ्या प्रमाणावरील औषध खरेदीसाठी निविदा प्रक्रिया अद्याप पूर्ण का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित केला. तसेच औषध पुरवठा एका कंपनीपुरता मर्यादित न ठेवता विविध पुरवठादारांमार्फत खरेदी करून सर्व आरोग्य केंद्रांपर्यंत वेळेत औषधे पोहोचवावीत, अशी मागणी केली.

माळशिरस तालुक्यातील काही आरोग्य केंद्रांमध्ये औषधांची कमतरता असल्याची बाब सदस्य बागल यांनी निदर्शनास आणली. पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रांमध्ये कर्मचाऱ्यांचीही कमतरता असल्याने तातडीने मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. सभापती चेतन केदार यांनी वारी काळात औषधांचा तुटवडा भासणार नाही, यासाठी प्रशासनाने पर्यायी व्यवस्था केली असल्याचे स्पष्ट केले. तथापि, औषध खरेदी प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी व प्रशासकीय विलंबामुळे हा विषय पुन्हा सभागृहात आल्याने आरोग्य विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, इतर विभागांनी आपापल्या विकासकामांच्या व सुविधा पुरवठ्याच्या निविदा मंजूर करून घेतल्या असताना आरोग्य विभागाच्या औषध खरेदी प्रक्रियेतील विलंबाची चर्चा सभागृहात अधिक रंगली. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आता औषध खरेदीची प्रक्रिया किती वेगाने पूर्ण होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### फार्मासिस्टमुळे झाला गोंधळ

जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने अनुभवी फार्मसिस्ट नियुक्ती करण्याची तयारी केली होती. पण फार्मासिस्ट पुजारी यांनी विभागीय आयुक्तांकडून नियुक्ती आणली. मुख्य औषध भंडाराचा कारभार मोठा असल्यामुळे व पुजारी यांना अनुभव नसल्यामुळे आषाढी वारीच्या औषध खरेदीचा गोंधळ उडाला आहे. निविदेवर सीईओ व डीएचओ यांच्या सह्या न घेताच अपलोड केल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे औषध खरेदी रखडली. त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित होते. पण प्रशासनाने चालढकल करून त्यांच्या कारभाराला पाठीशी घातल्याचे दिसून आले आहे.

### डीएचओंनी तसा प्रस्ताव दिला नाही

आरोग्य सभापती चेतन केदार यांनी हा गोंधळ थांबविण्याबाबत यापूर्वी सूचना केल्या आहेत. अनुभवी फार्मशिष्ट नेमावा असे सांगूनही डीएचओनी तसा प्रस्ताव दिला नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सभेत औषध खरेदीवरून गोंधळ दिसून आला. इतर विभागांनी मात्र आपल्या कामाच्या सर्व निविदा सभागृहाकडून मंजूर करुन घेतल्या.

## महत्वाचे...



### परीक्षा, प्रवेश पोर्टलच्या तांत्रिक अडचणींसाठी उद्या सोलापूर विद्यापीठात विशेष ट्रेनिंग

**सोलापूर, दि.२५ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या ऑनलाइन प्रवेश आणि परीक्षा पोर्टलमधील तांत्रिक अडचणींमुळे महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणींची दखल विद्यापीठ प्रशासनाने घेतली आहे. कॉलेज कर्मचारी युनियन, सोलापूर जिल्हा यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर शनिवार, दि.२७ जून २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुल सभागृहात सर्व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी एका विशेष ट्रेनिंग प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले आहे. कॉलेज कर्मचारी युनियनने २५ जून रोजी कुलगुरूंची भेट घेऊन ऑनलाइन पोर्टलवरील त्रुटींमुळे विद्यार्थी, पालक आणि कर्मचाऱ्यांना होणाऱ्या त्रासाबाबत निवेदन दिले होते. यावर तात्काळ तोडगा काढण्यासाठी कुलगुरूंनी या विशेष प्रशिक्षणाचे आदेश दिले. या ट्रेनिंगमध्ये ऑनलाइन प्रवेश पोर्टल मधील नवीन सुधारणा, परीक्षा विभागाचे फॉर्म सबमिशन, हॉलतिकीट, निकाल प्रक्रिया, हेल्पडेस्क प्रणालीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. या ट्रेनिंगसाठी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांतील प्रवेश व परीक्षा प्रक्रिया पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. ट्रेनिंगला येताना गेल्या महिनाभरात आलेल्या तांत्रिक अडचणींची लेखी यादी सोबत आणायची आहे, असे सांगण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मलिक रोकडे, अधिसभा सदस्य अजितकुमार संगवे, सिध्देश्वर स्वामी, युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर आणि सुरेश वाघमारे आदी उपस्थित होते.

### वळसंगच्या ऐतिहासिक विहिरीच्या सुशोभीकरणासाठी निधी देण्याची मागणी

**सोलापूर, दि.२५ जून-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतींशी निगडित ऐतिहासिक विहिरीच्या सुशोभीकरणासाठी उर्वरित निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. वळसंग येथील भीमनगर परिसरातील ही ऐतिहासिक विहीर सामाजिक समतेच्या चळवळीचे प्रतीक मानली जाते. या ऐतिहासिक स्थळाच्या परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी सुमारे चार कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून, विकासकामांना प्रारंभ झाला आहे. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली या कामांची सुरुवात करण्यात आली. उर्वरित विकासकामे पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांमधून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी आनंद चंदनशिवे यांनी विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

### ७४ नाल्या संदर्भात नागरिकांच्या हरकती, सूचना मागवा

**सोलापूर, दि.२५ जून-**

सोलापूर महानगरपालिकेने शहरातील पावसाळी पाणी साचण्याच्या समस्येवर ठोस तोडगा काढण्यासाठी ७४ नाल्यांचा पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास महापालिका आयुक्तांनी सक्षम मंजुरी दिली आहे. दरम्यान, संभाव्य अडचणी व समस्या उद्भवण्याची शक्यता असल्याने या नाल्यासंदर्भात नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्याची आवश्यकता आहे, अशी मागणी महापालिका सभागृह येथे




नरेंद्र काळे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. शहरात दरवर्षी पावसाळ्यात सखल भागांमध्ये पाणी साचून नागरिकांना होणाऱ्या त्रासावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येणार आहेत. सन २०१८, २०२० आणि २०२५ मध्ये शहरातील अनेक भागांमध्ये गंभीर जलसंचय निर्माण झाला होता. पावसाचा योग्य निचरा न होणे, नैसर्गिक प्रवाहात अडथळे व नाल्यांवरील अतिक्रमण ही यामागील प्रमुख कारणे होती. ही परिस्थिती पुन्हा उद्भवू नये, यासाठी महानगरपालिकेने आराखडा तयार केला. ड्रोन सर्व्हेक्षण, सॅटेलाईट इमेज, टोपोशीट व टोटल स्टेशन सर्व्हेच्या आधारे शहरातील १७८ चौ.कि.मी. क्षेत्रात ७४ नाले निश्चित करण्यात आले असून, त्यांची ६ बेसिनमध्ये विभागणी करण्यात आली आहे. नाल्यांची एकूण लांबी सुमारे ११५.७७ कि.मी. इतकी आहे. आराखड्यानुसार नाल्यांची सफाई, गाळ काढणे, अतिक्रमणे हटवणे, नाल्यांची रुंदी व खोली वाढवणे, भूमिगत नाले, बॉक्स कल्व्हर्ट व क्रॉस ड्रेनेजची कामे करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ३० नाल्यांवर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आले आहे. हा आराखडा तयार करण्यापूर्वीच या नाल्या संदर्भात सोलापूर शहरातील नागरिकांकडून हरकती व सूचना मागविणे आवश्यक होते, असेही त्यांनी सांगितले.

### दारुच्या नशेत पिले डिझेल

**सोलापूर, दि. २५ जून-**

मित्रांबरोबर भांडणात एका मित्राने दारूच्या नशेत डिझेल पिल्याची घटना मोहोळ शहरात गवत्या मारुती चौकात गुरुवारी सायंकाळी घडली. मुकुंद भारत तेली (वय-४३, रा.मोहोळ) असे त्या व्यक्तीचे नाव आहे. गवत्या मारुती चौकातील एका दुकानात तक्रार झाल्याने त्यांनी दारुच्या नशेत डिझेल पिले. याचा त्रास होऊ लागल्याने त्याला मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाऊ अजित तेली यांनी दाखल केले.




## मोहरमनिमित्त मानाच्या पंजा, सवारींची मिरवणूक उत्साहात

### ५१ धावत्या मशालींसह निघालेली दुर्वेश सवारी विशेष आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

मोहरम उत्सवाच्या नवव्या दिवशी गुरुवारी सायंकाळपासून ते शुक्रवारी पहाटेपर्यंत सोलापूर शहरातील विविध भागांतून मानाच्या पंजा व सवारींच्या भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. धार्मिक उत्साह, पारंपरिक विधी आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडविणाऱ्या या मिरवणूकप्रसंगी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बेगमपेठेतील स्वकुळसाळी समाजाच्या वतीने विठ्ठल मंदिर परिसरातून मानाच्या इमाम हुसेन पंजाची सर्व हिंदू-मुस्लिम बांधवांच्या सहभागातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा गजर, धार्मिक घोषणाबाजी करण्यात आली.

मध्यरात्रीनंतर बडे बानेकरी तालीम येथून पीर हुसेन बाशा सवारी मार्गस्थ झाली. शुक्रवारी पहाटे पाच वाजता शनिवार पेठ येथील मानाची दुर्वेश सवारी आणि इमाम ए हसन या दोन बंधूंच्या पंजाची संयुक्त मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीच्या अग्रभागी सजविण्यात आलेला घोडेस्वार 'राजा' आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

दुर्वेश सवारीच्या वतीने धावत्या मशालींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ५१ धावत्या मशालींसह निघालेली दुर्वेश सवारी भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली. पेटत्या मशालींसह धावणाऱ्या युवकांचा उत्साह आणि त्यातून साकारलेले दृश्य पाहण्यासाठी मिरवणूक मार्गावर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

शुक्रवारी सकाळी ६ वाजता मानाच्या दादा पीर पंजाची मिरवणूक मानकरी किरण सपार परिवाराच्या वतीने काढण्यात आली. भारतीय चौक, बाराइमाम चौक, विजापूर वेस, माणिक चौक आणि दत्त चौक मार्गे आसार मैदानावर मिरवणुका दाखल झाल्या.

आसार मैदान येथे भेट देऊन सर्व धार्मिक विधी पार पडल्यानंतर या मिरवणुका पुन्हा आपापल्या मूळस्थानी मार्गस्थ झाल्या. मोहरमच्या नवव्या दिवशी सोलापुरात धार्मिक श्रध्दा, परंपरा आणि सामाजिक ऐक्याचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. यावेळी रात्रभर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



## १३७८ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा विभाग ५ व ६ मध्ये आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

शहरासाठी प्रस्तावित १३७८ कोटी रुपयांच्या सर्वसमावेशक पाणीपुरवठा योजनेच्या अनुषंगाने विभागीय कार्यालय क्रमांक ५ व ६ मधील प्रभागांचा सविस्तर आढावा महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात झालेल्या बैठकीत नवीन जलकुंभ, एमबीआर, मुख्य व वितरण जलवाहिन्या तसेच आवश्यक जागांच्या उपलब्धतेबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, नगरसेविका वृषाली चालुक्य, वनिता पाटील, सुमन चाबुकस्वर, अनिशा मंगल, वैशाली भोपळे, नगरसेवक अजहर हुंडेकरी, किसन जाधव, सत्यजित गायकवाड, राजशेखर पाटील, ऋषिकेश म्हेत्रे, चैत्राली गायकवाड, सोनाली गायकवाड, शिवराज गायकवाड, अर्जुन गायकवाड, महादेव गवळी, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी प्रकाश सांवत, उमर बागवान उपस्थित होते.

### वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणाची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

धुळ्यात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका २० वर्षीय तरुणाने अज्ञात कारणावरून राहत्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भवानी पेठ भागातील मुकुंद नगरात गुरुवारी उघडकीस आली. अथर्व सचिन म्हाळगी (रा.मुकुंदनगर भवानी पेठ, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. गुरुवारी सकाळी अथर्वची आई ही नेहमीप्रमाणे कामावर तर आजी सत्संग कार्यक्रमाला गेली होती. तेव्हा, त्याने गळफास लावून घेतला. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्याच्या पश्चात आई-वडील आणि आजी असा परिवार आहे.

## करमाळा आयटीआयला मदनदास देवी यांचे नाव

### 30 जून रोजी होणार नामकरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२५ जून-**

करमाळा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला (आयटीआय) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सह-सरकार्यवाह आणि थोर समाजसेवक कै.मदनदास देवी यांचे नाव देण्यात येणार आहे. मंगळवार, दि.३० जून २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता संस्थेच्या प्रांगणात एका विशेष सोहळ्यातंर्गत नामाभिदान करण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.शांतिनाथ बगवेवाडी, प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी यांनी दिली.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत. कै.मदनदास देवी यांच्या राष्ट्रकार्याचा आणि स्थानिक भूमीशी असलेल्या नात्याचा गौरव म्हणून करमाळा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला त्यांचे नाव देण्यात येत आहे. शासनाच्या या निर्णयामुळे करमाळा परिसरासह राज्यातील सामाजिक



आणि शैक्षणिक वर्तुळातून तीव्र आनंद व्यक्त होत आहे, असेही त्यांनी सांगितले.

### करमाळ्याचे सुपुत्र आणि कुशल संघटक

मूळचे करमाळा (जि.सोलापूर) येथील असलेल्या मदनदासजी देवी यांचे राष्ट्रीय स्तरावरील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान अतुलनीय राहिले आहे. त्यांनी एम.कॉम., एलएल.बी. आणि चार्टर्ड अकाउंटंट असे उच्च शिक्षण पूर्ण केले होते. १९६९ मध्ये त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून स्वतःला राष्ट्रकार्यासाठी समर्पित केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या भक्कम उभारणीत, वैचारिक मांडणीत आणि देशव्यापी विस्तारात मदनदासजींचा सिंहाचा वाटा होता. त्यानंतर त्यांनी संघाचे अखिल भारतीय सह-सरकार्यवाह म्हणून दीर्घकाळ जबाबदारी सांभाळली.

### रा.स्व.संघ, भाजपमधील समन्वयाचा मुख्य दुवा

स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या कार्यकाळात मदनदासजी यांनी संघ आणि भाजपमधील मुख्य समन्वयक (दुवा) म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. अत्यंत गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीतही सरकार आणि संघ परिवार यांच्यात योग्य ताळमेळ राखण्याचे काम त्यांनी पडद्यामागून अतिशय मुत्सद्दीपणे केले.अत्यंत साधी राहणी, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि माणसांची अचूक पारख हे त्यांचे वैशिष्ट्य होते. आज राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे तत्कालिन राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यासह अनेक दिग्गजांना सुरुवातीच्या काळात ओळखण्यात आणि त्यांचे नेतृत्व घडवण्यात मदनदासजींचे मोलाचे योगदान राहिले आहे.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयातील नॉन-टीचिंग कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न मार्गी लागला असून कर्मचाऱ्यांच्या पगारात दरमहा ७ हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. कामगार क्रांती युनियनचे नेते अशोक जानराव यांच्या पाठपुराव्यामुळे हा तोडगा निघाला आहे.

महाविद्यालयातील नॉन-टीचिंग कर्मचाऱ्यांनी वेतनवाढीची मागणी करत



आंदोलनाचा इशारा दिला होता. यासंदर्भात कामगार संघटना आणि महाविद्यालय प्रशासन यांच्यात अनेक फेऱ्यांच्या चर्चा झाल्या. मात्र सुरुवातीला कोणताही तोडगा न निघाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण होते. माजी खासदार प्रितम मुंडे यांनी वेतनवाढीचे निर्देश दिल्यानंतरही प्रशासनाकडून निर्णय लांबणीवर टाकला जात असल्याने कामगार नेते अशोक जानराव यांनी कामगार आयुक्त मंगेश झोले यांच्याकडे दाद मागितली. यानंतर कामगार आयुक्त कार्यालयाच्या मध्यस्थीने झालेल्या बैठकीत कामगार संघटना व महाविद्यालय प्रशासन यांच्यात सविस्तर चर्चा होऊन तडजोडीचा मार्ग स्वीकारण्यात आला. या चर्चेनंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनात दरमहा ७ हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी माजी खासदार प्रितम मुंडे यांच्याशीही दूरध्वनीवरून चर्चा करण्यात आली.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### गार्डन लव्हर्स ग्रुपच्या वतीने उद्यापासून चित्रकला प्रदर्शन

**सोलापूर, दि.२५ जून-**

युवा चित्रकारांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्याच्या अनुषंगाने येथील गार्डन लव्हर्स ग्रुपच्या वतीने डफरीन चौक येथील पु.ना. गाडगीळस्थित झपुर्झा आर्ट गॅलरी येथे शनिवार, दि.२७ जून ते शुक्रवार, दि.३ जून या कालावधीत चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले, अशी माहिती राजस शहा यांनी पत्रपरिषदेत दिली. शनिवार, दि. २७ जून रोजी सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ चित्रकार नितीन खिलारे यांच्या हस्ते, सुयश गुरुकुलचे संस्थापक, प्राचार्य केशव शिंदे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव, आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर, पु.ना.गाडगीळ ॲन्ड सन्सचे जितेंद्र जोशी यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. वेदा होमकर, हर्षिता पवार यांनी साकारलेल्या विविध आकर्षक चित्रकृती या प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत. दररोज सकाळी ११.३० ते रात्री ८.३० यावेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रपरिषदेला अमोल मोहिते, दीपक पवार, डॉ.राजेंद्र लोणीकर आदी उपस्थित होते.

### अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधात उद्या शनिवारी आंदोलन

**सोलापूर, दि.२५ जून-**

अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये प्रस्तावित अ.ब.क.ड. उपवर्गीकरण लागू करण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात आरक्षण एकता समिती, सोलापूरच्या वतीने शनिवार,दि. २७ जून रोजी दुपारी १२ वाजता पूनम गेट येथे धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे संयोजक अशोक आगवणे यांनी पत्रपरिषदेत दिली. अनुसूचित जाती समाजाच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी हे आंदोलन करण्यात येणार असून, आरक्षणामध्ये उपवर्गीकरण केल्यास समाजात फूट पडून सामाजिक ऐक्य धोक्यात येण्याची भीती समितीने व्यक्त केली आहे. त्यामुळे शासनाने प्रस्तावित अ.ब.क.ड. उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द करावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे. अनुसूचित जाती समाजातील युवक, विद्यार्थी, कर्मचारी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या पत्रपरिषदेस आप्पासाहेब लोकरे, बाबासाहेब कांबळे, फारुख शेख, राजकुमार कांबळे, बाबुराव इंगळे, रॉबर्ट गौडर, शिवपुत्र घटकांबळे आदी उपस्थित होते.

### अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग; तरुणाला अटक

**श्रीपूर, दि.२५ जून-**

येथील एका विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनी शाळेत जात असताना तिचा विनयभंग केल्याप्रकरणी महाळुंग-मायनर येथील जीवन जयवंत घाडगे या तरुणास पोलिसांनी अटक करुन गुन्हा दाखल केला आहे. ती अल्पवयीन विद्यार्थिनी शाळेला जात असताना जीवन घाडगे हा मोटरसायकलवर येत तिची अडवणूक करत अश्लिल हावभाव करत होता. त्यास तिने विरोध केला असता त्याने तिला धमकी दिली. अखेर त्याच्या तावडीतून सुटत तिने घरी येऊन थोरल्या बहिणीस झालेला प्रकार सांगितला. बहिणीने आईवडिलांना ही गोष्ट सांगते, तू शाळेला जा असे म्हणून तिने शाळेला पाठविले. शाळेत आल्यावर तिने मुख्याध्यापक प्रा.बनसोडे यांना ही गोष्ट सांगितली असता त्यांनी तिच्या आईवडिलांना बोलावून घेत पोलिसांना ही खबर दिली. नर्भया पथकाच्या प्रमुख करिष्मा वनवे व सहकारी पोलिसांनी त्यास न्यायालयात उभे केले असता ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

# एक कप चहासाठी आम्ही सभेला येतो का? ‘आषाढी वारी’च्या सभेत संतप्त सवाल

**सदस्य अण्णासाहेब ढाणे यांनी उपस्थित केला प्रश्न;**

**महिला सदस्यांचाही आक्रमक पवित्रा**

**प्रशासनाला धरण्यात आले धारेवर**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील गोपाळपूरमधील सोयरी अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत विविध विकासकामे, पालखी मार्गावरील सुविधा आणि प्रशासनाच्या कार्यपध्दतीवरून जोरदार खडाजंगी झाली. ‘आम्ही सदस्य जनतेचे प्रश्न मांडतो, पण त्याची नोंदच होत नसेल तर सभा घेण्याचा उपयोग काय? आम्ही एक कप चहासाठी येथे येतो का? लोकांसमोर जाऊन काय सांगायचे?’ असा संतप्त सवाल अण्णासाहेब ढोणे या सदस्याने केला.

पदाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी, संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात संगनमत आहे. ‘टेंडरबाबत बैठक घेतली जाते; मात्र टेंडर आधीच मंजूर झालेले असतात. मग आम्हाला विचारण्याचा अर्थ काय? आम्ही वेडे आहोत का?’ असा सवालही अण्णासाहेब ढोणे यांनी केला. दरम्यान, महिला सदस्यांनीही आक्रमक पवित्रा घेत टेंडर प्रक्रियेसह पालखी मार्गावरील विविध सुविधांविषयी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले होते.

आषाढी वारीसाठी उभारण्यात येणाऱ्या जर्मन हॅंगर मंडपांवरही त्यांनी टीका केली. ‘‘अगोदर पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्त करा, खड्डे बुजवा. गेल्या वर्षी अनेक ठिकाणी जर्मन हॅंगर मंडप गळाले, काही ठिकाणी कोसळलेही होते. निधी आल्यानंतर विशेष सभा घेतली असती तर सदस्यांनी चांगल्या सूचना दिल्या असत्या,’’ असे त्यांनी सांगितले. स्वागत कमानी उभारण्याऐवजी वारकऱ्यांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली.

यावर जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी विविध मुद्द्यांवर खुलासा करताना निधी देण्यासंबंधी सकारात्मकता दर्शवली.

या सभेत पंढरपूर तालुक्यातील कासेगाव गटाचे व्यंकट भालके यांनी वारीच्या काळात काही खाजगी डॉक्टर पंढरपूर शहर सोडून जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. वारी कालावधीत डॉक्टरांनी शहरातच उपलब्ध राहावे, यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ठराव करून जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवावे, अशी मागणी करण्यात आली. रस्ते, पाणीपुरवठा आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. शन्मुखी कोरके, मयुरी बागल, गीतांजली साळुंखे, वंदना कांबळे यांच्यासह अन्य सदस्यांनी विविध प्रश्न मांडले.

गोळेगाव येथे शेगावच्या गजानन महाराज पालखी सोहळ्याच्या मुक्कामासाठी कायमस्वरुपी सुविधा उभारण्यात यावी. याठिकाणी सुमारे एक हजार भाविक येत असल्याने सभामंडपासाठी १५ लाख रुपये, रस्त्यासाठी १५ लाख रुपये आणि स्ट्रीट लाईटसाठी ५ लाख रुपये निधी मंजूर करावा, अशी मागणी खंडागळे यांनी केली. अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांनी माळीनगर परिसरातील उड्डाणपूल, रस्ते, गटारी आणि इतर प्रलंबित कामांचे प्रश्न उपस्थित केले. या बैठकीस जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, गटनेत्या रश्मी बागल, मुख्यकार्यकारी अधिकारी कुशल जैन, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रशेखर जगताप, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रशासकीय अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्यकार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव आदी उपस्थित होते.

**या विषयांना देण्यात आली मंजुरी**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत जर्मन हॅंगर ८ कोटी, वॉटरप्रूफ मंडप ३.५ कोटी, औषध खरेदीसाठी १० कोटी, पाणीपुरवठ्यासाठी २ कोटी २८ लाख ,स्वागत कमानीसाठी ४ कोटी ४३ लाखाच्या कामांना मंजुरी देण्यात आली.

**प्री वारी आणि पोस्ट वारीची संकल्पना**

समाज कल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी वारी व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी ‘‘प्री वारी आणि पोस्ट वारी ही संकल्पना मांडली. वारीपूर्व काळात आवश्यक सुविधा, स्वच्छता, आरोग्य व्यवस्था, पाणीपुरवठा आणि रस्त्यांची तयारी यावर विशेष भर देण्यात यावा, वारीनंतर तात्काळ स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांची पुनर्स्थापना आणि कामांचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र नियोजन असावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**तयारीचा घेण्यात आला आढावा**

या सभेत पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा, ग्रामपंचायतस्तरीय नियोजन, वाहतूक नियंत्रण, आपत्कालीन सेवा, रस्ते दुरुस्ती, निवास व्यवस्था आणि सुरक्षा यंत्रणा यासंदर्भातील तयारीचा आढावा घेण्यात आला. संबंधित विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती सादर केली.



## महापालिकेत आत्मदहनाचा प्रयत्न, पोलिसांच्या सतर्कतेने अनर्थ टळला

**पुनर्वसनाच्या मागणीसाठी कुटुंबीयांचा आक्रोश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

शहरातील पाथरुट चौक परिसरातील बेघर झालेल्या मागासवर्गीय कुटुंबांच्या पुनर्वसनाच्या मागणीसाठी युवा भीम सेनेच्या नेतृत्वाखाली गुरुवारी सोलापूर महानगरपालिका येथे करण्यात आलेल्या आंदोलनादरम्यान एका महिलेने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या सतर्कतेने अनर्थ टळला. दरम्यान, पुनर्वसनाच्या मागणीसाठी या कुटुंबियांनी आक्रोश केला.

पाथरुट चौक परिसरातील सुमारे १५ ते १६ कुटुंबांची घरे अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान पाडण्यात आली होती. या कारवाईनंतर संबंधित कुटुंबे बेघर झाली असून त्यांच्यासमोर निवारा आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुनर्वसनाशिवाय कारवाई केल्याचा आरोप करत ही कुटुंबे गेल्या काही दिवसांपासून न्यायासाठी संघर्ष करीत आहेत.

युवा भीम सेनेच्या वतीने अनेकवेळा महापालिका प्रशासनाकडे निवेदने देऊन पर्यायी जागा व तात्पुरत्या निवाऱ्याची मागणी करण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने संतप्त कुटुंबीयांनी गुरुवारी महापालिका गाठली. आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन सुरु असतानाच काही आंदोलनकर्त्यांनी अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला.

पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत संबंधित महिलेला आणि इतर आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. पोलिस आणि सुरक्षा रक्षकांनीही तत्परता दाखवत परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी संबंधित कुटुंबीयांचे म्हणणे ऐकून घेतले. संबंधित कुटुंबांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

## पत्नीप्रमाणे राहणाऱ्या प्रेयसीच्या खूनप्रकरणी नारायण घोगरकर याला जन्मठेप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२५ जून-**

पत्नीप्रमाणे राहणाऱ्या प्रेयसीच्या खूनप्रकरणी नारायण घोगरकर याला जन्मठेप व १० हजार रुपये दंडाची शिक्षा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश ओंकार देशमुख यांनी सुनावली.



यात हकीकत अशी की, मुळचे राहणारे मुळशी, ता.मुभागड, जि.रायगड येथील नारायण भुऱ्या घोगरकर मयत मखु बळीराम मोरे व फिर्यादी नथ्थू जाधव हे तुंगत गावचे शिवारात गुन्हा घडण्याअगोदर एक महिन्यापासून चिलारीची झाडे तोडून त्याचा कोळसा करण्याचे काम करत होते.

यातील मयत सखू व आरोपी नारायण हे पती-पत्नी सारखे राहत होते. फिर्यादी नथ्थू हा वेगळा राहत होता. मयत व आरोपी हे किरकोळ कारणावरुन वारंवार वाद करत होते. दि.२६ मे २०१७ रोजी यातील आरोपी व मयत यांच्यात वाद झाला. त्यावेळी फिर्यादी हा गावातून बाजार घेवून आला त्यांच्या समोर देखील आरोपी व मयत यांची जोरात भांडणे सुरु होती.

आरोपी मयत सखु हिस काठीने मारत होता व तुला आता जिवंत सोडत नाही, तुला खल्लास करतो, असे म्हणत होता. त्यावेळी फिर्यादीने भांडणे सोडविण्याचा प्रयत्न केला त्यावेळी आरोपी नारायण याने फिर्यादीस हातातील काठीने डाव्या खांद्यावर, मानेवर पाठीवर मारहाण केली. त्यामुळे भीतीपोटी फिर्यादी त्यांच्या कोपीत येवून बसला.

थोडया वेळाने मयत सखु हिचा मेली मेली असा आवाज ऐकू आला. परंतु फिर्यादी आरोपी परत मारेल म्हणून तेथे न जाता कोपीत झोपला. सकाळी उठून आरोपीच्या कोपीत जावून पाहिले असता सखु ही निपचित पडली होती. तिला कपाळावर, डोकीत मारहाण झाली होती व ती मयत झाली होती.

त्याने गावातील लोकांना घडला प्रकार सांगितला. आरोपी विरुध्द पंढरपूर तालुका पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. पोनि गौराशंकर शिंदे यांनी या गुन्ह्याचा तपास करुन आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. यात सरकार पक्षातर्फे ११ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये नथ्थू जाधव, डॉ.योगेश्वरी माने पंच साक्षीदार, ठाणे अंमलदार महिला एएसआय शबनम शेख, तपासी अधिकारी गौरीशंकर शिंदे यांची साक्ष महत्वाच्या ठरल्या.

आरोपी व मयत यांच्यात वाद व मारहाण होताना पाहणारा फिर्यादी महत्वाचा साक्षीदार आहे. आरोपी व मयत एकत्र असताना पाहणारा देखील हा साक्षीदार आहे. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून निघून जाणे या सर्व बाबी महत्वाच्या असून अशा परिस्थितीत घटनेशी त्याचा संबंध नाही. यांसारखे मुद्दे सरकार पक्षाकडून न्यायालयासमोर मांडण्यात आले. सरकार पक्षातर्फे ॲड.सारंग वांगीकर यांनी काम पाहिले. पर्यवेक्षण अधिकारी म्हणून पंढरपुर तालुका पोलिस ठाण्याचे पोनि टी. वाय. मुजावर, कोर्ट पैरवी म्हणून सपोनि अनिता नागराळे, पोह श्रीकांत धोत्रे यांनी काम पाहिले.

## आषाढी वारी निधीचा प्रत्येक रुपया पारदर्शकपणे खर्च करा; स्थायी समितीच्या बैठकीत अधिकाऱ्यांना सक्त सूचना

**वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, सुरक्षा संदर्भात आढावा**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

आषाढी वारी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची महत्त्वपूर्ण बैठक पंढरपूर येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये संपन्न झाली. आषाढी वारीसाठी शासकीय निधीचा प्रत्येक रुपया पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त खर्च करण्यात यावा, अशा सक्त सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे, गटनेत्या रश्मी बागल, मुख्यकार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रशासकीय अधिकारी स्मिता पाटील, उपमुख्यकार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव उपस्थित होते.

आषाढी वारीसाठी पंढरपूरमध्ये दाखल होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सुविधा व सुरक्षेच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पालखी मार्गावरील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, आरोग्य सेवा, निवारा व्यवस्था, वाहतूक नियंत्रण तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठीच्या यंत्रणेवर सखोल चर्चा करण्यात आली.

वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुखकर आणि सुसंघटित व्हावा यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वारी काळात कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजनांची अंमलबजावणी तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

## राज्यमाता गोमाता संवाद यात्रा शनिवारी सोलापुरात

**फडकुले सभागृहात गोसंवाद, गो-उत्पादन प्रदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

महाराष्ट्रातील देशी गोवंशाचे संरक्षण, संवर्धन आणि गोशाळांना आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र गौसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यमाता गौमाता संवाद यात्रा शनिवार, दि.२७ जून २०२६ रोजी सोलापुरात येत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संवाद यात्रा कार्यक्रम संयोजक महेश भंडारी यांनी पत्रपरिषदेत दिली.

शनिवारी दुपारी ४.३० वाजता चार हुतात्मा पुतळा येथून दिंडीला प्रारंभ होईल. डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे गोमाता संवाद, गो-उत्पादन प्रदर्शन, नैसर्गिक शेतीविषयक मार्गदर्शन, शासनांच्या विविध योजनांची माहिती, गोशाळा विकाससंदभात परिसंवाद, गोवंश संवर्धनबाबत जनजागृती आदी कार्यक्रम होणार आहेत. यावेळी ह.भ.प.गहिनीनाथ औसेकर, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.देवेंद्र कोठे, आ.राजेंद्र राऊत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली दि. २२ जून ते ५ जुलै या कालावधीत राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये ही यात्रा सुमारे ६ हजार किलोमीटरचा प्रवास करणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रपरिषदेला ओमप्रकाश लड्डा, अमोल उंबरजे, उल्हास बोराळकर आदी उपस्थित होते.

# १५ ऑगस्टपूर्वी सोलापूर शहरात धावणार ई-बसेस्

**आंबेडकर वाहनतळाचे ८० टक्के काम पूर्ण**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत सोलापूर शहरासाठी मंजूर झालेल्या १०० इलेक्ट्रिक बसेस्च्या आगमनाची तयारी अंतिम टप्प्यात आली. न्यू बुधवार पेठेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाहनतळाचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. दि.१५ ऑगस्टपर्यंत शहरात किमान १५ ते ३० ई-बसेस् नागरिकांच्या सेवेसाठी दाखल करावेत अशा सूचना महापौर विनायक कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिली.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात गुरुवारी झालेल्या आढावा बैठकीत पीएम ई-बस सेवा योजनेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते, सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, नगरसेविका रोहिणी तडवळकर, नगरसेवक मनीष केत, जेबीएम कंपनीचे प्रतिनिधी कुलदीप गंगुरडे, ‘परिवहन’चे नीलकंठ मठपती, अविनाश वाघमारे, अभिजित बिराजदार उपस्थित होते.

सोलापूर शहरासाठी मंजूर झालेल्या १०० बसांमध्ये ९ मीटर लांबीच्या ७० आणि १२ मीटर लांबीच्या ३० बसांचा समावेश आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक वाहतुकीची गरज लक्षात घेऊन या बसांना मंजुरी देण्यात आली आहे. योजनेअंतर्गत टी.पी. क्रमांक २, न्यू बुधवार पेठ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाहनतळ उभारण्यात येत आहे, असेही सांगण्यात आले.

शहरासह ग्रामीण भागात अधिक बससेवा उपलब्ध करून देणे, बसथांब्यांवर वेळापत्रक प्रदर्शित करणे, विद्यार्थी व महिलांसाठी विशेष बससेवा सुरु करणे, तीर्थक्षेत्रांसाठी नवीन मार्ग विकसित करणे आणि ऑनलाइन तिकीट सुविधा उपलब्ध करुन देणे आदी सूचना यावेळी मांडण्यात आल्या.

**करार झाल्यानंतर चार्जिंग पॉइंट कार्यान्वित**

वाहनतळासाठी आवश्यक असलेली ३३ केव्ही वीजवाहिनी, ५००० केव्हीए क्षमतेची वीज यंत्रणा, चार्जिंग स्टेशन, कार्यशाळा, प्रशासकीय इमारत आणि वॉशिंग एरिया या सुविधांच्या उभारणीचीही माहिती देण्यात आली. उपकेंद्र व केबल टाकण्याची कामे पूर्ण झाली असून जेबीएम कंपनीसोबत करार झाल्यानंतर चार्जिंग पॉइंट कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

**शासन नियुक्त जेबीएम कंपनी सर्व संचालन करणार**

ई-बस संचालनासाठी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या जेबीएम प्रा.लि.,नवी दिल्ली या कंपनीसोबतच्या करारातील अटी-शर्तींवरही यावेळी चर्चा करण्यात आली. बसेस्चे संचालन, देखभाल-दुरुस्ती, चालकांची नियुक्ती, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि इतर खर्च कंपनीमार्फत करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

**सर्व कामे निर्धारित मुदतीत पूर्ण करावीत**

सर्व कामे निर्धारित मुदतीत पूर्ण करुन सोलापूरकरांना आधुनिक, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यात यावे, असे निर्देशही महापौर विनायक कोंड्याल यांनी संबंधितांना दिले.


CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४८३

**लेकुराची आळी मायबापापुढे ।**
**पुरवी लाडें कोडें लळे त्याचे ॥**

मुलांचा हट्ट हा ज्यांच्यावर त्यांचा अधिकार चालतो त्यांच्यासमोर असतो. म्हणून मुलं अज्ञान असली तरी परक्यांसमोर, अनोळखीसमोर हट्ट करीत नाहीत. मुलांचा अधिकार प्रामुख्याने त्यांच्या आईवडीलांवर असतो. सेनाजींसारखे महात्मे वयाने मोठे झाले तरी ते आत्म ज्ञानाच्या दृष्टीने स्वत:ला अज्ञानी व लहानच समजतात. असे महात्मे आपले अज्ञान आणि लहानपण नष्ट होण्यासाठी संत महात्म्यांसमोर मार्गदर्शनाचा, कृपाशिर्वादाचा अट्टहास करतात. आई वडील वाट्टेल ते करून त्यांच्या मुलांचे लळे पुरवतात. हे लळे नाराजीने किंवा चिडून न पुरवता ते लडिवाळपणाने, कौतुकाने आणि आनंदाने पुरवतात. अगदी त्याप्रमाणे **संत महात्मे सेनाजींच्या, लेकुराची आळी मायबापापुढे । पुरवी लाडें कोडें लळे त्याचे ॥**, या म्हणण्याप्रमाणे त्यांना शरण जाणाऱ्यांच्या बाबतीत लळे पुरवतात. संत, महात्म्यांना शरण जाण्यासाठी सद्बुध्दी सुचावी लागते. ही सद्बुध्दी तेव्हाच सुचते, जेव्हा हा संसार, संसारात निर्माण केलेली नाती-गोती खोटी वाटू लागतात. संसाराचा मायाजाल खोटा वाटण्यासाठी देहाची पराधिनता लक्षात आली पाहिजे. अर्थात, नाशवंत देहाला आणि निश्चित एके दिवशी



नाश पावणाऱ्या सत्ता संपत्तीला खऱ्या अर्थाने ओळखले पाहिजे. ही ओळख संत सहवासात आपोआप होते. त्यामुळे आनंदही आपोआप मिळतो.

श्री ज्ञानेश्वर माऊलींनी आतां या शब्दाची खरी महती पसायदानातून पटवून दिली आहे. अठरा अध्यायाच्या समाप्तीनंतर म्हणजे वाचकाला त्याचा खरा परिचय करुन दिल्यानंतर माऊलींनी आता या शब्दाने, **आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज दयावें । पसायदान हें ॥**, अशी पसायदानाची सुरुवात केली आहे. अर्थात, मनुष्य काम, क्रोध, मोह, मत्सर, ईर्षा, द्वेष, लोभ, अहंकार आदितून मुक्त झाल्यानंतर आत्मज्ञानाशिवाय कांही ईच्छा करणार नाही, याची माऊलींना खात्री आहे. अर्थात, संत साहित्यात आता या शब्दाचे वेगळे असे महत्व आहे. माऊलींच्या म्हणण्याप्रमाणे संत सेनाजी सर्व सांसारिक बाबीतून मुक्त झाल्यानंतर, **करावा सांभाळ सर्वस्वी गा आता । का हो अव्हेरिता जवळीचा ॥**, या शब्दांत आता तू सांभाळ करावा असे भगवंताला म्हणत आहेत. ज्याला स्वत:चा खरा परिचय झाला, त्या भक्ताला भगवंत दूर ढकलूच शकत नाही. खरे म्हणजे स्वपरिचय झालेला व्यक्तिच खऱ्या अर्थाने चालता बोलता भगवंत झालेला असतो. अशा व्यक्तिला आपपर, लहान मोठा असा कसलाच भेद जीवात जाणवत नाही. सर्व मानवी देहाकडून जर ही मानवतेची अपेक्षा पूर्णत्वास गेली तर समाजात कसल्याच प्रकारची दरी, वाद विवाद शिल्लक राहणार नाहीत. प्रयत्नाअंती हे साध्य होऊ शकते. हे लक्षात असू द्यावे की खरा आनंद हा समत्वातच आहे. जय जय राम कृष्ण हरी।-

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. २६ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ शु. द्वादशी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- विशाखा (१९.१५)**
**योग - सिद्ध (११.३८)**
**करण - बव (०९.१४)**
**राहू काल : शुक्रवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष : ✻ सामाजिक न्याय दिन.**
**१८७४: बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आणि शिक्षणाचा प्रसार करणारे कोल्हापूर संस्थानाचे राजे शाहू महाराज यांचा जन्म.**
**१८३८: 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताचे रचनाकार आणि प्रसिद्ध बंगाली कादंबरीकार बंकिमचंद्र चटर्जी यांचा जन्म.**
**१८८८ : मराठी संगीत नाटकांचे सम्राट आणि महान गायक-नट बालगंधर्व यांचा जन्म.**

# खा. संजय पाटील यांचा पत्रकारांकडून निषेध

## कारवाई करण्याची पत्रकार संघाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ जून-**

खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांविषयी केलेल्या कथित वक्तव्याच्या निषेधार्थ सोलापूरातील पत्रकार संघटनांनी तीव्र आंदोलन छेडले. सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि डिजिटल मीडिया पत्रकार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने निदर्शने करण्यात आली.

यावेळी पत्रकारांनी संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा निषेध करत, त्यांनी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. पत्रकारांबाबत वापरण्यात आलेली भाषा ही अत्यंत आक्षेपार्ह आणि निंदनीय असल्याचे आंदोलकांनी म्हटले.




आंदोलनादरम्यान पत्रकार प्रतिनिधींनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत पत्रकार हे जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. अशा परिस्थितीत एका खासदाराने पत्रकारांविषयी अवमानकारक भाषा वापरणे हे लोकशाही मूल्यांना धक्का देणारे आहे.

पत्रकार संघटनांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन खासदार संजय दिना पाटील यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच भविष्यात कोणत्याही लोकप्रतिनिधीकडून पत्रकारांचा अवमान होणार नाही यासाठी कठोर भूमिका घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या आंदोलनामुळे पत्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणात संतापाचे वातावरण असून, पत्रकारांच्या सन्मानासाठी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

# बँक ऑफ बडोदाकडून ठेवीदारांसाठी आकर्षक व्याजदरांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जून -**

बँक ऑफ बडोदाने ठेवीदारांसाठी दोन आकर्षक मुदतठेव योजनांची घोषणा केली असून, देशांतर्गत ग्राहकांसह अनिवासी भारतीयांसाठी (एनआरआय) अधिक परतावा मिळविण्याची संधी दिली आहे.

बँकेने नव्याने सुरू केलेल्या 'बॉब गोल्डन गोल डिपॉझिट' योजनेअंतर्गत ५५५ दिवसांच्या विशेष मुदतठेवीवर सर्वसामान्य नागरिकांना ६.७५ टक्के, ज्येष्ठ नागरिकांना ७.२५ टक्के, तर अतिज्येष्ठ नागरिकांना ७.३५ टक्के व्याजदर जाहीर केला आहे. गैर-प्रतिदेय ठेवींवर हा दर ७.४० टक्क्यांपर्यंत जाणार असल्याचे बँकेने स्पष्ट केले. याशिवाय, अनिवासी भारतीयांसाठी 'बॉब लीजेंड एफसीएनआर (बी) डिपॉझिट' योजनेअंतर्गत अमेरिकन डॉलर ठेवींवर वार्षिक ६.२५ टक्क्यांपर्यंत व्याजदर देण्यात येईल. तसेच कॅनेडियन डॉलरवर ५.१५ टक्के, ब्रिटिश पाउंड व ऑस्ट्रेलियन डॉलरवर ४.७५ टक्के आणि युरो ठेवींवर ३.७५ टक्क्यांपर्यंत व्याज मिळणार आहे. बँकेच्या विस्तृत आंतरराष्ट्रीय नेटवर्कमुळे जगभरातील भारतीय ग्राहकांसाठी सुरक्षित व आकर्षक गुंतवणूक पर्याय उपलब्ध होत आहे. एफसीएनआर (बी) ठेवींवर उपलब्ध असलेल्या ओव्हरड्राफ्ट व कर्जसुविधांमुळे ग्राहकांना तरलता राखूनही गुंतवणुकीचा लाभ घेता येणार आहे. नवीन योजनांमुळे देशांतर्गत तसेच परदेशातील भारतीय ठेवीदारांना अधिक आकर्षक परताव्याचा पर्याय उपलब्ध झाला असून, गुंतवणूकदारांकडून या योजनांना चांगला प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा बँकेने व्यक्त केली आहे.



# संघर्षमय जीवनप्रवास कथनातून अश्रूंना वाट मोकळी

## महापालिकेतर्फे 'एकल महिला दिन' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जून -**

आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'एकल महिला दिन' कार्यक्रम भावनिक वातावरणात पार पडला.

यावेळी एकल महिलांनी आपल्या संघर्षमय जीवनप्रवासाची कथा मांडली. आपल्या आयुष्यातील अडचणी, सामाजिक संघर्ष आणि शासनाकडून असलेल्या अपेक्षा मांडल्या. काही महिला भावना व्यक्त करताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, उपायुक्त सोनाली यादव, महिला व बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमात १५ एकल महिलांचा सन्मानचिन्ह व तुळशीचे रोप देऊन गौरव करण्यात आला.

# एन. बी. नवले सिंहगडला दुहेरी मानांकनाचा बहुमान

## महाविद्यालयाच्या गुणवत्तेची मोहोर

### Careers३६० कडून "AA+' रेटिंग तर विद्यापीठाच्या AAA-ऑडिटमध्ये "A++' ग्रेड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जून -**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांनी शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून महाविद्यालयाला राष्ट्रीय आणि विद्यापीठ स्तरावर दुहेरी सन्मान प्राप्त झाला आहे.

देशातील नामांकित शैक्षणिक मूल्यांकन संस्था Careers३६० ने महाविद्यालयाला 'AA+' रेटिंग प्रदान केले आहे, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या acdemic and dministrative audit (AAA) मध्ये महाविद्यालयाने ६०० पैकी ५५० गुणांसहीत उल्लेखनीय ९१.६६ टक्के गुणांसह 'A++' ग्रेड प्राप्त करून आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

देशातील अभियांत्रिकी शिक्षण संस्थांचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता, प्राध्यापकवर्ग, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधन कार्य, पायाभूत सुविधा, प्लेसमेंट, नवोपक्रम, विविधता आणि विद्यार्थी विकास या निकषांचा विचार केला जातो. या सर्व बाबींमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे Careers360 ने एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाला भारताच्या सर्वोत्तम अभियांत्रिकी संस्थांपैकी एक म्हणून मान्यता देत + रेटिंग प्रदान केले आहे.

शैक्षणिक नियोजन, प्रशासकीय कार्यक्षमता, विद्यार्थी सुविधा, संशोधन संस्कृती, गुणवत्ता हमी उपक्रम, परीक्षा व्यवस्था आणि संस्थात्मक विकास या सर्व क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे.

या दुहेरी यशाबद्दल संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, सिंहगड संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# 'अभिनव'चा सर्वधर्मीय वधू-वर मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जून -**

अभिनव सामाजिक संस्थेच्या वतीने समाज कल्याण केंद्र, रंगभवन याठिकाणी वधुवर परिचय मेळावा संस्थेचे अध्यक्ष मीनलताई दास यांच्या नेतृत्वात उत्साहात पार पडला. या मेळाव्याची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या परिचय मेळाव्यात ५० मुला मुलींची नावे नोंदवण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मीनल दास, शाम कदम, संभाजी भोसले, श्रीधर गोरे, सरोजिनी मकाई, अनिता वाघमारे, संजीवनी सलबत्ते, जयश्री




राणसरजे, सुनीता कारंडे, अर्चना अधटराव, प्रकाश कोळी, विशाल साळुंके, रोहित फावडे, शिरीष जगदाळे, विक्रम वानकर, संतोष सुरवसे आदी उपस्थित होते.

# कुसमोड येथील दोन मोटारीची अज्ञात व्यक्तीकडून चोरी

**पिलीव, दि २५ जून-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील नंदकुमार ज्ञानेश्वर लोखंडे यांच्या त्यांच्या शेतालगत ठेवलेल्या पाच एच पी च्या जलगंगा कंपनीच्या दोन मोटारीची बुधवारी रात्री अज्ञात व्यक्तींनी चोरुन नेल्याची तक्रार पिलीव पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे .एकाच वेळी दोन मोटारी चोरुन नेल्यामुळे कुसमोड परीसरात पुन्हा मोटार चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे.यापुर्वी सुद्धा कुसमोड भागातून अनेक शेती पंपाची चोरी झाली होती .यामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.




# एम.आय.टी. विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये विद्यार्थी संसद पदग्रहण समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ जून-**

एम.आय.टी. विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये विद्यार्थी संसद परिषदेचा पदग्रहण समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला

कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता नववी 'बीटा'च्या साक्षी आणि अश्मिता यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर प्रार्थना २व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. भारतीय वायुदलात कार्य केलेले शसंजीव सिंग व संजीव सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. मान्यवरांचा सत्कार झाल्यानंतर अवनी हिने विद्यार्थी परिषदेचे महत्त्व, नेतृत्वाची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांची भूमिका यावर प्रभावी भाषण केले. त्यानंतर नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधी, हाऊस कॅप्टन्स, व्हाईस कॅप्टन्स, प्रिफेक्ट्स आणि शिस्त प्रमुख यांची नावे जाहीर करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक अजय पारिक, राहुल जाधव, आश्विनी पांढरे, कला शिक्षक संदीप चव्हाण, सायली घंटे व सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी व शाळा प्रशासन यांनी विशेष परिश्रम घेतले.

**विद्यार्थी संसद अशी**

विद्यार्थी प्रतिनिधी : किर्तीराज शिंदे, विद्यार्थीनी प्रतिनिधी : गायत्री शिंदे, स्पोर्ट्स कॅप्टनः प्रज्वल जाधव, विपुला हाऊस कॅप्टन : श्रीया पवार, व्हाईस कॅप्टन : अन्वी कोंढारे, प्रज्ञा हाऊस कॅप्टन : सत्यम पवार, व्हाईस कॅप्टन : शेरवानी भैराप्पा, दक्ष हाऊस कॅप्टन : वैष्णवी गडदे, व्हाईस कॅप्टन : वेदिता शिंदे, प्रेरणा हाऊस कॅप्टन : श्रावणी बोराडे, व्हाईस कॅप्टन :नम्रता सावंत.




# सिव्हिल हॉस्पिटल परिसरात नव्याने रस्ते तयार करा : बाबा मिस्त्री

## स्ट्रेचरवरून नेण्यात येणाऱ्या रुग्णांना सहन करावा लागतो नाहक त्रास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ जून-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) परिसरातील नव्याने सी.सी रस्ते तयार करण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेवक (बाबा मिस्त्री) यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये शहर, जिल्हा तसेच राज्यातील विविध भागांतून हजारोच्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. यामध्ये गरीब, होतकरू नागरिक, वीटभट्टी कामगार, बांधकाम कामगार, जेकॉब कामगार, मिल कामगार आदींचा समावेश आहे. रुग्णांना एक्स-रे, सोनोग्राफी, सी.टी. स्कॅन तसेच इतर वैद्यकीय तपासण्यांसाठी एका विभागातून दुसऱ्या विभागात ने-आण करावी लागते. मात्र, परिसरातील रस्ता अत्यंत खराब झाला असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे स्ट्रेचरवरून नेण्यात येणाऱ्या रुग्णांना त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका देखील निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी) निधीतून नव्याने रस्ता तयार करण्यात यावा व रुग्णांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, या निवेदनाची दखल घेऊन प्रशासनाने लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# ७४ नाल्यांचा आराखडा : दोन मतप्रवाह, समन्वयाची गरज

## संपूर्ण शहराच्या सुरक्षिततेचा विचार अधिक महत्त्वाचा

सोलापूर शहरातील पावसाळ्यातील जलसंचयाची समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकेने तयार केलेला ७४ नाल्यांचा पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा हा निश्चितच महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीचा उपक्रम आहे. गेल्या काही वर्षांत शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. २०१८, २०२० आणि २०२५ मधील पूरसदृश परिस्थितीने प्रशासनाला कायमस्वरूपी उपाययोजनांची आवश्यकता आहे. त्यातूनच हा आराखडा साकारला गेला. मात्र, या आराखड्याला महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंजुरी दिली आहे.

त्यानंतर आता त्याविषयी दोन मतप्रवाह पुन्हा ऐरणीवर आले आहेत. महापालिका सभागृहनेते नरेंद्र काळे यांनी नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्याची मागणी केल्याने या विषयाला नवे वळण मिळाले आहे. यामुळे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि महापालिका प्रशासन यांच्यात दोन मतप्रवाह निर्माण होण्याची शक्यता दिसत आहे. एका व्यक्तीच्या किंवा एका परिसराच्या हितापेक्षा

संपूर्ण शहराच्या सुरक्षिततेचा विचार अधिक महत्त्वाचा आहे. ७४ नाल्यांचा आराखडा भविष्यातील आपत्ती व्यवस्थापनाचा पाया आहे.

पावसाचा योग्य निचरा न होणे, नैसर्गिक प्रवाहात अडथळे व नाल्यांवरील अतिक्रमण ही यामागील प्रमुख कारणे होती. ही परिस्थिती पुन्हा उद्भवू नये, यासाठी महानगरपालिकेने सखोल अभ्यास करून हा व्यापक आराखडा तयार केला आहे. ड्रोन सर्व्हेक्षण, सॅटेलाईट इमेज, टोपोशीट व टोटल स्टेशन सर्व्हेच्या आधारे शहरातील १७८ चौ.कि.मी. क्षेत्रात ७४ नाले निश्चित करण्यात आले असून, त्यांची ६ बेसिनमध्ये विभागणी करण्यात आली आहे. नाल्यांची एकूण लांबी सुमारे ११५.७७ कि.मी. इतकी आहे. आराखड्यानुसार नाल्यांची सफाई, गाळ काढणे, अतिक्रमणे हटवणे, नाल्यांची रुंदी व खोली वाढवणे, भूमिगत नाले, बॉक्स कल्व्हर्ट व क्रॉस ड्रेनेजची कामे करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ३० नाल्यांवर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आले आहे.

ड्रोन सर्व्हेक्षण, सॅटेलाईट प्रतिमा, टोपोशीट आणि टोटल स्टेशन सर्व्हेच्या आधारे शास्त्रीय पद्धतीने नाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून या महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे. भविष्यातील पूरस्थिती टाळण्यासाठी आणि पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक निचरा सुरळीत करण्यासाठी हा आराखडा आवश्यक असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

दुसरीकडे काही नागरिक आणि लोकप्रतिनिधींची चिंता देखील तितकीच महत्त्वाची आहे. अनेक ठिकाणी प्रस्तावित नाल्यांचा मार्ग विद्यमान मिळकती, बांधकामे किंवा वसाहतींना प्रभावित करू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. काही भागांमध्ये नाल्यांचा प्रवाह प्रत्यक्ष भौगोलिक परिस्थितीशी सुसंगत नसल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे आराखड्याची अंमलबजावणी करताना नागरिकांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक मानले जात आहे.




**किरण बनसोडे**
**मो. ९८२२६१६१४१**

खरे पाहता, हा विषय विकास विरुद्ध नागरिक असा नसून विकास आणि नागरिक यांच्यातील समन्वयाचा आहे. भविष्यातील नैसर्गिक आपत्तींचा विचार करता नाल्यांचे अस्तित्व आणि त्यांचा नैसर्गिक प्रवाह कायम ठेवणे अपरिहार्य आहे. मात्र ज्या ठिकाणी पर्यायी मार्ग, तांत्रिक बदल किंवा किरकोळ दुरुस्तीद्वारे नागरिकांचे नुकसान टाळता येऊ शकते, त्या ठिकाणी प्रशासनाने लवचिक भूमिका घेण्यास हरकत नसावी.

त्याचवेळी काही ठिकाणी नैसर्गिक नाल्यांचे अस्तित्व पुनर्स्थापित करणे अपरिहार्य असेल. अशा ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कायद्याची अंमलबजावणी महत्त्वपूर्ण आहे. कारण एका व्यक्तीच्या किंवा एका परिसराच्या हितापेक्षा संपूर्ण शहराच्या सुरक्षिततेचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.म्हणूनच या प्रश्नावर संघर्ष नव्हे तर संवादाची गरज आहे. आपत्ती व्यवस्थापनाला थेट बाधा पोहोचणार नाही या अनुषंगाने प्रशासनाने नागरिकांच्या हरकती व सूचना नोंदविण्यासाठी खुली प्रक्रिया राबवावी, तर नागरिकांनीही शहराच्या दीर्घकालीन सुरक्षेचा विचार करून विधायक सूचनाद्वारे सहभाग नोंदवावा. ७४ नाल्यांचा आराखडा हा केवळ अभियांत्रिकी प्रकल्प नाही; तो सोलापूरच्या भविष्यातील आपत्ती व्यवस्थापनाचा पाया आहे. हा पाया मजबूत करण्यासाठी समन्वय, पारदर्शकता आणि लोकसहभाग या तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## आ. राजेंद्र राऊत यांच्या विजयाचा पिलीव येथे भाजपच्या वतीने जल्लोष

**पिलीव, दि. २३ जून-**

विधानपरिषद निवडणुकीत भाजपचे राजेंद्र राऊत यांनी ३६५ मतांनी दणदणीत विजय मिळवला. विजयाबद्दल पिलीव येथील अहिल्यादेवी चौकात भाजपच्या वतीने फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोष करण्यात आला. यावेळी पिलीव भाजपचे शहराध्यक्ष प्रमोद भैस, तालुका उपाध्यक्ष डॉ. निलेश कांबळे, अतुल नष्टे, माजी सरपंच तुषार लवटे, सचिन भैस, योगेश देशमुख, राजू बोडरे, सिताराम बोडरे, अंकुश भैस, सचिन करांडे, निलेश झेंडे, मयुर भैस, सचिन पुकळे, संतोष करडे, भागवत दणाने, अरुणसिंग जामदार, तन्मय जामदार, समरजित रजपूत, पप्पु चोबे, महेश माळी, सुरज वाघमारे उपस्थित होते.



## विज्ञान अध्यापक मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**सांगोला, दि. २४ जून-**

सांगोला तालुका विज्ञान अध्यापक मंडळ यांच्यावतीने दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख, विठ्ठल शिंदे, प्रा.शिवशंकर तटाळे, प्रा.केशव माने, डॉ.शंकर धसाडे, दिलीपकुमार जाधव, वैशाली बेहरे, रेश्मा खडतरे, स्मिता इंगोले उपस्थित होत्या. प्रास्ताविक सांगोला तालुका विज्ञान मंडळाचे अध्यक्ष अतुल लुंगारे, सूत्रसंचालन सुनील लिगाडे यांनी केले. आभार सोमनाथ सपाटे यांनी मानले. कार्यक्रमासाठी विज्ञान मंडळाचे सचिव साईश्वरी खडतरे, सदस्य नीलकंठ लिंगे, उत्तम बेहरे, यतिराज सुरवसे, अमोल रणदिवे, हणमंत गारळे, झरे, प्रदीप बाबर, भारत इंगवले, गीता गुळिमरे, शुभांगी घोंगडे, स्वाती गळवे यांनी परिश्रम घेतले.



## वडिलांच्या पुण्यस्मरणानिमित्त शालेय साहित्यांचे वाटप

**जेऊर दि.२४ जून-**

चिखलठाण (ता. करमाळा) येथे वडिलांच्या पुण्यस्मरणानिमीत्त इतर खर्चाला फाटा देत गावातील शालेय विध्यार्थ्यांना पंचवीस हजार रूपयांचे शालेय साहित्याचे वाटप करण्याचा येथील चव्हाण परिवाराचा आगळा वेगळा उपक्रम इतरांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरत आहे. येथील रयत शिक्षण संस्थेचे रामबाई बाबुलाल सुराणा चिखलठाण या विद्यालयात संभाजी शिवदास चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त संतोष संभाजी चव्हाण यांनी सुमारे २५ हजारांच्या वह्या, पेन आदी शालेय साहित्याचे वाटप शाळेतील विद्यार्थ्यांना केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा स्कुल कमिटी सदस्य राजेंद्रकुमार बारकुंड, श्रेया चव्हाण, यशराज चव्हाण विद्यालयातील शिक्षक मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक लक्ष्मण गोडगे यांनी केले. आभार विश्वनाथ सुरवसे यांनी मानले.

## महिलेचा विनयभंग करून मारहाण; मंगळवेढ्यात सहा जणांवर गुन्हा

**मंगळवेढा २५ जून -**

एका ४६ वर्षीय विवाहितेस पतीचा फोन नंबर न दिल्याचा राग मनात धरून एकाने शिवीगाळ करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. गळा आवळून अंगाशी झोंबाझोंबी करून मनाशी लज्जा वाटेल असे कृत्य केले. याप्रकरणी कृष्णदेव कोळेकर, सुजित कोळेकर, रोहित कोळेकर, सारिका कोळेकर, अर्चना कोळेकर, यशवंत कोळेकर यांच्याविरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी महिला २२ जून रोजी सकाळी ७.०० वा. घराजवळ असलेल्या अंगणात चुलीवर स्वयंपाक करीत असताना आरोपी कृष्णदेव कोळेकर तेथे आला. तुझ्या नवऱ्याचा फोन नंबर दे असे म्हणाला. त्यावर फिर्यादीने मला मोबाईलमधील काही कळत नाही, तुमच्याकडे नंबर आहे तुम्हीच त्यांना फोन करा असे म्हणल्यावर शिवीगाळ, दमदाटी करून आरोपीने लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत फिर्यादीच्या अंगाशी झोंबाझोंबी केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

## हळदीच्या कार्यक्रमाला गेल्याची संधी साधून बांधकाम साहित्य लंपास

**मंगळवेढा २५ जून-**

कुटुंबिय हळदीच्या कार्यक्रमाला गेल्याची संधी साधून चोरटयांनी बांधकाम साहित्यावर डल्ला मारला. ५५ हजार १८८ रुपये किमतीचे साहित्य चोरून नेण्याचा प्रकार हुन्नूर येथे घडला. या प्रकरणी अज्ञात चोरटयाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी सिध्दू पुजारी (वय ४२,रा.हुन्नूर) यांनी घराला कंपौंड करण्यासाठी लोखंडी जाळी, अँगल व अन्य साहित्य घरासमोर आणून ठेवले होते. दि.१८ जुन रोजी रात्री १०.०० वा. यातील फिर्यादी कुटुंबासह पाहुण्यांचे लग्न, हळदीचा कार्यक्रम नंदेश्वर येथे असल्याने गेले होते. याची संधी साधून चोरट्यांनी २५ हजार ४२५ रुपये किमतीचे अँगल, २०,७६३ रुपये किमतीची लोखंडी जाळी, ५ हजार रुपयांची वेल्डिंग मशीन, ४ हजार रुपयांचे अँगल कट करण्याचा कटर असा एकूण ५५,१८८ रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी कार्यक्रम संपल्यानंतर रात्री १.०० वा. कुटुंबासह घरी आलेवर त्यांना घरासमोर ठेवलेले साहित्य दिसून आले नाही. याबाबत त्यांनी सर्वत्र चौकशी केली, साहित्य मिळून न आल्याने फिर्याद दिली.

# सोलापूर-धाराशिव सीमा रस्ता मोजणी प्रश्न मार्गी

## २ जुलैला पोलिस संरक्षणात होणार मोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २५ जून -**




शेळगाव (आर) येथील अल्पभूधारक महिला अर्जदार वैशाली बादगुडे यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी आणि सोलापूर व धाराशिव जिल्हा सीमा निश्चितीचा दीर्घकाळापासून रखडलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. ॲड. सुरेश गायकवाड यांनी या जनहिताच्या कामासाठी थेट मुंबई गाठून वरिष्ठ पातळीवर सूत्रे हलवल्याने प्रशासनाला तात्काळ निर्णय घ्यावा लागला. २ जुलै रोजी पोलिस संरक्षणात प्रत्यक्ष जागेवर शासकीय हद्द कायम मोजणी होणार आहे.

मोजणीचे ठिकाण सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर शेळगाव-वाणेवाडी शिव पानंद रस्ता, बसवेश्वर चौक दक्षिण बाजू, गट नं. २८२ येते. या ठिकाणी दोन स्वतंत्र उच्च न्यायालयीन खंडपीठांचे अधिकार क्षेत्र येत असल्याने मोठा कायदेशीर पेच निर्माण झाला होता. याच तांत्रिक आणि कायदेशीर अडचणींमुळे ही मोजणी दीर्घकाळापासून प्रलंबित होती, ज्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. वैशाली बादगुडे या अल्पभूधारक शेतकरी असून, त्यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी आणि सीमेवरील शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सुरेश गायकवाड यांनी पुढाकार घेतला.

प्रकरणातील कायदेशीर गुंता सोडवण्यासाठी सुरेश गायकवाड यांनी सहकाऱ्यांसह मुंबई गाठली. तेथे भूमी अभिलेख विभागाच्या उच्चपदस्थ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन या संवेदनशील विषयाची गंभीर तीव्रता प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाने तात्काळ हालचाली करत २ जुलै ही मोजणीची तारीख निश्चित केली आहे. ॲड. सुरेश गायकवाड यांच्या पाठपुराव्यामुळे हा अत्यंत कठीण प्रश्न सुटल्याबद्दल वैशाली बादगुडे व स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. निर्णयामुळे शेलगाव, वाणेवाडी आणि परिसरातील सीमावर्ती भागातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

### विनामूल्य पोलिस संरक्षणाची तरतूद

दोन जिल्ह्यांच्या सीमेवरील परिस्थिती आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता, शासकीय कामात कोणताही अडथळा येऊ नये म्हणून मोजणीवेळी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत. विशेष म्हणजे, शासन धोरणानुसार महिला अर्जदाराला हा पोलिस बंदोबस्त पूर्णपणे विनामूल्य मिळणार आहे.

# अवैध देशी-विदेशी दारु विक्रीवर छापा

### ड्रॅगन चायनीज सेंटर व गणेश पान शॉपमधून २.30 लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ जून-**

बार्शी शहरातील ड्रॅगन चायनीज सेंटर व शेजारील गणेश पान शॉप येथे पोलिसांनी अवैधरीत्या देशी-विदेशी दारु विक्रीवर मध्यरात्री छापा टाकला. तब्बल २ लाख ३० हजार २१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मंगळवारी दि. २३ जून रोजी ही कारवाई केली.

ड्रॅगन चायनीज सेंटर व शेजारील गणेश पान शॉप येथे अवैधरीत्या देशी-विदेशी दारुची विक्री सुरु असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पंचांना सोबत घेऊन पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यादरम्यान अभय दीपक सरकाळे, दीपक एकनाथ सरकाळे, रिझवान अश्रफ दार, आनंद महादेव बोराडे आणि प्रसाद सुरेश पवार हे अवैधरीत्या देशी-विदेशी मद्याची विक्री करताना आढळून आले. चौकशीअंती त्यांच्याकडे दारु विक्री अथवा साठवणुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी घटनास्थळी झडती घेतली असता विविध ब्रँडच्या देशी व विदेशी म द्याच्या बाटल्या, बिअर कॅन, मद्य साठवण्यासाठी वापरण्यात आलेला फ्रिज तसेच मोबाईल फोन असा एकूण २ लाख ३० हजार २१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त मालामध्ये विविध ब्रँडच्या मद्याचा समावेश आहे. बार्शी शहर पोलीस ठाण्यात कार्यरत कॉन्स्टेबल सचिन भारत देशमुख यांनी फिर्याद दिली.




**पुरवठादार वाईन शॉप मालकावरही गुन्हा**

आरोपींनी हा मद्यसाठा तळेवाडी येथील चंद्रकांत ऊर्फ आप्पा पिसे यांच्या वाईन शॉपमधून घेतल्याचे तपासात सांगितले. संबंधित वाईन शॉपधारकाकडे किरकोळ स्वरुपात मद्यविक्रीचा परवाना असताना त्याने मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी मद्य पुरवल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी अभय सरकाळे, दीपक सरकाळे, रिझवान दार, आनंद बोराडे, प्रसाद पवार तसेच चंद्रकांत ऊर्फ आप्पा पिसे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदान्वये बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा तपास हवालदार साठे करत आहेत.

# सुर्डी सोसायटीच्या चेअरमनसह १९ जणांना दणका

### गुन्हा दाखल करण्याचे बार्शी जिल्हा न्यायालयाचे बार्शी तालुका पोलिसांना आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ जून-**

भारतीय सैन्यात नोकरीस असलेल्या जवानाच्या नावावर खोटा माणूस उभा करुन कर्ज उचलून अपहार केल्याप्रकरणी सुर्डी येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचा चेअरमन सर्जेराव शेळकेसह अन्य १९ जणांना बार्शी जिल्हा न्यायालयाने दणका दिला आहे. सर्वांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश बार्शी तालुका पोलिसांना दिले आहेत.

चेअरमन सर्जेराव शेळकेसह जनक संसारे, सेक्रेटरी प्रभाकर वांगदरे, डीसीसी बँक निरीक्षक प्रदीप देशमुख, डीसीसी बँक मॅनेजर यांचेसह इतर १५ लोक व अनोळखी ७ लोकांविरुद्ध सत्यवान शेळके यांनी बार्शी फौजदारी न्यायालयात दिलेल्या खाजगी फिर्यादीनूसार न्यायालयाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

शेळके यांनी फिर्यादीमध्ये सोसायटीचे सर्व पदाधिकारी, पंच व इतरांनी सर्वांनी मिळून फिर्यादी हा दि. २८ मे २०१०, १४ जुलै २०१० व ४ सप्टेंबर २०१० या तारखेस भारतीय सैन्यात नोकरीस हजर असतानाही त्याच्याऐवजी त्याच्या जागेवर दुसरीच व्यक्ती उभा करुन सत्यवान शेळकेचे नावे त्यांचे संमती विना तीन वेळा कर्जाची मागणी सुर्डी सोसायटीकडे केली. तसेच सर्वांनी संगनमत करुन कर्ज मंजूर करुन सदरची कर्जाची रक्कम तीन वेळा वरील लोकांनी उचलून ९,४२,६४० रुपयांचा अपहार केला आहे. सदर कर्जाची रक्कम सत्यवान शेळके यांच्या सोलापूर डीसीसी बँक सुर्डीचे बँक खात्यावर जमा करुन ती कर्जाची रक्कम सत्यवान शेळके यांच्या परस्पर आरोपींनी काढून घेतली व सदर रकमेचा अपहार केला. आरोपींनी एकूण ९,४२,६४०/- रुपयांची बनावट कागदपत्रे बनवून सत्यवान शेळके यांची फसवणूक केली, असे म्हटले आहे.

सत्यवान शेळके यांनी सैन्यातून फेब्रुवारी २०१९ मध्ये निवृत्त झाल्यानंतर वरील सर्व गोष्टींची माहिती ४ मार्च २०२२ रोजी कागदपत्रे मिळाल्यानंतर झाली. म्हणून त्यांनी बार्शी फौजदारी न्यायालयात खाजगी फिर्याद नंबर २६४/२०२२ ही ॲड.वैद्य आर.यू. यांचेमार्फत दाखल केली. सर्व आरोपींविरुद्ध सीआरपीसी कलम १५६ (३) प्रमाणे भा. द.वी .कलम ४०९,४०६, ४१९ , ४२०, ४६७ ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास करण्याचे आदेश द्यावेत म्हणून विनंती केली होती. ही मागणी बार्शी प्रथम वर्ग फौजदारी न्यायालयाने १८ मे २०२२ रोजी फेटाळली होती.

बार्शी प्रथम वर्ग फौजदारी न्यायालयाच्या निकालाविरुद्ध सत्यवान शेळके यांनी जिल्हा न्यायालयात रिविजन दाखल केले होते. ते रिविजन बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश. पी. डी. सुभेदार यांनी मंजूर करुन वरील सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन तपास करण्याचे आदेश बार्शी तालुका पोलिसांना दिलेले आहेत.

या प्रकरणात फिर्यादी सत्यवान शेळके यांचेमार्फत ॲड. आर. यु. वैद्य, ॲड. के. पी. राऊत व ॲड. एस. पी. शहा यांनी काम पाहिले.

## वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या दोघा चालकांवर गुन्हे

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २५ जून -**

मंगळवेढा शहरातील मुस्लिम जमीयत कब्रस्तानसमोर सार्वजनिक रस्त्यावर काही वाहन चालक आपली वाहने आडवी लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत होते. त्यांच्यावर कारवाई करुन दोन चालकांवर गुन्हे दाखल केले आहेत.

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मंगळवेढा यांना तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई केल्याचे पोलिसांनी सांगितले. डी.वाय.एस.पी. डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या सुचनेनुसार पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरिगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढा पोलीस स्टेशन वाहतूक विभागाकडील पोलीस हवलदार



संभाजी यादव, पोलीस कॉन्स्टेबल सुरज साळुंखे व प्रवीण जाधव यांनी बोराळे नाका परिसरातील मुस्लिम जमीयत कब्रस्तान समोरच्या सार्वजनिक रस्त्यावर एम एच १२,बी. व्ही.४०४२ व बिगर नंबरची ॲटो रिक्षा अशी दोन वाहने आडवी लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करणार्या वाहन चालकांवर कारवाई करून,त्यांचेवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ प्रमाणे रीतसर गुन्हे दाखल केले आहेत.

## महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज अँड अकॅडमीचे 'एमएचटी-सीईटी' परीक्षेत घवघवीत यश

### पहिल्याच प्रयत्नात १२ विद्यार्थ्यांना ९० पर्सेन्टाईलपेक्षा अधिक गुण

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी दि. २५ जून -**

'एमएचटी-सीईटी २०२६' प्रवेश परीक्षेच्या पहिल्याच प्रयत्नात महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज अँड अकॅडमी, टेंभुर्णीच्या १२ विद्यार्थ्यांनी ९० पर्सेन्टाईलपेक्षा अधिक गुण मिळवले. १६ विद्यार्थ्यांनी ८५ पर्सेंटाइल पेक्षा अधिक गुण मिळवले.

प्रवेश परीक्षेत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली भौतिकशास्त्र या विषयात ९९.४८ पर्सेंटाइल, जीवशास्त्र या विषयात ९९.०३ पर्सेंटाइल, रसायनशास्त्रमध्ये ९८.५४ पर्सेंटाइल तर गणितात ९७.६६ पर्सेंटाइल असे उच्चांकी गुण मिळवले आहेत. भानवसे दत्तात्रय याने - ९७.४४, अटकळे सुप्रिया - ९७.१६, दळवी श्रुती - ९७.००, गवळी प्रथमेश - ९६.९८, शिरसट तनुजा - ९६.६४, मस्के शिवानी - ९६.४९, देशमुख ज्ञानेश्वरी - ९४.४९, वाघमारे ओम - ९३.८८, चोपडे गणेश - ९२.७३, मोरे मानसी - ९२.२४, पाटील अस्मिता - ९२.२१, लोकरे रौनक - ९१.४८, काळे समर्थ - ८९.४५, बोधे ऋषिकेश - ८८.८८, वाघमोडे राजाभाऊ - ८७.७३, जगताप प्रथमेश - ८७.२५ पर्सेंटाइल असे गुण मिळवले आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयातील योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मिळवलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांचा नामांकित कृषी, अभियांत्रिकी आणि फार्मसी महाविद्यालयांमधील उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे. यशाबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार अभिजीत पाटील, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीत शिंदे, जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती अमृता वाघे, ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, विद्यालयाचे प्राचार्य विजय यादव, मुख्याध्यापक शोएब बागवान, शिक्षक-पालक संघ, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थांतर्फे सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. संपूर्ण माढा तालुक्यातून संस्थेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज

## स्मार्ट गव्हर्नन्स, सामाजिक न्यायाचे शतकापूर्वीचे शिल्पकार

आज जग कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्मार्ट सिटी, ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल प्रशासनाच्या युगात प्रवेश करत आहे. परंतु एक प्रश्न आजही महत्त्वाचा आहे-स्मार्ट गव्हर्नन्स म्हणजे नेमके काय? या प्रश्नाचे उत्तर शोधताना इतिहास आपल्याला घेऊन जातो राजर्षी छत्रपती शाहू महाराजांकडे.

२६ जून १८७४ रोजी जन्मलेले राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे भारतीय सामाजिक न्याय, लोककल्याणकारी प्रशासन आणि प्रगतिशील शासनव्यवस्थेचे एक तेजस्वी प्रतीक होते. १८९४ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारली आणि अठ्ठावीस वर्षांत सामाजिक परिवर्तन, लोककल्याण आणि न्याय्य प्रशासनाचा एक आदर्श निर्माण केला. त्यांच्यासाठी राजसत्ता ही केवळ शासन करण्याचे साधन नव्हते, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याची जबाबदारी होती. आज आपण नागरिक केंद्रित शासन (सेंट्रिक गव्हर्ननन्स) किंवा लोकाभिमुख शासन (पीपल फर्स्ट गव्हर्ननन्स) या संकल्पनांची चर्चा करतो, परंतु शाहू महाराजांनी त्याची अंमलबजावणी शतकापूर्वीच केली होती.

शाहू महाराजांची कार्यपद्धती अभ्यासू, लोकाभिमुख आणि वास्तववादी होती. राजवाड्यात बसून प्रशासन चालवत नसत. ते गावोगावी फिरत, शेतकऱ्यांशी संवाद साधत, विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत आणि समाजातील दुर्बल घटकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकत. आजच्या भाषेत सांगायचे झाले तर हे फील्ड डेटा कलेक्शन, ग्राउंड रिॲलिटी असेसमेंट आणि एव्हिडन्स बेस्ड गव्हर्नन्स चे उत्कृष्ट उदाहरण होते. एका दौऱ्यादरम्यान त्यांनी पाहिले की अनेक मुलांना जातीच्या कारणाने शाळेत प्रवेश नव्हता. काही विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर बसवत होते. ही परिस्थिती पाहून त्यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली, शिष्यवृत्ती दिल्या.



१९०२ मध्ये त्यांनी मागासवर्गीयांसाठी सरकारी सेवांमध्ये ५० टक्के आरक्षण लागू केले. हा निर्णय भारतीय सामाजिक इतिहासातील क्रांतिकारी टप्पा ठरला. सार्वजनिक विहिरी, तलाव, धर्मशाळा आणि शाळा सर्वांसाठी खुल्या करण्याचा निर्णयही क्रांतिकारी होता. अस्पृश्य समाजालाही मूलभूत सुविधांचा हक्क मिळवून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिभेची ओळख करून त्यांना दिलेले प्रोत्साहन ही देखील त्यांच्या राजर्षीपणा दाखवणारे मोठे उदाहरण ठरते. आज जग ह्युमन कॅपिटल डेव्हलपमेंट आणि टॅलेंट मॅनेजमेंट यांवर भर देत आहे; शाहू महाराजांनी हा विचार खूप पूर्वी स्वीकारला होता.

कोल्हापूर संस्थानातील शेती पावसावर अवलंबून होती. यांनी तलाव, बंधारे, कालवे, विहिरी आणि सिंचन योजनांना प्रोत्साहन दिले. पाण्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन, जलसाठा वाढविणे आणि सिंचन क्षेत्राचा विस्तारावर भर दिला. शेतकऱ्यांसाठी महसुलात सवलती, कर्जबाजारीपणातून मुक्तीसाठी उपाययोजना केल्या आणि शेतीसाठी आवश्यक सुविधा दिल्या. दुष्काळात करसवलती देत सार्वजनिक कामांतून रोजगारनिर्मिती केली. शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, सिंचन सुविधा, पशुधन विकास आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. महिला शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि महिलांच्या सन्मानासाठी त्यांनी अनेक सुधारणा केल्या. स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श घालून दिला.

आज भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ संशोधन, डिजिटल अर्थव्यवस्था आणि स्मार्ट तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकासाचा नवा अध्याय लिहित आहे. परंतु तंत्रज्ञानाचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत न पोचल्यास विकास अपूर्ण राहील. राजर्षी शाहू महाराजांनी विकासाचा केंद्रबिंदू माणूस असला पाहिजे, हे शिकवले. त्यांच्या विचारांवर आधारित न्याय्य, समतामूलक आणि सर्वसमावेशक भारत घडविणे, हेच त्यांच्या जयंतीदिनी खरे अभिवादन ठरेल.

**प्रा. डॉ. महेंद्र गायकवाड**
अध्यक्ष-उत्तम सोशल फाउंडेशन, सोलापूर.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वाकाव येथे रेल्वे अंडरपास मंजूर

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नांना यश



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ जून-**
माढा तालुक्यातील वाकाव येथील रेल्वे लाईनवरील अंडरपास निर्माण करण्याच्या मागणीला अखेर यश आले आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे रेल्वे प्रशासनाने या कामाला मंजुरी दिली आहे.

मध्य रेल्वे, सोलापूर विभागाचे अपर मंडल रेल प्रबंधकांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना पत्राद्वारे माहिती दिली आहे. वाकाव येथील ४०३/८-९ येथे पादचाऱ्यांसाठी सबवे बांधण्याचे काम-१६ अंतर्गत मंजूर केले आहे. कामाचा अपेक्षित पूर्णत्व कालावधी मार्च २०२७ पर्यंत असल्याचे कळवले आहे. वाकाव परिसरातील नागरिकांना रेल्वे मार्ग ओलांडताना अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी रेल्वे प्रशासनाकडे हा प्रश्न मार्गी लावला.

## महत्त्वाचे...



### उघड्यावर तळल्या जाणाऱ्या पदार्थामुळे आरोग्य धोक्यात

**मंगळवेढा दि. २५ जून-**
शहरातील स्वीट मार्ट व हात गाडीवरील खाद्यपदार्थ उघड्यावर तळले जात आहेत. कमी दर्जाच्या खाद्यतेलाचा वापर सुरू आहे. या गंभीर प्रकाराकडे अन्न व औषध प्रशासनाचे व नगरपालिका आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत आहेत. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मंगळवेढा शहर परिसरात पंढरपूर विजापूर रोड, टोलनाका परिसर, बोराळा नाका, बस स्थानक परिसर, दामाजी चौक, चोखामेळा चौक, शिवप्रेमी चौक, सांगोला नाका, मरवडे रोड, दामाजी कारखाना रोड, पंढरपूर विजापूर बायपास रोड आदी ठिकाणी खानावळी, हातगाडे व खाद्यपदार्थ विक्रेते उघड्यावर खाद्यपदार्थ तळतात. तेलाचा सर्रास पुनर्वापर होत आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे खानावळी, ढाबे, स्वीट मार्ट, हॉटेल उघड्यावरील खाद्यपदार्थ तळत आहेत.



### वर्ल्ड ऑफ विडोज संस्थेतर्फे एकल महिला दिवस साजरा

**सोलापूर, दि. २५ जून -**
वर्ल्ड ऑफ विडोज या संस्थेच्यावतीने महापालिका हिरवळीवर एकल महिलांच्यावतीने साजरा करण्यात आला. अध्यक्षा विद्या लोलगे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अशा अनेक एकल महिलांचा हळदीकुंकू लावून सन्मान करण्यात आला. यावेळी आबेदा नीलमेघम यांचाही खास सत्कार केला. त्यांनी आपल्या दोन मुलांना उच्च शिक्षण देऊन चांगल्या पदावर कार्यरत आहेत. मुलगा अमेरिकेत असल्याचे सांगितले. यावेळी सायरा शेख, लता ढेरे, मार्था आसादे, शोभा गायकवाड, शबाना मुलाणी, मोनिका सरकार, शशिकला कसपटे, शारदा मसूती, पुष्पा हलकूड, स्वाती मुकणार, लक्ष्मी माने, कांचन चौगुले, मदिना पटेल आदी महिला उपस्थित होते.

### उमरगा ब्रिजखाली धडकेत एक ठार

**सोलापूर :** एसटी बसने समोरून धडक दिल्याने एक वीस वर्षीय तरुण ठार झाल्याची घटना उमरगा येथील ब्रिज खाली बुधवारी संध्याकाळी घडली. शांतीलाल दोदी राजपूत (वय २० वर्ष, राहणार बिरोली, मध्य प्रदेश) असे त्या मयत दुचाकी स्वराचे नाव आहे. अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्याला उमरगा येथील सरकारी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आज गुरुवारी पहाटे आई सालमनीबाई यांनी दाखल केले असता त्याचा उपचारा पूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.



### सिताराम कारखान्याच्या प्रदूषणामुळे खर्डीकर त्रस्त

#### उपोषणाकडे कारखान्याचे दुर्लक्ष; ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ जून -**
तालुक्यातील खर्डी येथील खासगी तत्वावरील सिताराम साखर कारखान्यामुळे परिसरात प्रदूषण होत आहे. शेतीचे नुकसान होत असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. हे प्रदूषण थांबवावे, या मागणीसाठी खर्डी ग्रामस्थांनी चार दिवसापासून कारखान्याच्या गेटसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र याकडे कारखाना प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे.

सिताराम साखर कारखान्यामध्ये तयार झालेले दूषित पाणी परिसरात सोडण्यात येत आहे. यामुळे परिसरातील विहिरीचे पाणी दूषित झाले असून जनावरे पाणी पीत नाहीत. तसेच कारखान्यांमध्ये असलेली राख व बगॅस उडत आहे. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. कारखाना प्रशासनाने याचा कायमस्वरुपी बंदोबस्त करावा, अशी मागणी गेल्या चार वर्षापासून करण्यात येत आहे. मात्र याकडे कारखाना प्रशासन दर्लक्ष करत आहे. गेल्या चार दिवसापासून कारखाना प्रशासनाविरोधात खर्डी येथील ग्रामस्थांनी सिताराम कारखाना गेट समोर आमरण उपोषण सुरु केले आहे. मात्र याची दखल कारखाना प्रशासनाने घेतलेली नाही. परिणामी खर्डी ग्रामस्थातून आता तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## नगरपालिका शाळांतील असुविधांबाबत शिक्षण सभापतींचाच एल्गार

### कुर्डुवाडीत निष्क्रीय प्रशासनाविरूध्द पालिकेसमोर आमरण उपोषणाला प्रारंभ




**तभा वृत्तसेवा**
**कुर्डूवाडी, दि. २५ जून-**
कुर्डूवाडी नगरपालिका अंतर्गत चालत असलेल्या शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी बाथरूम, शौचालये व मुतारी प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही बांधून अथवा दुरूस्त करून मिळत नाहीत. परिणामी दस्तुरखुद्द नगरपालिका शिक्षण समिती सभापती संजय टोणपे यांनीच निष्क्रीय प्रशासनाविरूध्द आजपासून पालिकेसमोर बेमुदत आमरण उपोषण सुरु केले. मात्र प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर उपोषण मागे घेतले.

विशेष म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशालाही प्रशासनाने ठेंगा दाखवला आहे. दिवसभराच्या उपोषणानंतर विहीत मुदतीस सर्व कामे ठेकेदाराने पुर्ण न केल्यास योग्य कारवाई करण्यात येईल असे लेखी आदेश प्रशासनाने काढल्यानंतर टोणपे यांनी उपोषण मागे घेतले आहे.

कुर्डूवाडी नगरपालिकेत शिवसेनेचा नगराध्यक्ष तर राष्ट्रवादी काँग्रेसचा उपनगराध्यक्ष आहे. राष्ट्रवादीकडे बहुमत तर सत्तेच्या चाव्या शिवसेनेकडे आहेत. दोन्ही पक्षाच्या सत्तासंघर्षात विद्यार्थी मात्र भरडला जातोय. कुर्डूवाडी नगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या शहरात महाविद्यालय व इतर शाळा आहेत. या सर्व शाळा महविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे बाथरूम, शौचालये व मुतारी नाहीत. काही आहेत त्या नादुरूस्त आहेत. त्या दुरूस्त करण्यासाठी शिक्षण समिती सभापती संजय टोणपे यांनी वारंवार प्रशासनास लेखी निवेदन दिले होते. मासिक सभेतही चर्चा केली होती. मात्र निष्क्रीय प्रशासनाने लक्ष दिले नाही. नगराध्यक्ष जयश्री भिसे यांनाही तोडगा काढता आला नाही. किंबहूना शिवसेना जिल्हाध्यक्ष धनंजय डिकोळे यांच्या सहमतीशिवाय त्यांना निर्णयच घेता येत नाही.

शिक्षण सभापती संजय टोणपे यांनी याबाबत राष्ट्रवादीचे गटनेते समिर मुलाणी यांना लेखी निवेदन दिले. यावर मुलाणी यांनी २५ मार्च २०२६ व ८ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली. नगराध्यक्षा जयश्री भिसे यांनाही सर्वसाधारण सभेत विषय घेण्यासंदर्भात लेखी कळवले.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २५ मार्च व ८ एप्रिल रोजी नगराध्यक्षा जयश्री भिसे व प्रशासनाला लेखी पत्राद्वारे जनतेला वेठीस न धरता विषय घेण्यासंबंधी कळवले. मात्र अद्याप कार्यवाही न झाल्याने संजय टोणपे यांनी आमरण आंदोलन छेडले आहे.

> मी बाहेरगावी आहे. मला आत्ताच उपोषणाला बसले असल्याचे समजले आहे. कुर्डूवाडी नगरपालीकेस योग्य मुख्याधिकारी नाही. मी मुख्याधिकाऱ्यांना आजपर्यंत शहरात झालेली विकास कामे कधी झाली आहेत याची माहिती मागीतली आहे. ती अद्याप माझ्यापर्यंत आली नाही.ती माहिती अहवाल माझ्याकडे आल्यास सभेमध्ये विषय घेण्यात येतील. शहरातील विकास कामे आम्ही सर्वजण मिळूनच करणार आहोत.
>
> **जयश्री भिसे,** नगराध्यक्षा कुर्डूवाडी नगरपालिका.

## मुख्यमंत्र्यांनी आषाढी एकादशीला पंढरपुरात विचार करुन यावे

### आ.रोहित पवार यांचा इशारा; आश्वासनांची पूर्तता न केल्याचा आरोप



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ जून-**
पुढील महिन्यात २५ जुलैला मुख्यमंत्री पंढरपुरात आषाढी एकादशीला येणार आहेत. तेव्हा आश्वासनाची पूर्तता न केल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी विचार करून पंढरपूरला यावे, असा इशारा राष्ट्रवादी श.प. पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दिला आहे.

आमदार रोहित पवार यांच्या पंढरपूर येथील अन्नत्याग आंदोलनात मंत्री गिरीश महाजन यांनी अधिवेशनापूर्वी बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, हे आश्वासन पूर्ण न झाल्याने आमदार रोहित पवार यांनी बुधवारी (दि.२४) पंढरपुरात विठ्ठल दर्शन घेऊन मराठवाडा दौऱ्याला सुरुवात केली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांना इशारा देत मंत्री महाजन यांच्यावर घणाघाती टीका केली. याप्रसंगी राष्ट्रवादी (श.प.गट) काँग्रेसचे नेते वसंत देशमुख, डॉ. योगेश रणदिवे उपस्थित होते.

सरकारला जनाची नाही तरी मनाची लाज वाटली पाहिजे. अधिवेशनापूर्वी होणाऱ्या बैठकीच्या आश्वासनाची पूर्तता होत नसेल तर अधिवेशनात बसून काय उपयोग? त्यामुळेच आपण आता रस्त्यावर उतरून लढाई लढत आहोत असेही त्यांनी सांगितले.

### माझ्या नवऱ्यासोबत का बोलतेस म्हणून मारहाण

**सोलापूर :** माझ्या नवऱ्यासोबत तू का बोलतेस असे म्हणून एका महिलेला चौघां महिलांनी मिळून सळई व लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील तडवळ गावात बुधवारी संध्याकाळी घडली. शाईन कासिम बोरोटी (वय ३४ वर्ष ,रा. तडवळ , ता. अक्कलकोट) असे त्या मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे .त्या बुधवारी संध्याकाळी घरात असताना नूरजहा बोरोटी, सानिया बोरुटी व इतर दोन जणी मिळून घरात आल्यावर तिला मारहाण केली. तिला गावातील एका खाजगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आज गुरुवारी दुपारी ती स्वतः दाखल झाली.

## करमाळा अॅट्रॉसिटी, गंभीर गुन्ह्यातील आरोपीला जामीन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ जून-**
करमाळा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी स्वप्निल बाबुराव देवडकर याला बार्शी येथील विशेष न्यायालयाने अटी व शर्तीच्या अधीन राहून जामीन मंजूर केला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य आणि फिर्यादीने केलेले गंभीर आरोप पाहता, या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

दि. १९ मे २०२६ रोजी करमाळा येथील कंदर परिसरात फिर्यादी आनंद खांडेकर यांना एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीतून अपहरण करुन नेले होते. तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांना गाडीत बसवून मारहाण केली आणि जातीवाचक शिवीगाळ केली. इतकेच नाही तर, आरोपींनी पिस्टलचा धाक दाखवून फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली. प्रदीप कदम व त्याच्या कुटुंबीयांच्या पाया पडण्यास सक्तीने भाग पाडले. या संपूर्ण प्रकाराचे चित्रीकरणही आरोपींकडून केले होते.

याप्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या विविध कलमांन्वये (१२७(२), ११५(२), ३५१(२), १८९(२), १९०, १९१(२)) आणि अनुसूचीत जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ च्या कलम ३(१)(r), ३(१)(s) व ३(२)(va) अन्वये गुन्हा दाखल होता.

आरोपी स्वप्निल देवडकरने बार्शी येथील विशेष न्यायालयात नियमित जामिनासाठी अर्ज केला होता. बचाव पक्षातर्फे अॅड. महेश जगताप यांनी युक्तिवाद करताना, आरोपीला खोट्या प्रकरणात अडकवले आहे. तपासाची प्रक्रिया पूर्णत्वाकडे असून आता पोलीस कोठडीची गरज नाही, असे मत मांडले.

सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील अॅड. दिनेश देशमुख यांनी कडाडून विरोध केला. मात्र, दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेत विशेष न्यायाधीश यु. एल. जोशी यांनी एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. आरोपांचे गांभीर्य हे जामीन नाकारण्याचे एकमेव कारण असू शकत नाही, विशेषतः जेव्हा तपास बऱ्याच अंशी पूर्ण झाला आहे, असे म्हणत न्यायालयाने आरोपीला ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. न्यायालयाने आरोपीवर काही अटी घातल्या असून, पुढील तपास प्रक्रियेत सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. या निकालामुळे आरोपीला दिलासा मिळाला असला तरी, या गुन्ह्यातील इतर आरोपींच्या संदर्भात पोलीस पुढील काय पावले उचलतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. आरोपीतर्फे अॅड. महेश जगताप, अॅड. राहुल कसबे आणि अॅड. केदार पाटील यांनी तर सरकार पक्षातर्फे अॅड. दिनेश देशमुख यांनी काम पाहिले.

## कॉलेज ऑफ फार्मसीत प्रवेश मार्गदर्शन कक्ष

### दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालयात उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २५ जून -**
येथील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रवेश मार्गदर्शन केंद्राची स्थापना केली आहे. केंद्राचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढ्याच्या संचालिका प्रा.तेजस्विनी कदम यांच्या हस्ते झाले.

यावेळी संचालक यतिराज वाकळे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. डी.जे.यादव, इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य रवींद्र काशिद आदी मान्यवर उपस्थित होते. केंद्रामार्फत विशेषतः फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत मोफत व सुलभ मार्गदर्शन होणार आहे. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे, विविध शासकीय शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रमांचे फी स्ट्रक्चर तसेच सीएपी प्रक्रियेची माहिती देणार आहे. प्रवेश प्रक्रियेसंबंधी सर्व प्रश्नांची उत्तरे येथे मिळणार आहेत.

मंगळवेढा व परिसरातील विद्यार्थ्यांनी संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.डी.जे.यादव यांनी केले आहे. मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा व मार्गदर्शन मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी प्रवेश मार्गदर्शन प्रमुख प्रा.हरी जवंजाळ (मो. ९५०३२७५१७७) यांच्याशी संपर्क साधावा.

## खिळखिळ्या लालपरीचा पुन्हा खोळंबा

### वैराग-बार्शी-सोलापूर रस्त्यावर सलग दुसऱ्या दिवशी एसटी बंद

#### शेळगावजवळ कालच्याच जागेपासून अवघ्या ५0 मीटरवर आज पुन्हा बस बंद


हलक्या पावसात प्रवाशांची तासनतास रखडपट्टी

**वैराग, दि. २५ जून -**
'लालपरी'चा प्रवास सुखकर आणि सुरक्षित मानला जात असला, तरी सध्या बार्शी-वैराग-सोलापूर मार्गावरील प्रवाशांसाठी हा प्रवास म्हणजे निव्वळ मनस्ताप आणि चिंतेची बाब ठरत आहे. काल ज्या ठिकाणी एसटी बस बंद पडली होती, अगदी त्याच शेळगाव शिवारात आज पुन्हा अवघ्या ५० मीटर अंतरावर दुसरी एसटी बस अचानक नादुरुस्त होऊन बंद पडली.

परिसरात हलका पाऊस आणि ढगाळ वातावरण असताना, सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या या प्रकारामुळे प्रवाशांना रस्त्याच्या कडेला तासनतास दुसऱ्या बसची वाट पाहत उभे राहावे लागले. एसटी प्रशासनाच्या या ढिसाळ कारभाराविरोधात आता प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. आज दुपारी शेळगावजवळ प्रवाशांनी गच्च भरलेली एसटी बस अचानक रस्त्यातच निकामी झाली. चालक आणि वाहकाने बस सुरू करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र खिळखिळी बस जागची हलली नाही.

विशेष म्हणजे, कालही याच परिसरात एसटीने प्रवाशांना दगा दिला होता आणि आज पुन्हा तोच प्रकार घडल्याने प्रवाशांच्या संयमाचा बांध सुटला.

आज परिसरात हलका पाऊस पडत असल्याने आणि आकाश ढगाळ असल्याने प्रवाशांचे हाल अधिकच वाढले. पावसापासून बचाव करण्यासाठी आणि पुढचा प्रवास कधी सुरू होईल या चिंतेत, लहान मुले, महिला आणि वृद्ध प्रवाशांना रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांचा आसरा घ्यावा लागला.

लोक अत्यंत हताशपणे दुसऱ्या बसची वाट पाहत उभे राहिलेले चित्रात स्पष्ट दिसत आहेत. एकीकडे प्रवासी वेळेवर पोहोचण्यासाठी संपूर्ण तिकीट काढतात आणि दुसरीकडे प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे त्यांना भरपावसात रस्त्यावर ताटकळत राहावे लागत आहे.

> **नियमित तिकीट काढतो, मग ही रखडपट्टी का?**
>
> कालही या मार्गावर गाडी खराब झाली. आज आम्ही ज्या गाडीने निघालो, तीही शेळगावमध्येच बंद पडली. रिमझिम पाऊस सुरू आहे, तासनतास दुसरी गाडी येत नाही, मुले सोबत आहेत. आम्ही काय मोफत प्रवास करतो का? परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळ या मार्गावरील प्रवाशांच्या जीवाशी खेळ कधी थांबवणार? अशी संतप्त प्रतिक्रिया अडकून पडलेल्या प्रवाशांनी व्यक्त केली.